पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

४३

पेशवे—सामाजिक व धार्मिक

[किंमत—२ रुपये २ आणे किंवा ४ शिलिंग]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए.

गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection 43

THE SOCIAL AND RELIGIOUS MATTERS UNDER THE PESHWAS (1727-1797)

The majority of the documents hitherto published have been of a political character. From time to time, however, papers throwing fresh light upon the social and economic condition of the country, and upon religious and judicial matters, have been discovered: these were set aside for separate publication and are here presented under the following heads: (*a*) Religious, (*b*) Social, (*c*) Judicial.

(*a*) *Religious.*

Documents grouped under this head cover a wide range of subjects—the settlement of caste disputes, the erection and maintenance of temples and ghats, the endowment of religious institutions and other matters of a similar nature. One remarkable fact to which attention is drawn is that the Peshwas' outlook was by no means confined to the Deccan. As the Maratha power extended over northern India, the Peshwas, who, like all Hindu rulers, considered themselves Supreme Heads of all religious matters, were anxious to introduce reforms into countries where orthodox practices had been suffered to fall into neglect under Muhammadan rule. The Shravana-masa Dakshina and other Brahmin charities, the rigid enforcement of caste-rules, grants towards religious ceremonies for averting small-pox and other epidemics, pilgrim-taxes, vows and sacrifices, are only a few of the topics illustrated in the following selected documents.

(*b*) *Social.*

It is almost impossible to draw a hard and fast line between religious and social matters, and the papers arranged under this heading refer mostly to questions of caste, marriage and divorce, conversion, witchcraft and miscellaneous topics of a similar kind. It is interesting to learn that the sale of intoxicating liquors was entirely prohibited under the Maratha *Raj*. The passport system, which we are inclined to look upon as a modern invention for the annoyance of travellers, was in vogue: a Brahmin resident in Janjira complains that he is unable to attend a religious function in Poona without a permit from the Sidi! Female servants were not allowed to leave their masters unless formally discharged: a similar condition of semi-servitude, it will be remembered, obtained in medieval England.

(c) *Judicial.*

These papers will be found particularly valuable for the study of the administration of Hindu law under the Peshwas. Capital punishment was only inflicted under martial law and in cases of treason and rebellion : it was not inflicted in cases of ordinary murder. In this respect, Hindu custom compares favourably with the savage penal code of eighteenth century England. Cow-killing on the other hand was regarded as a heinous crime ; and it is interesting to note that the "benefit of clergy" was extended to Brahmin offenders, who got off lightly as compared with members of the lower castes. Civil suits are chiefly concerned with questions of adoption, division of property, maintenance of widows and similar topics. Moro Hari Bhave is responsible for a large number of letters communicating decisions pronounced by Ramshastri : he is apparently the latter's Shirastedar. It is disappointing that no fully reported cases decided by Ramshastri have so far come to light in the archives of the Daftar.

No. 1] [30-12-1727

ॾ

"दस्तक अजरख्तखाने कोट जंजिरे राजपुरी ता। ठाणेदारान व चौकीदारान व रहदारान अहद प्रा। सिवर्धन तहद ठाणे माहाड व ठाणे पोलादपूर बिदानद के सु[१]मान असरीन मया व अलफ. राघोपंत अदकारी प्रा। सिवर्धन वगैरा हे घाटावर बाजीराव देसमुख याचे मुलाचे मुंजीस जात असेत अदमी ७

वस्ती सिवर्धन

१ माइले अदकारी
१ आपाजी कुलकर्णी
१ त्रिंबकपंत महाजन
१ विस्वनाथ वर्तक
१ सावित्री देसाईण

—

५

वस्ती प्रा। दिवे

१ बाबाजी त्रिंबक देसाई
१ संकराजी गोविंद कुलकर्णी

—

२

येकूण अदमी सात घाटावर मुंजीबद्दल जात असेत, तर जाऊ देणे. फेर तिकडून येतील यास येऊ देणे व ब्राम्हण सिवर्धन व दिवेपैकी च्यालीस पनास लग जातील त्यास जाऊ देणे. येतील यास येऊ देणे. राहामध्ये मुजाहीम[१] मना होणे पा। हुजूर रा। * * * मा। जबानी गंगाजी जाधव अफराद रा। छ २७ माहे जमादिलावल मोर्तब सुद.

¶*This is a permit of the Sidi of Janjira granting a free passage to some persons attending the thread ceremony of the Peshwa's son. Without such permits, it seems, people could not travel freely in those days.*

No. 2] [29-6-1735

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजमान्य राजश्री बाजीरावजी
व राजश्री चिमाजी आपा स्वामीचे सेवेसी

पोष्ये सदासिव नाईक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम आशाड वदी ९ पावेतो सहकुटुंब सुखरूप आसो उपरी. स्वामीही कृपा करून पत्र

---

१ रस्त्यांत हरकत.

पाठविले ते पावोन परम समाधान जाहाले. वाचून बहुत संतोष जाहाला. माहाराजाही घाट व ब्रह्मपुऱ्याविसी लिहिले. त्यास, येथील वर्तमान: येथील अधिकारी यानी जरासंद घाट बांधावयाचा आरंभ केला. त्यानी हकिमीमुले सर्व सामान बंद करून आपले काम चालविले. आणखी कोणास मसाला मिलाला नाही. तेणेकरून सर्वाची कामे बंद जाहाली. घाटासाठी स्थल नागेशाचा घाट बांधावा येसा निश्चये केला आहे. आपल्या घाटाच्या पूर्वेकडे वीरेश्वराचा घाट आहे. त्याच्या पूर्वेकडे नागेशाचा घाट आहे. परंतु बहुत ब्राह्मण तेथे स्नान करणार नाही. काये निमित्य म्हणाल, श्रीमनकार्णिका सनिध याकरितां तो घाट बांधावा हे चित ठारत नाहीं. ब्रम्हपुऱ्याविसी लिहिले तरी येके स्थली ब्राह्मणपुऱ्या बांधाव्या तरी चितायोग्य स्थल हातास येत नाहीं. पुटकर ब्रह्मपुऱ्या पाच घेतल्या आहेत. किता येक रुपये ३६००, किता येक रुपये ३००० किता एक रुपये १२००, किता येक रुपये २२५०, किता येक रुपये ७५०, येणे-प्राणे घरे घेतली आहेत. मातुश्री आल्याउपरी चिरंजीव बाबूजीच्या विचारे करणे ते केले जाईल. दशासमधीचे (दशाश्वमेधीचे) स्थल श्रीअद्वैतानंद स्वामीस करून दिले. घाटसुधा घेतले. घाटाचे माथा हवेली जीर्ण होती ते घेऊन नवे बांधोन स्वामीस स्थल दिले आहे. येकून रुपये खर्च ४४०० जाहले आहेत. भूमि राहिली आहे, त्यास रुपये दोन अडीच हजार लागतील ते दाहा सन्यासी राहत येसे स्थल होईल. परंतु त्यास काम यावरसी लाविले नाही. पुढे काम लावीन. यावरसी येक काम सिध केले. वृधकालासनिध जमीन बिघे अडीच विकत घेतली तेथे बाग केली. येक सहश्र पात्रे होत येसे स्थल बांधणार. यावरसी पाचसे पात्रे होत येसे स्थल सिध केले. पाचसे केली व आणखी वृक्ष लाविले. आणखी स्थल करणे आहे. सामानाचा अटकाव जाहाला म्हणून सेवटास गेले नाही. कार्तिकाउपरी काम लाऊन सिध करीन. रावजी गावात बाग आपल्या घरापासून जवली आहे. श्रीयात्रेस लोक येतील त्यास राहावयास जातील तेव्हा राहतील. येके दिवसी सहश्र भोजन कोणी करील तर स्थल आहे. हे वर्तमान उभयता चिरंजीव व मातुश्री येईल तेव्हा सर्व निवेदन केले जाईल. पत्री काये म्हणून ल्याहावे? यावरसी गोविंदपतास लिहोन वीस रुपये पावते केले पाहिजे. आपण जिवंत आहे तो स्वामीचा धर्म कासीत विचारास येईल तो करीन. स्वामीचे छत्र ब्राम्हण २५ येक पैसा दक्षणा उत्तम भोजन पाच सेर अन माधोकरी यासी या खेरीज मी धर्म करितो. तीन ब्रह्मपूजा ब्राह्मणास दिल्या. चिरंजीव आबाजी व भिऊबाईच हस्ते येक ब्रम्हपुरी दिली. हा सर्व धर्म स्वामीचा आहे. मज धर्माचे अगत्य नाही. श्रीमध्ये देह सुटला म्हणजे

मोक्ष आहे. सर्व पुण्य स्वामीच्या पदरी पडो. मातुश्रीस राजमार्गें पाठविली. आपल्या पुण्यकरून उतम प्रकारें यात्रा होऊन तुम्हाजवळी पावतील. हे पुण्य कोणास येईल? रावजी येथे धर्म तुमचा होतो त्या पुण्यकरून हा लोक उत्तम आहे. परलोकी येथे येऊन मुक्त होईल त्यास संदेह नाही. द्रव्य बाईच्या यात्रेस एक रुपया लागेल त्याची बेजमी करून पाठविली पाहिजे. बहुत ल्याहावे तरी आपण सर्वज्ञ आहेत हे विनंती.

¶*Sadashiv Naik father of Babuji Naik who on behalf of the Peshwa was superintending the building of ghauts, temples and dharmashalas at Benares gives an account how the work was progressing.*

No. 3] *[11-1-1739*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी १

आज्ञाधारक लक्ष्मण विस्वनाथ कृतानेक सां नमस्कार विज्ञापि. येथील वर्तमान ताा पौश सुध त्रयोदसीपावेतों सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर भिकाजी जाधव वस्ती मौजे सदापूर ताा नाणेमावल या गांवीं पंधरा साले आहे. त्यास निंबा पाठारा वस्ती मौजे भाजे ताा मजकूर या गांवीं दोन वरसें होता, त्याणें आपली मुली भिकाजी जाधव यास सदापुरी लेकास दिली. लग्न जाले. त्यास पाच साले जाली. भिकाजी जाधव याचे कुल उतम नाहीं, म्हणोन निंबाजी पाठारा याचे बायकोने वेदमूर्ति राजश्री वीरस्वरभट याजवल फिराद केली. त्याणी येक रुपया मसाला करून सा मइनियानी सेंड+ आणून यावी ती दिली नाहीं. त्या उपर मागती मसाला येक रुपया घेतला आणि निरोप दिल्हे. त्याउपर मागती दोन रुपये मसाला करून मारूं लागले, तेव्हां तो फिरादीस आम्हाकडे आला कीं मुलीची काडी मोडून भटजी मागतात, मजला मारितात याचा सोध करणे. त्याचा सोध केला, त्यास ये प्रांतीं त्याचे जावई सदापूर ताा नाणमावलचा पाटील खंडोजी खराडा सोयेरिक आहे. सुभानजी जाधव त्याचा भाऊ चुलतभाऊ म्हणतो व त्याचा दुसरा जावई मौजे वाकी ताा चाकण येथे आहे. ये प्रांती तो दुसरे सोईरे नाहीत. को पुणे येथे आहेत. तीन पिढा पुणेयांत जाल्या. भिकाजी जाधव याची वस्ती मात्र नाहीं. हा काडी तो मोडून देत नाहीं. बायको तो वेदमूर्तीजवल जाऊन भर घालते, त्यामुळें ते तो यास

\+ लेखी जबानी.

कष्टी करितात. ते तपस्य, त्याजवल आमच्यानें तो बोलवत नाहीं. त्याजबद्दल आपणाकडे पाठविला आहे. याचे मोझे पुणियात आहेत. तो मोझा आपणाकडे पुणियात देतो म्हणून सेवेसी पाठविले आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञास. याचा करीना मनास आणून आज्ञा करणार स्वामी समर्थ असेत. याचा निर्वाह होईल त्या प्रो वेदमूर्ति राजश्री वीरेस्वरभट यास पत्र देऊन भिकाजी जाधव याची मुक्तता होइ ते केले पाहिजे. हे विज्ञात.

¶Lakshman Vishvanath requests Chimaji Appa for an injunction prohibiting Vireshwar Bhat Karve from obtaining a divorce for the daughter of Nimbaji Pathara married to the son of Bhikaji Jadhav.

No. 4] *[31-8-1743 ?*

श्री

सेवेसी विनंती. वेदशास्त्रसंपन्न राजश्री जनोबा उपाध्ये संनिध राजश्री स्वामी यांस वेथा परम कठिण. काल समीप प्रवर्तला आहे. याची लेक बाजी विठल देशपांडे यांची सून प्रस्तुत पुण्यास आहे. तरी बाजी विठल यास ताकीद करून जनोबा उपाध्ये याचे लेकीस जलदीने पाठवणे म्हणोन आज्ञा. ऐशास देशपांडे यास ताकीद केली, परंतु ती छ २१ रजबी बुधवारे अस्पर्श जाली. तैसीच रवाना करावी तरी मार्गी टोकऱ्यावर उतरावे लागते. तिजला टोकऱ्यावर बसावयास कार्यास नये. याजकरिता छ २४ मिनहू शनवारे चौथे दिवसी उपाध्ये याची लेक व जावई निगणार आहेत. ताकीद निक्षूण केली आहे. हे विज्ञापना.

¶This letter informs how a woman in courses had to postpone her journey to her dying father's place as she could not be admitted to the ferry boat plying across the river which had to be crossed.

No. 5] *[12-12-1750*

श्रीशंकर

श्रीशंभु सिखरी राजश्री महिपतराये कवडे याच्या विहिरीचा कारखाना चालतो, ते काम तातडतोब होऊन येत नाहीं. सदैव कामात खलल होते. तर बडवे व पातरूट व लोणारी यांस ताकीद करून श्रीचे काम सत्वर होऊन ये ते करावे. आपणास

7428

विहित आहे. धर्मकृत्याचें काम. त्याचे साहित्य करावें ते तो नाही. नस्ता उपद्रव करणे योग्य नव्हे. ते गोष्टीने पुनरपि बोभाट न ये ते करणें.

१ साबाजी बाजी घाटगे

१ नागोजी झुंझारराव घाटगे

यैसी दोघांस दोन पत्रे देवावी.

पाा हुजूर राा रुबरू छ २३ मोहरम सन इहिदे खमसैन.

¶*This letter requests orders for supplying labourers in connection with the building of a well at the shrine of the Shambhu Mahadeo Hill.*

No. 6] *[24-1-1756*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यासी

७ श्रीमंत सद्गुणनिधान कृपांविधान प्रतापवरिष्ठाभिधान निरंत भगवदनु संधान सावधान. श्रो माहाराव जसवंत निंबालकर दंडवत विनती. उपरी येथील क्षेम ताा छ २१ रााखर * * * ज्र निजानंद लेखन कीजे विशेष. कृ पत्र संक्रमाणाचे तिल शर्करायुक्त पाठविले ते पावोन परम समाधान जालें. कितेकानीं या तिळाचे लावण्य पाहून तिलोतमाच्या लावण्याचे मूळ हेच तीळ असतील ऐसे मानिले. अस्मत् चितानें कृपा श्नेहमये जाणोन आवडीनें शर्करासहित सेवितां रसनेस गोडी व चितास प्रतिक्षणी अभिवृधि लक्षणी श्नेहवशता प्राप्त जाली, तो विस्तर लिहिणियाहून विशेषतर असे हे विनंती.

¶*Janoji Nimbalkar acknowledges the receipt of Sankrant greetings from the Peshwa Nanasaheb.*

No. 7] *[26-11-1758*

श्रीचिंतामण

सेवेसी शंकराजी केशव सां नमस्कार विज्ञापना. राजश्री मल्हार राम (घारपुरे) पेठ शुक्रवार याचे पुत्र यानी कालापा जईन वाणी पेठ मजकूर याचे येथे चव घटका रात्री येऊन सोनाराचा प्रतिपक्ष धरून निरापराधी ब्राम्हणास मारावे, सोनाराने उगेच असावे, श्रीमंताची आणशेफत द्वाहीं दुन्हाई देत असता याणी बदमस्ती करून माणसापासून मारावे, हा काहीं ब्राम्हणाचा स्वधर्म नव्हे, हे वर्तमान सर्वास श्रुत्य केल; परंतु त्यासीं काही होत नाही म्हणोन स्वामी समर्थ आहेत म्हणोन श्रुत्य केल. इतरानी अन्याये केला तरी स्वामी सिक्षा लवकरीच

करितात. मातबरानी बंदमस्ती केली तरी पारपत्य करू नये, तेव्हा श्रीचा अवतार स्वामीच आहेत. घारपुरे याची बदमस्ती दूर होत नाही. तेव्हा आमचे पारपत्य करवणार स्वामी समर्थ आहेत. कारण काये तरी मातबराचा बोभाट राजद्वारी का आणिला म्हणोन पारपत्य केल तऱ्ही आम्ही राजी असो. त्याचे पारपत्य येक सभा व धर्मसभा याचे साक्षीने न्याये होईल तेव्हा त्याच्या वंशाचे पारपत्य श्री व ब्राम्हणच करवितील. मृत्यलोकी कोण्ही सामर्थ्यवंत घारपुरे याची बदमस्ती दूर करणार नाही ऐसा सिधांत न्याये शास्त्रमते जाला हे प्रमाण भृत्य होय. हे विज्ञापना. कार्तिक वद्य ११ श ८०

¶*Shankaraji Keshav lodges a strong protest to the Peshwa against the highhanded behaviour of the son of Malhar Ram Gharpure, whose deeds are mentioned as unbecoming a Brahmin.*

No. 8] [12-5-1764

श्री

हरिराम व नंदराम फधडे वगैरे खरगोणबतीसीकर याणी कुकसीकर दोघे ब्राह्मण, पिरजादे याचे सिश व त्याचे मार्गाने चालत होते. माणसे मेलिया-नतर अग्निदहनादि संस्काररहित, यैसे शंभर वरसे करीत आले होते, म्हणौन ज्ञाति बाहेर होते, त्यास गतवर्षी नंदराम याणी पंगतीस घेऊन बसला. ज्ञाति लोकास न पुसतां व शास्त्रोक्त प्रायश्चित न देतां आपले सगे सोईरे पंनास घरासी तल करून बसला आहे. ज्ञाति लोक म्हणतात त्याचे आईकत नाहीं. अनाचार प्रवर्त जाहाला आहे. त्यास पूर्वत ज्ञातिबाहीर करून आपण प्रायश्चित घेऊन सर्व ज्ञातीने यकत्र भोजन करावे म्हणौन मल्हारजी सुभेदार यास पत्र १

शत वर्षे यावनी मार्ग आचारला असता त्यास शास्त्र न पाहाता त्याचे ज्ञाति लोक हरिराम नंदराम यानी आणीक पनासा घरानी मिलोन त्यास पंगतीस घेतला. त्याचे आणीकहि ज्ञातीचे ब्राम्हण आहेत ते या गोष्टीस मान्य नसता या पनासाच घरानी तड करून आनाचार वर्तले आहेत म्हणौन विदित जाले. त्यावरून तुम्हास पत्र लिहा आसे. तरी काणत ज्ञातीचे ब्राम्हणावेतरिक्त दुसरे ब्राम्हण नागर वगैरे जे शास्त्रासंपन्न आसतील त्यास हा शास्त्रार्थ पुसोन शास्त्रमते निवडेल त्याप्रो हरिराम नंदराम वगैरे पनास घरे तड जाला आहे त्यांस वर्तवणे.

शास्त्रमार्गाने वर्तावयाचे न ऐकत त्यास सख्तपणे सांगोन शास्त्ररीतीने चालवणे म्हणौन मल्हारजी होळकर यास सदरहू प्रो पत्र देणे.

छ. १० जिलकाद वैशाख आर्बा सितैन.

¶*Hariram, Nandram and some other Brahmins had without proper sanction readmitted to their caste two persons who were following Mohammedan practices for about a hundred years in the past. The Peshwa asks Malharrao Holkar to consult learned Brahmins in this connection and deal necessary punishment to Nandram and other Brahmins for their irreligious behaviour.*

No. 9] *[18-5-1765*

श्री

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि ताा दताजीसेट बिन कृष्णाजी सोमवंसी कासार देशम्हेत्रे माहाजन दफत कासार व समस्त कासार प्राा कराड व माहालानिहाय सुाा खमस सितैन मया आलफ. तुम्ही हुजूर किनईच्या मुकामी विदित केले जे, जातीचे आपले जातीचे घरी लग्नकार्य होतात त्याची वरात कलसासमेत देवदर्शन होऊन जानवशाचे घरास मिरवत जातात, यैसे पूर्वापार चालत आलें आहे. यैसे आसता आलाकडे काा मजकूरचे वाणी यानी कजिया करून सातारियास जाऊन राजश्री विसाजी दादाजी याकडून मसाला रुा १०० शंभर आपणावरी करून नेले. त्यानी तहकिकात करिता वाणियासी पुसिले की, ये गोस्टीचा जाबस्वाल काय तो सागणे. तेव्हा वाणी जाबसाल देईनात आणि वादासहि उभे राहीनात. तेव्हा आपणास सागितले जे, तुमचे हातून सेटे माहाजन येऊन ये गोस्टीचा जाबस्वाल करीत असले तरी आणवणे, नाहीतरी आम्ही हुजुरून मसाले करून आणऊ. त्यास तुम्ही आर्जे केला जे, मी वतनदार, आपलीकडून आतर पडो देऊ नये. येक वेल मीच सेटे माहाजन यासी पत्र लिहोन पाठविती, उतर येईल तदनरूप जे करणे ते करावे, म्हणौन बोलिलो; आणि आपण सेटे माहाजन पाा कुलकर्णी यास पत्र पाठविले. त्यावरून सेटे माहाजन याणी समस्त दैवे[१] वाणी लिंगाईत यासी बोलाऊन आणून विचारिले की, वादास उभे राहाणे किंवा कासाराची समजाविसी करून घेऊन येणें! त्यास त्याणी उतर दिल्हे जे, तुम्ही आम्हास वडील व त्यासहि वडील आहा, तर त्यास घेऊन येणे. कासाराची

---

१ The caste collectively or assembled.

वरात कलससहित उभे पेठेतून मिरवायाचा कजिया जाहाला तरी यातिनिर्णय पूर्वीपासोन चालत आले आसेल त्याप्रमाणे पत्र करून देणे. यैसा करार समस्तापासोन होऊन सेटे माहाजन व कुलकर्णी सातारियासी येऊन आपली समजाविसी करून आले. येतेसमई चिमणगावी कैलासवासी येमाजीपंत आणा होते त्याची भेटी घेतली. सविस्तर वृत निवेदन केले. त्याणी चौकसी मनास आणून यातिनिर्णय ग्रंथ पाहोन सागितले की, कासार सोमवंसी यांची वरात कलसासहित मिरवावयासी आडथला नाही. यैसा निश्चयरूप शास्त्रमत बोलोन आपणास वस्त्रे देऊन सेटे माहाजन याचे हाती देऊन गावास लाऊन दिल्हे. गावास आलियानंतर सेटे माहाजन यानी आपले समस्त दैवाचे नावचे पत्र करून दिल्हे आहे. त्यावर लिंगाईत समस्त वाणी यांच्या साक्षी आहेत. काजीची मोहर आहे व कुलकर्णी याचे बिकलम व सेटे माहाजन याचे निशाने आहेत. समाकुल पांढरीच्या साक्षी आहेत. वाणियाचे नावनिसीवार पत्र द्यावें यास्तव जिल्हेकडील आमलदार व हुजूर मामलतीकडील आमलदार व देशमुख व देशपांडे व सेटे माहाजन व पाटील कुलकर्णी व समाकुल पांढर यैसे समस्त पेठेमध्ये बैसोन वाणियासी सांगितले, की तुम्ही आपलें पत्र नावनिसीवार करून देणे. ते बोलिले की, शास्त्राआधार असेल त्याप्राा आम्ही वर्तावे, कासारानींहि वर्तावे. यैसे हरदूजणाही बोलोन निश्चय केला आणि शास्त्रआधारे वर्तो, न वर्तो तर दिवाणचे गुनेगार म्हणौन कतबे दिल्हे. त्यावरी श्रीभैरव याच्या देवालयात सुभेदार व हुजूर मामलेदार व देशमुख व देशपाडे व सेटे माहाजन पाटील कुलकर्णी समाकुल पाढर यैसे समस्त ब्राम्हण सिस्ट वेदशास्त्रसंपन्न यास विचारिले की, वाणी याचा व कासाराचा जातिनिर्णये कैसा आहे? याणी कैसे वर्तावे पाहून सांगवे, म्हणौन बोलिले. यावरी त्याणी शास्त्रार्थ पाहोन, यातिनिर्णयाचा शोध करून, आपणास पत्र करून दिल्हे जे, कासार सोमवौंसी क्षेत्री व ब्रम्हक्षेत्री याची वरात कलसासहित उभे पेठेतून मिरवावी. ये गोष्टीविसी शास्त्रमते किमपि गुता नाही. त्यावरून समस्त वाणी यानी नावनिसीवार आपले पत्र करून दिल्हे आहे की, तुम्ही आपली वरात कलसासहित उभे पेठेतून मिरवीत न्यावी यैसे वाणियानीं पत्र करून दिल्हे आहे. त्यावर दफातवार व समाकुल पांढरीच्या साक्षी आहेत. यैसियासी दिवाणचे पत्र करून द्यावे म्हणून विनती केली. त्यावरून सिस्ट ब्राम्हण यानी ज्ञातिनिर्णयाचा शास्त्रार्थ पाहोन समस्त दैव वाणी लिंगाईत याची समक्षा पुरऊन हे पत्र तुम्हास करून दिल्हे आसे. तरी तुम्ही आपले जातिजमाताचीलग्ने करून वरात कलसासहित उभे पेठेतून मिरवीत देवदर्शन होऊन आपले घरास जात जावे. याउपरी तुमचे ज्ञातिची

वरात वंशपरंपरेने मिरवावयाचा संशय राहिला नाही. सुखरूप वंशपरंपरेने वरात मिरवणे. जाणिजे छ २७ जिलकाद निदेश समक्ष

बार सुरु सुद बार

¶*Shriniwas Pandit Pratinidhi issues an order establishing the right of Kasars to take their marriage processions accompanied by Kalash (an ornamented pot of water) to a temple. This right was disputed by another caste, the Lingayat Vanis of Karhad.*

No. 10] [*9-2-1769*

पौ छ ४ सवाल
तिसा.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री
शास्त्रीबावा स्वामींचे सेवेसी

विद्यार्थी मलोजी जाधवराऊ कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशल ताा माघ शुध्ध ३ त्रितीया येथास्थित असे विशेष. पुरुषाकडील तीन, स्त्रीकडील चार हें करावे किंवा न करावे, याचा शास्त्रार्थ कलला पाहिजे. यास्तव हे पत्र आपणास लिाअसे; तरी शास्त्रार्थलेखन केला पाहिजे. पिढ्या ताा:

पुरुषाकडील	स्त्रीकडील
१ मूळ पुरुष सुभेदार	१ मूळ पुरुष सुभेदार
१ सटवोजी जाधवराव पुत्र	१ कन्या फिरंगुबाई
१ जोत्याजी जाधवराव नातू वर	१ त्याची कन्या बुगाबाई
	१ त्याची कन्या वधू
३	४

याप्रमाणे असेत. कर्तव्य न कर्तव्यतेचें शास्त्रार्थ येईल त्याप्रों वर्तणूक केली जाईल. विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*Maloji Jadhavrao requests Ramshastri to decide whether a marriage of the grandson from the male line of Pilaji Jadhav with the great grand-daughter from the female line of the same person, was allowed by the Shastras or not.*

No. 11] *[11-5-1771*

पो छ २९ मोहरम
इहिदे सबैन.

श्री

सेवेसी बापूजी माहादेव सां. नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ २२ मोहरमपर्येंत येथास्थित आसे विशेष. पत्र पाठविले ते पावले. खंडो शामराज याचा लेक निंबाजी खंडेराव याणे येऊन निवेदन केले की, माझी बाइको गुदस्ता प्रसूत जाहाली. त्या सोयेराचा लोप मोरो बावाजी याचा लेक सखो मोरेश्वर याणे करून श्राधी पंक्तीस ब्राह्मणाबरोबर भोजन केले व श्रीस आभिशेक करून नैवेद्य दाखविला. त्याजवर हाली आमची भावजई म्रत्य पावली. तिच्या सुतकाचा लोप करून सर्वास स्पर्श केला आणि बापूजी माहादेव याचे घरी आहेर केला म्हणून निवेदन केले. तर सखो मोरेश्वर यास आणून त्याचे आंगी सदरहू आपराध लागू जाहाले म्हणजे आत:पर त्यास गावात कोन्ही पंक्तीस घेऊ नये अगर भोजनास त्याचे घरी जाऊ नये. याप्रमाणे गावकरी यास ताकीद करून सखो मोरेश्वर यास हुजूर पाठवणे म्हणून आज्ञा. येसियास खाडे व समस्त ब्राह्मण यास बोलाऊन आणून याजदेखता सखो मोरेश्वर यास पुसिले. त्यानी येणेप्रमाणे सांगितले जे, आपला बाप मेला त्याचे सुतक खंडो शामराज याणे धरले नाही यामुले आपणहि सुतक धरले नाही येसे बोलला. गंध आक्षता लाविल्या. आमचे घरी पाटील कुलकर्णी आहेर करावयास आले. त्याचा मूल मागून येऊन बसला. त्याउपरी खंडो शामराज याणे येऊन गलबल केली. त्यास आम्ही स्नान करून मग साडे करावयास गेलो व कुलकर्णी खाडे मजकूर याणेहि स्नान केले. समस्त ब्राह्मण बोलले जें, आपली आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तनूक करू. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Bapuji Mahadev explains to the Peshwa the conduct of one Sakho Moreshwar in not observing the period of pollution on account of birth and death, and solicits Peshwa's orders in the case.

No. 12] *[21-9-1772*

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री
पाठकजी यांसी

विनंती उपरी. सिवाजी उतरा कोष्टी वस्ती काा पुणे याणे रामजी गायकवाड कुणबी वस्ती काा मजकूर यांची कंन्या आपले लेकास करून पाट लाविला.

त्यास रामजी गायकवाड म्हणतो की, सिवाजीने आपण जातीचा कुणबी ऐसे सांगोन माझी कन्या आपल्या लेकास करून पाट लाविला. पुढे सिवाजी मजकूर जातीचा कोष्टी यैसे आपणास कलले. यास्तव आपली कन्या देत नाही म्हणून व सिवाजी कोष्टी म्हणतो की रामजी गायकवाड याची कन्या आपल्या लेकास करून पाट लाविला तेव्हा आपण जातीचा कोष्टी ऐसे सांगितले होते; परंतु त्यास साक्ष कोणी नाही म्हणून, याप्रों हरदोजणाचा कजिया लागोन मनसुफी सरकारांत पडिली त्यावरून अपणास लिहिले आहे. तरी येविसीचा विचार शास्त्रता करून लहून पाठवावे. रा। ख २३ जमादिलाखर सु॥ सलास सबैन मया अलफ बहुत काये लिहिणे.

¶*One Sivaji Utara of the weaver caste got his son married to the widowed daughter of Ramaji Gaikwad, Kunbi by caste. The latter discovering that his new relatives did not belong to his own caste refused to send away his daughter to her new home when she was claimed by her husband. The affair is referred to the learned opinion of one Pathak who seems to be well versed in Shastras, to declare an authoritative opinion on the dispute.*

No. 13] [*22-9-1772*

पौ छ २१ साबान नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये
राजश्री शंकराजी केशव स्वामी
गोसावी यासी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणे विशेष. वो रो दिनकर जोसी सिनरकर याची घरची कुलबीण बनाम राजी हे सिनरातून पलोन गेली, यासी सा सात वर्षे जाली. तिचा तलास करितां हालीं बालोजी कदम माजी हवालदार किले त्रिंबक याचे घरी पुण्यांत सापडली. आपण मागो लागलों त्यास तो म्हणतो की कुनबीन चुकारी किले मजकुरी आली, ते आमचे तसलमातीस सरकारातून लेहून मात्र दिली आहे. तिजला सेर देऊन चाकरी घरीं करिते. त्यासी आमचे तसलमात दूर करऊन पत्र आणून कुनबीण घेऊन जाणे यैसे बोलतो, म्हणून वेदमूर्तिने विदित केले. त्याजवरून पत्र सादर जाले असे; तरी किले मा।री बंदी सिलकेस हिसेबीं उतरली आहे, तेथे या कुनबीणीची रुजुवात पाहोन बालोजी कदम याकडील तसलमात दूर करून भटजीची बटीक भटजीस देवणे. फिरोन बोभाट येऊ न देणे. जाणीजे छ २४ जा।खर सु॥ स[लास] सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Orders to restore a female slave to her former owner are issued to Shankaraji Keshav by Peshwa Madhavrao.*

7435

No. 14] [30-5-1777

श्री

गैरआदा तूर्त दोन महिने करावी.

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य
राजश्री नारो माहादेव गोसावी
यासीं

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा सबा सबैन मया व अलफ. समस्त कुंभाराची वधूवरें घोड्यावर बसवावयाचा करार करून कुंभारापासून नजर गांवचे ऐन तनख्यास दरसदे अर्धा रुपयाप्रमाणे घ्यावयाचा करार सन सलास सबैनात जाहाला आहे. त्यास ताा कर्यात मावल येथील गावगंनाचा यैवज येणे ते बाा देणे प्यादे व जासूद यांचे रोजमरे याचे वाटणी पौ मोघम रुो

१३५॥. प्यादे दिाा हरिसिंग व बुधसिंग चाकणकर.
१०० जासूद जथे हाय निाा दफ्तर येकबेर्जी यास.

२३५॥.

येकूण दोनशे साडेपस्तीस रुाा देविले असेत; तरी सदरहु प्रो आदा करून पावलियाचे कबज घेणे. जाणीजे छ २२ राखर. आज्ञा प्रमाण.

¶*A decision allowing the potter caste to use a horse for carrying the bride and the bridegroom in a marriage procession is referred to n this paper.*

No. 15] [1777-1778

श्री

दिाा बाो लक्षुमण बिन अवचितराव देशमुख प्राा सगमनेर सुाा समान सबैन मया व अलफ. कारणे साहेबाचे सेवेसीं लेहून दिल्हा कतबा यैसाजे. धांदरफलकर कवडे देशमुख याची मूल प्रीतिराज देशमुख सेलके प्राा मजकूर हे शंकरराव देशमुख याचे चुलते याचे लेकास देऊ केली. मागणी जाली. त्याजवर चौहू वर्शानी सोइरिक मोडली. कशामुळे मोडली हे आपणास ठाऊक नाहीं. मागणी जाल्यावर प्रतिकूल उभयेपक्षी जाल्यास सोइरिक मोडती. याप्रमाणे आमचे कुली चाल आहे. आमचे सात पुस्त पाट लागला नाही. शंकरराव याचे चुलते भवानजी देशमुख यांची आई पाटाची, त्याचे पोटचे याप्रमाणें खरे करून देऊ. न देऊ तर दिवाणचे गुन्हेगार. हा कतबा लेहून दिल्हा.

बिाा आपाजी दत्तात्रय देशपांडे प्राा वाई कराड.

¶*One Deshmukh explains why he had to cancel the marriage proposal made with another Deshmukh.*

No. 16] [23-3-1782?

श्रीरेणुकावरद

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नारायण दीक्षित बापट गोळपकर यासी प्रति

स्नेहाभिलाषी गोविंद कवीस्वर नेवासकर यांचे अनेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष. आमचा बृध्धांपकाल जाला. पोटी संतान राहिले नाही. जीर्ण बहुत जालो. यास्तव चतुर्थाश्रम संपादून श्रीमाहुली संगमी जलसमाधिस्त होणार म्हणोन आम्हाजवळ श्रीरामचंद्राच्या मूर्ति आहेत त्यांचें पूजन व उछाहा आम्ही करीत होतो तो चालला पाहिजे. यास्तव तुम्ही थोर ब्राह्मण तुम्हास दिल्याने सर्व पूजन उछाहादिक चालेल ऐसे पाहोन तुम्हास श्रीरामचंद्र देवतार्चन दिल्हें असे. तुम्ही अग्निहोत्रादिक षट्कर्मे पारंपर्य चालवितां, तैसाच रामनवमीचा उछाह चालविल्यास चालवावा. आमचें वर्षासन रुपये तीनशे नेवासे येथे चालत आहेत, ते तुम्ही श्रीमंताजवळ पुसोन आपणाकडे करोन घ्यावे. धर्मसंस्थापक आहेत, तुम्हाकडे करून देतील. बहुत काय ल्याहावे हे साष्टांग नमस्कार. शुभकृत नाम संवत्सर चइत्र शुा रामनवमी

येये भूमिभुजः स्वधर्मनिरताः क्षोणीतले भाविनो
बद्ध्वा हस्तयुगं दढं सविनयं तान् याचतेऽसौ कविः ।
नो धर्मो मम भूमिपाः प्रभवतामेवास्ति धर्मः सताम्
काले भाविनि भावुकैः करुणया संरक्ष्यतां सर्वदा ॥ श्री ॥

¶*Govind Kavishwar entrusts his idols of Ram and their worship to Narayan Dikshit, being very old himself and wishing to end his life by drowning at the sacred confluence of Mahuli.*

No. 17] [13-5-1787

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र सिवाजी स्वामी गोसावी यासी

पोो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. विरापा रोकडे वाणी वस्ती कसबे सोलापूर याणी हुजूर विदित केले की, माझे बापाची माऊसबहीण नागावा लाहान होती, तेव्हा काल पडला ते समई देशांतरास गेली. ती मैरालास आमचे जातीचा वाणी होता त्याचे घरी जाऊन राहिली. तिचे लग्न जाले नसता दोघे लेक

7437

वाण्याचे पोटचे जाले. याची नावे वेकापा व सैदापा. ऐसे दोघे मूल घेऊन पुन्हा सोलापुरास आली. त्या दोघांची लग्ने नागावाचे वैवाटीप्राो जाली. जातीत त्याचे हातचे पाणी कोन्ही घेईनात. तेसमई गोतास मी शरण जाऊन पाणी घ्यावयास आधिकारी केले. त्याप्रों पाच साहा वर्षे चालले. त्याजवर माझे घरी लग्न होऊ लागले ते समई हकिमास तिने गैरवाका समजाऊन पंक्तीस अन्न-वेव्हार करावा म्हणौन लग्नास अडथला केला व हाली माझे लेकीचे लग्नाची योजना केली आहे त्यास अडथला करितात की आम्हास पंक्तीस घ्यावे. येविसी आज्ञा जाली पाहिजे म्हणोन, त्याजवरून हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी वेकापा व सैदापा बदआमलापासून उत्पन्न जाले. त्यास जातीत घेणे ती गोताची रजावंदी व सरकारची आज्ञा पाहिजे. हे येकीकडे ठेऊन विरापा वाणी याचे बापाचे माऊसबहिणीचे लेक आपल्यास जातीत घ्यावे म्हणतात. याचे घरी लग्नप्रयोजनास दुराया देतात. याचे कारण समजोन हरदूजण लबाडी करीत असतील त्यास ताकीद करून विरापासी कजिया व लग्नास अडथला करू न देणे. वाजबी असेल ते करणे. जाणिजे छ २४ रजब सुाा सबा समानीन मया व अलफ बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa orders that no hindrance should be offered to Virapa Rokde performing his daughter's marriage. His aunt and her two illegitimate sons should be warned accordingly.*

No. 18] [*25-1-1792*

२ माहाल जामदारखाना रोजकीर्द
स्वारी राजश्री पंतप्राा सुरु इसने
छ ३० माहे जोवल

खर्च सनगे येकूण आंख

सिमगा खर्च सालगुाा सन इहिदे तिसैनात वाडियांत खेल करविले त्याची बिदाई राा याद चिठी छ २८ मोहरम कापड आख

१८७॥

ताा ज्याचे ते वगैरे सनगे येकूण आंख

मानसिंग जोहरी आख ५० गोविंदा इंदुलकर आख ७५

7438

ता। खुद सनगे आख
४८ तिवटे २ दर २४
२ खादी पो ·॥·

९० रु. २॥

बापू सिंपी आख
२९
ता। गोविंद इंदुलकर शेले
रगधे रूजू गोलदार
१६ प्रा १
९ प्रा ·॥·

२९ १॥

सुभाना राऊल आख
२९
ता। खुद
२४ गोलदार
१३। १०।।।

२४ २
१ खादी पो ·।·

२९ २।·

भवानी बाबाजी आंख
४०
ता। बालाजी अनंत केलकर
तिवट १ आंख
४०

संतू वाणी आख
२९
ता। बालाजी आनंत केलकर
कारकून सिलेदार

ता। खुद सनगे आख
९७॥ तिवटे
३१। २६॥

९७॥ २
१७। गोलदार
१२।।। प्रा १
४॥ प्रा ·॥·

१७। १॥

३॥

७९ रू.
सिदू राऊल आख
३७॥
ता। खुद
३९। तिवटे
२०। १९

३९। २
२। खादी पो ·॥÷

३७॥ २॥÷

राणोजी सिंपी आख
२९
ता। बालाजी अनंत केलकर तिवट
१ यो आख
२९

हरि माहादू आख
४०

ता। बालाजी आनंत केलकर
तिवट १ आख
४०

7439

२२। गोलदार १
२॥। तिवट ०

२९ १

राणू बेल्या आख
४०

ता। बालाजी अनंत केलकर
१४॥ तिवट ।
२९॥ लुगडे १

४० १।

तुल्या सोंगाडी आख
२९

ता। बालाजी आनंत केलकर
लुगडे १ आख
२९

गरभया आख
२९

ता। बालाजी आनंत केलकर सनगे
येकूण आख
२ जोट ८≡
२३ खण

२॥	३	३	३
३॥	३	९	०
२३		७	
२९		७८≡	

सिदू बेलसरकर आंख
२९

ता। बालाजी आनंत केलकर गोल-
दार १ यो आंख
२९

महादू गुराखी आख
३०

ता। बालाजी आनंत केलकर
सनगे आख
११॥। तिवट १
१९ धोत्रजोडी १
३। खादी पो ।॥÷

३० २॥।÷

बाला बहिरू आख
२९

ता। बालाजी आनंत केलकर तिवट
१ आंख
२९

होना गवली आख
४०

ता। बालाजी आनंत
२६॥ लुगडे १।
१३॥ जोट १

४० १॥.

रामा गवंडी आख
२९

ता। बालाजी आनंत केलकर
२४। गोलदार १।
।॥। सेलाजोट ८÷

२९ ।॥÷

[या पुढील बंद ३ याचे सुरवातीचा मथला तोच आहे पण थोडा फरक आहे सबब घेतला तो व त्या खालील खर्च मागील बंदावरून पुढे चालू]

माहाल जामदारखाना स्वारी राजश्री पंतप्रधान खर्च छ ३० माहे जोवल सिमगा खर्च सालगुदस्ता सन इहिदे तिसैनात वाडियांत खेल करविले त्याची बिदाई कापड — रोजकीर्द सुरु इसने आख

गंगू पोव्या — आख. २०

ता। बालाजी अनंत केळकर ताफ्ता कद ·।=

आख २०

गंगू भोरकर — आख २५

ता। बालाजी अनंत केलकर आख

२५ ताफ्ताकद ·।।·
० लंग
२५ ·।।·

बेल्या धोंड्या आख ५०

ता। बालाजी आनंत लुगडे पो ·।·
आंख ५०

शेवगावकर — आख २५

ता। बालाजी आनंत लुगडे पो ८=
आंख २५

लहरी मुकुंदा — आंख २५

ता। बालाजी आनंत
१८ खण
१५ प्रा ४ दर ३।।।
३ प्रा १
१८ ५
२ ताफ्ताकद ८=
५ गजनी ८≡
२५ ५।÷

मोध्या — आंख २०

ता। बालाजी आनंत
१२ ताफ्ता कद ·।·
८। सकलाद नारंजी गज ·।।· दर १६।।
२०। — सनंग गज ·।· ·।।·

धोंडी सिंपी — आख ४०

ता। बालाजी आनंत ताफ्ता कद ·।।।:
४० आख

सदासित्र पेठकर आख
२०

ता। बालाजी आनंत सकलाद गज १। दर १६॥ प्रो आख
२०॥=

भवई आख
२५

ता। बालाजी आनंत लुगडे प्रा। ८= आख
२५

माणकू मैराला आख
२०

ता। बालाजी आनंत केलकर लुगडे.
पैठणी
८÷
आंख
२०

नारोबा सिंपी आख
२०

ता। बालाजी आनंत लुगडे प्रो ८÷
आख
२०

भोरकर आख
२५

ता। बालाजी आनंत लुगडे प्रो ८÷
आंख
२५

धावजी परीट आख
२०

ता। बालाजी आनंत केलकर आख
३ ताफ्ताकद ८÷
१७८÷ गज वार गज
१६॥ सकलाद गज
१

॥÷ मखमल गज
८॥

१७८÷ दर २७

२०८÷ १८॥
सनंग गज
८÷ १८॥

हरिसिंग आख
२५

ता। बालाजी आनंत केलकर लुगडे पो ८− आख
२५

जोगेसरी गोसावी आख
५०

ता। बालाजी आनंत लुगडे प्रो ।· आंख
५०

7442

तेरीज येकंदर सनगे यो आंख

३००	तिवटे	११।·
१३७॥।	सेले गोलदार	७॥·
७७	लुगडी	२॥·
४१	खण	१=
१६।	जोट	१।·
१०२	ताफ्तेकद	२८÷
९	गजनी	८≡
१९	धोत्रजोडा	१
२४०	लुगडे पो	१
८॥	खाद्याप्रो	२८=
९४२॥·		४०॥।=

४९॥।≡ गजवार गज

४९।= सकलाद गज २॥।.

·॥÷ मखमल गज ८॥ तसू

४९॥।≡	२॥।·॥·

९८८।≡	सनगे	गज
	४०॥।=	२॥।·॥·

¶*The above is a list of the dresses and presents which the Peshwa distributed to his players and bards in the Holi festival of 1791.*+

No. 19] [*16-9-1794*

नकल

श्री

ता। येसी कुणबीण धनगरीण सु॥ खमस तिसैन मया व अलफ. तू पेशजी सरकारात बटीकपणा करून होतीस, त्यास हाली तूं सोड मागितलीस त्याजवरून तुजला सोड दिल्ही असे. तरी हरयेक जागा पोट भरून सुखरूप राहाणें. तुजला सरकारातूंन हरयेकविसी तोसीस लागणार नाही. जाणिजे छ २१ सफर मों

¶*This is a certificate of manumission given to a female slave of the shepherd caste. She is allowed to go and earn her livelihood.*

+ ह्या जमाखर्चाच्या नोंदींत कांहीं शाहिरांचीं नांवें आलीं आहेत, त्यावरून त्यांचा काळ समजून येतो.

No. 20] [2-3-1797

श्री

यादी भोजनांस आमंत्रणे करावयाची मंडली मिा फालगुण शुध ४ गुरुवार

१ बापू गोखले
१ अंताजीपंत मामा गद्रे
१ रामचंद्रपंत सुभेदार
१ विठ्ठलपंत पटवर्धन
१ आपाजीपंत सेवडे
१ विनायेकपंत घागरेकर
२ सदासिवपंत बापू व
बाबाजी कोडविलकर
१ बाबाजी रास्ते
१ धोंडो * * *
भागवत
१ बापू भिडे
१ चिंतामणभट खेर
१ नारोपंत नाना आपटे
१ जिवाजीपंत हवालदार
१ धोंडोपंत लिमये
१ बालाजीपंत आगाशे
२ बापूभट व मोरोपंतभट
१ वासुदेव सिवराम जोसीं
१ गणेशपंत साठे
१ भिकाजीपंत वाघ
१ आणा वाघ
१ बापू गडबोले
१ वेंकाजीपंत जोसी
१ वासुदेवपंत मामा मराठे
१ बालाजीपंत मामा मराठे
१ बापूजीपंत मराठे
१ मोर दीक्षित नाना
१ नारायण दीक्षित
१ भयासाहेब
१ नारायणराव हशमनीस
१ बहिरोपंत सहस्त्रबुधे
१ धोंडोपंत नाना साने
१ नारोपंत नाना गुरुजी
१ धोंडोपंत दादा जोसी
१ रावजी देशमुख मंडलीसह
१ आणा देशमुख
१ सदासिवपंत दादा मोडक
१ बाबा ठोंसर
१ केशवराव वाघ
१ भाऊ भिडे ताथवडकर
१ जनोबा आगाशे
१ भास्करपंत कोलटकर
१ भाऊ लिमये
१ आन्याबा लिमये
१ जिवाजीपंत आपा जोसी
१ जनार्दनपंत जोसी
१ ताल्या गोरे
१ राघोपंत ताल्या जोसी
१ आपाजीपंत आगाशे व
सदासिवपंत दात्ये
१ दाजीबा जोसी
१ गणेशपंत सोमण

१ यज्ञेश्वरभट बापट | १ बापू खाडिलकर
१ बापू कवडी | १ बापू मेहेदळे

२९ | २८

१ पांडुरंगपंत खरे | १ भिमाजीपंत काथवटे

¶*This is a list of persons invited by Bajirao II for dinner.*

No. 21] *[1800-01*

श्री

यादी घरपटी माफ आसामी येकंदर पेठ रविवार कसबे पुणे सुा इहिदे मयातैन व अलफ

४७॥	फकीरचेंद
७९॥	इमाम मुलाणा
६	विसोबा नाा सराफ
३६	हरिभक्ति
२५	कृष्णाजी भैरव थते
१५	जिवबा नाा वाकडे
१४	महिपतराव प्रल्हाद
९	बालकृष्णशास्त्री
१०	गंगा विष्णु वैद्य
१०	धोंडोबा आपा पुरंदरे
१७	विसाजी कृष्ण बिनीवाले
१२	रंगोबा नाा वानवले
२९१	
५०	वर्षासन श्रीव्यंकटेश देवांस नैवद्य नंदादीप.
३४१	

¶*This is a list of persons who were exempted from the house-tax at Raviwar Peth, Poona.*

No. 22] [22-12-1748?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायेत छ १२ मोहरमपावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरून या प्रांतीचे व सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. रा। येशवंतराव येरूडकर यांजविसी स्वामीनी दोन तीन आज्ञापत्रें पाठविलीं त्यात सारांश अर्थ, मोकासी येक दोघे सरदार येऊन येरूडकराची समजावीस करून नेऊन पंक्तीपावन करावे. हे निक्षूण राजश्री बालाजी चंदरराव व राजश्री बाजीराव बेलोसे व समस्त लोक मोकासी यांस निक्षूण सांगोन उतर पाठविलेंत नाही; दिसगत काये म्हणोन लाविली? मातबर माणसास फेऱ्यात पाडावें हें उतम नाहीं. तरी चौघे मोकासी पाठऊन यास नेऊन पंक्तीपावन करणे म्हणोन आज्ञापत्र सादर जालें. त्यावरून यांस बहुत प्रकारें सांगितलें. त्यास हे म्हणतात की, आम्हास हुजूर जावयास निरोप द्या. त्यास सांप्रत राजश्री बाजीराव बेलोसे व कितेक मोकासी अरमारावर स्वारीस गेले आहेत ते येतांच अरमारची व किल्याची बंदोबस्त करून मोकासी सरदार राजश्री बालाजीराव व बाजीराव देखील सेवेसी येऊन पावतील. आज्ञे-प्रमाणे वर्तणूक करतील., व स्वामीनी लिहिले कीं उतरास दिसगत लागली. त्यास पहिलीं पत्रें छ ४ जिल्हेजची सादर जालीं ती छ २ मोहरमी पावलीं. तीं इतके दिवस मध्यें कोठे राहिली होती हे न कले. येथे आलीयावर समस्त मोकासी लोक जमा करून आज्ञेप्रमाणे सांगितलें. त्याणी उतर दिल्हें कीं, फाल-गुनमासी हुजूर जाऊन. आतांच जाऊ तर खावंदाची आज्ञा हुजूर यावयाची नाही. गोव्ये याची आवाई स्वामीनीच आज्ञापत्रीं लिहिली होती याजकरितां अखेर माघ मासापावत यांस राहून घेतले. फालगुन निघताच राजश्री बालाजी-राव व बाजीराव व समस्त मातबर माणूस मोकासी सेवेसी येतील. स्वामीनी आज्ञापत्रीं लिहिलें की, मोकासी लोक पंक्तिपावन न करीत तरी त्यांचे भाऊबंद सोइरे धाइरे आहेत त्यांजकडून पंक्तीपावन केले जाईल. त्यास जे स्वाम करितील ते होईल. यांस येथे गुंता जाला तो स्वामी सेवेमुले जाला. यास येथे निक्षूण सांगावयाचे ते आज्ञाप्रमाणे सांगितलें. यांची बोली कीं, ते बाइको गोताचे स्वाधीन करावी. मग आज्ञेप्रमाणे तिची विल्हे होणे ती होईल; अथवा ते बाइको येरूडकराचे स्वाधीन न करावी व गोताचे हातीं न द्यावी. तिसरें जागा असों द्यावी आणि येरूडकरांस वसईस आज्ञा करून पाठवावे. येथेंच पंक्तिपावन

आज्ञेप्रमाणे करितील अगर कल्याणास पाठवावे, तेथे जाऊन पंक्तिपावन करितील. सिंदी बाइको मात्र प्रस्तुत हे सेवेसी येत तो पावेतो उभयेताकडे न द्यावी यैसे करावें. हा निश्चये होऊन आला म्हणजे येरूडकरास पाठवावे. आज्ञा होईल तेथें पंक्तिपावन करितात. यांचा हा विचार आहे. स्वामीस कोणी विदित करितील की यांत शंकराजीपंतास यांचा अगत्येवाद आहे. तरी मजला दोनी सारिखे म्हणोन मी पहिलेपासून स्वामीस लिहीतच आहें. सारांश दोनी स्वामी रक्षितील. ते बाइको उभयेतांचे स्वाधीन न जाली म्हणजे हे रजावंद आहेत. येरूडकरास पंक्तिपावन करितील. सेवेसी विदित जाहलें पाहिजे म्हणोन लिहिलें असे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshao explains to the Peshwa why he had to delay the execution of the Peshwa's orders for admitting back into the community one Yeshwantrao Yerudkar.*

No. 23] [*1767-68?*

श्री

शेवेसी बखतनाथ बैरागी कानफाटे विज्ञापना ऐसी जें. गोंधली व डौरे गोसावी या उभयेतांचा सूरसंबलाविसी कज्या होता. त्यास श्रीमंत कैलासवासी नानासाहेब व भाऊसाहेब याणी मनास आणून डौरे गोसावी याणी संबल वाजवावा ऐसा ठराव करून डौरे याजपासून हरकी रुा ५००० पांच हजार करार करून गोविंदराव चोरघे यास जामीन सरकारांत घेतले. डौर गोसावी याणी गोविंदराव मजकूर यांस आपले नावाचे कतबे पाच हजाराचे दिल्हे. पुढे कर्जेहि गोसावी याणी वारिले. कतबे सोडऊन आणिले. ते कतबे गोविंदराव मजकूर याणी पालिती लाऊन चोरून नेले आणि सरकारचे बोथाटी बारदार घेतले की आपले रुा गोसावी याजकडे आहे ते वसूल करावयास म्हणौन घेतले; आणि बोथाटीबारदार व आपण मिलोन मुलकात डौरे गोसावी यांजवर पटी करू लागले ते आजपर्यंत करीतच आहेत. सतावीस हजार रुा याच्या पावत्या आपणाजवल होत्या, त्या पिराजी माली तलेकर व गोपालजी काले याणी पावत्या व घर ऐसे स्वारी घालून लुटून नेले. आलीकडे दोन वर्षे सतावीस हजाराखेरीज वसूल जाहाला आहे आणि हालीहि करीतच आहेत. याजकरितां स्वामीनी कृपाळु होऊन याची चौकसी केली पाहिजे. सदरहू रुपये पोत्यास आले असिले तरी पावती देविली पाहिजे. नाही तरी गोविंदराव वगैरे यासी

7447

हुजूर आणऊन चौकसी पाहून हाली मुलकात रुा वसूल कारितात, याची ताकीद करावी व वसूल जाले रुा याची चौकसी करणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

¶*Bakhatnath Bairagi (Kanphate) makes a complaint against one Govindrao Chorghe for exacting from the Daure Gosavis money which had already been paid to him.*

No. 24] [?

तालीक.

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेबाचे
शेवेसी

विनंती सेवक हरि उमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ २ सवालपावेतो आपले कृपेकरून येथास्थित असो विशेष. आपले आज्ञेप्रमाणे नासिकास आलों. ब्राम्हणाचा तट मोडावा त्यास उभयतां तटाचे ब्राम्हण सर्वाच्या भेटी सभ(भ्य) आहेत त्यांच्या घेतल्या. बहुताप्रकारे प्रार्थना केली, परंतु धाकट्या तटाकडील विश्वनाथभट भातोंडीकर याचे तिघे पुत्र आहेत त्यास थोरल्या तटाकडील ब्राम्हणांनी धरून मारामार केली, सिबंदी ठेऊन धामधूम करितात, धाकट्या तटावर चढून जातात. दादंभट बील व विश्वनाथ भातोडकर यांस विनंती केली. त्याणीं उत्तर केले की जे सरकारची आज्ञा ते आम्हास सिरसा. परंतु थोरल्या तटाचे ब्राम्हण, त्यास बहुता प्रकारे सांगितले परंतु त्याच्या ध्यानांत येईना; आणि हकमाची गुडगा याकरितां बापूभट भानोशे व जगंनाथभट झिटे व रंगभट वैद्य व त्रिंबकभट शुक्ल व वासुदेवभट भातोंडीकर यैसे त्याचा आग्रह फार. सरकारातून राऊत आले त्याणी सिबंदीचे प्यादे धरून हुजूर आणावे. त्याजवरीं कमाविसदाराची स्वारी जाऊन प्यादे धरून दिल्हे नाहींत. चौघे प्यादे धरून नेले. राऊताकडील घोडे जखमी जाले. आम्ही आपला वकूब जितका होता तितका खर्च केला परंतु ना आयकत. आम्हावरी चाढाई करून आले तेव्हां आम्ही कोणता उपाय करावा? समक्ष आलियानें निवेदन करीन. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Umaji reports to the Peshwa an altercation between the two parties of Brahmins at Nasik which they continued in defiance of his orders.*

No. 25] [24-8-1772 ?

पौ छ २७ जमादिलावल.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक महादाजी नारायण साा नमस्कार विज्ञापना. ताा छ २४ जमाादिलावलपावे(तो) स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर हुजूरचे आज्ञापत्र सादर जाले तेथें आज्ञा कीं, नरहरि रनाळेकर याजला येवनानी पानपथातून धरून नेऊन भ्रष्ट केले. तो दाहाबारा वर्षे त्यांतच राहून येवनमय जाहला असतां त्याजला पैठणास कांहीं ब्राम्हणानी शुध केला. येविसीचा कजिया हुजूर पडला होता तेव्हां वैदिक व पंडित यांची सभा करून शास्त्रता मनास आणितां दाहाबारा वर्षे येवनमय जाला त्याजला शुध्ध करावयाची अर्हता नाहीं, शुध केला हे अयोग्य, याप्रमाणें ठराव होऊन ज्यानी शुध केले त्या ब्राम्हणास बहिष्कार पडला होता. त्यापैकीं बहुतेकांनी प्रायेश्चित घेऊन शुध जाले. बाकी चालीस पंनास आसामी अत्याग्रहे प्रायश्चित न घेत यामुळें बहिष्कृत राहिले होते ते हली पैठणी मोगलाकडील कमाविसदाराची हिमायत करून जबर-दस्तीने आपली व शुध ब्राम्हणाची पंक्ति करून येकाकार केला आहे म्हणोन हुजूर विदित जाहालें, त्यावरून हे पत्र सादर केले असे. तरी पैठणकर ब्राम्हण असल्यास त्याजला ताा अमदानगर येथे पंक्तीस न घ्यावें. याप्रमाणें सर्व ब्राम्हणाचे घरीं ताकीद करणें म्हणोन आज्ञा. त्यास हुजूरचे आज्ञेप्रमाणें तालुके मजकुरीं सर्व ब्राम्हणांस पैठणकर ब्राम्ह पंक्तीस न घेणे म्हणोन ताकीद केली. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Narayan executes the Peshwa's order regarding the ex-communication of the Brahmins of Paithan who admitted back into their caste one Narhari Ranalekar who being converted to Islam after the disaster of Panipat, lived as a Mohammedan for about ten years.*

No. 26] [1750 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक सिवाजी बलाल चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. ताा छ ४ रमजानपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून किले मिरजेचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विज्ञापना ऐसीजे. येदां या प्रांतात नापीक जालें. त्यास दिवाणचा रुपया तो वसूल जाला पाहिजे. रुपया वसूल करून पुढें लावणी

संचणी व्हावी, ऐसियास इटे व भालवणी खानापूर तासगांव व सावलज येथून चोरीचा उपद्रव मुलकांत बहुत होतो. इव्यामध्यें राजश्री भगवंतराऊ त्रिंबक यांचे खासगत कोठीस बैल सा उमगले. त्यास बैलाविसीं लिहून पाठविले तरं तपसील लिहीत. बैल वळखून नेटी लाविले तेव्हां साहापैकी चार बैल सोडिले. तसेंच सावळजेत उधो वासुदेव होते त्यांचा उपद्रव चोरीया होऊ लागला. अजनीचे बाजारकरी वाणी याचे कापडाचे दींड नेले. माग सावळजेस लागला. जाबसाल करीनात. मग लोक पाठऊन ठाणे सावळजेचे घेतलें. तऱ्ही तासगांव खानापूर येथील उपद्रव चुकत नाहीं. तसेच कोल्हापुराकडील चोरीचा उपद्रव होऊन गुरें घोडी गेलीं त्याचा दागदूम लाऊन ज्यांचे घरी गुरें उमगलीं त्यांचे आंगी लाऊन लिहून पाठविलें परंतु जाबसाल होत नाहीं. दुसरे ज्यादुगिरी माणसें कोल्हापुराकडील तमाम नदीपलीकडे व मिरज प्रांतात गांवगना फिरतात. माणसें धरून नेतात. उबरे पुजतात. त्यामधें गरोदर बाइकास तों उपद्रव फार. कसबा कवठे येकंद प्रां मिरज येथील तेलियाचा मूल वीस पंचवीस वर्शाचा भुलऊन धरून नेला. हे वर्तमान मिरजेस येतांच नदीपलीकडील गावखेडीयास दबाव घातला जे, करवीरपावेतो बोभाट पडावा. याकरितां मुलकांत धमकावणी घातली तेव्हां तेलियाचा मूल अदृषगतीकरून सुटून आला. त्यास वर्तमान पुसिलें त्यास तो सांगतो कीं, कोल्हापुरास राजवाडियाचे पाठीमागें घर आहे. त्या घरांत पंनास पावणासे माणसे आहेत. कांहीं किरस्तांव व कोरवी व फलटणदेसची माणसें व पांच गरव्हार बाइका त्यांतून येक बाइको बालंत जाली. त्या माणसास खायास हरभरे टाकतात व उसाची पेट टाकतात. मांदणी+ दोन पाणियानी भरून ठेविली. तेलियाचा मूल दोन दिवस त्या येमालयांत होता तो पळून आला. कितेक वर्तमान सांगतो ते लिहितां पुर्वत नाहीं. सिरालेकरांनी येक मांग जादूगीर धरला तो त्यांही सुळावर दिल्हा. आकलखोपेस जादूगीर मांग धरिला याजवळ माणसांच्या सावा[१] व मांस व सेंदूर तांदूळ हिरवे पिवळे ऐसा मुदा समेत धरला तो येथें आणून खोडियांत घालून ठेविला. याप्रमाणे मुलकांत उपद्रव मांडिला. रानांत आऊतकाठीस येकटदुकट माणूस जावयास भिते. येविसीं आज्ञा करावया स्वाम समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The practice of witchcraft which was rampant in the province round about Kolhapur and which resulted in several thefts and harassment of women and children is reported to the Peshwa. The writer also records some concrete instances and traces and describes the home of sorcery at Kolhapur from which it originated. The paper throws some light on the superstitious nature of the people of those times.*

+ मांदणी = मोठ्या तोंडाचा उंच डेरा. स्त्रीलिंग. १ सावा स्नायू.

No. 27] [Before 1795

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
परशराम रामचंद्र स्वामी गोसावी यांसी

पो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणें विशेष. समस्त सुतारांचा बारा बलुत्यामध्यें वडीलपणाचा मानपान सुदामत चाल(त) असतां कोठे कोठे नवीन दिकत कारितात ती करूं नये. सुदामत बाराबलुत्यामध्यें सुतारांचे वडीलपण चालत आल्याप्रो चालवा-वयाचा करार करून देऊन नजरेचा ऐवज सुतार वगैरे ज्ञात खूम तीन यांजपासून सरकारांत घ्यावयाचा करार केला. त्यास तुम्हाकडील सरकार कमाविसीचे माहाल व फुटगावदेखील दुमाले येथील कमाल बेरजेवर दर सद्ये

१ सुतार बलुत्यांत श्रेष्ठ सा
·।।· लोहार
·।।· परीट

२

येकून दोन रुो प्रो सरकारांत घ्यावयाचा करार करून हे सनद सादर केली असे. तरी सदरहूप्रो तिही खुमापासून ऐवज वसूल घेऊन शंकराजी बली खिजमत-गार हुजुरून पाठविला आहे याचे मारफातीने ऐवज सरकारांत पावता करणें.

¶*This is a sanad ordering collection of a tax from and restoring the right of precedence to the carpenter caste over the other eleven castes practising different crafts in a village.*

No. 28] [Time of Peshwa Madhavrao I]

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बाळाजीपंत नाना
मुा सगमनेर यासी

ॐ सुभचिंतक संभुपुरी गोसावी मठ मौजे तळगांव उत्तम त्रिकाल आशीर्वचन उपरी. येथील कुशल ताा माघ वदे १ जाणोन स्वकीय आपले कुशल लिाा असले पाहिजे विशेष. गीरनामे पाच सात हजार या देशांत आले आहेत. आम्हास रनाळीयाहून आमचे पुरीनामी याने पत्र लिहिले आहे की, नासकावर पुन्हा पुरीनामियावर येतात. परगणे परगणियात पाटल जमीदार हमीद यास

धरून परगणीयाची खडनी घेतात ऐसे आहे. आम्हाकडे येणार, त्यास इकडे आलियावर त्याचे आमचे युध्य होईल. आसपासचे गाव वगैरे धूम होईल. मग येश अपेश तर इश्वरास्वाधीन आहे. परंतु मुलकात धूम होईल याकरितां आपणांस विनंती पत्र लिहिले आहे की, तमाम किलेदार व जमीदार व मुलकी लोक यांसी आपण ताकीद पत्रे पाठवावी की, गीरनामे बारी उतरू न पावेत. श्रीमंतास पत्रे ल्याहावी तर ते दूर राहिले. आम्हास आपन श्रीमंताचे जागे आहेत. तर सर्व बंदोबस्त करून पाठवला पाहिजे. आम्ही कांही तळगांव जिता मेल्या सोडून जात नाहीं. याकरितां आपन सर्व प्रकारे आमचे अरिष्ट निरसन क(रणा)र आपन आहेत. श्रीमंताकडोनहि बंदोबस्त आपनच करून घेणार आहेत. हे जागा तीर्थरूप कैलासवासी महंत बनसीपुरीबावाचे आहे याकरिता लिा आहे. सर्व प्रकारे आसरा भरोसा आपलाच आहे. तर राजश्री आपाजी हरि वगैरे मातबर सरदार जे आहेत त्यास साहित्यपत्रे द्यावी. कळले पाहिजे. व गंगथडी व खानदेश येथील गीरनामी यास ताकीदपत्रे की, पुरिनामीयाचे मठास उपद्रव दिधलियावर सरकारात मठ तुमचे लुटले जातील. तर त्यास माघारे वाटे लावावे. ऐसे करनार आपन आहेत. विशष काय लिहा आशीर्वचन.

सेवकांकित त्रिंबक काकाजी कृतानेक साष्टांग. नमस्कार विनंति विशेष. लिखितार्थ माहाराजानी परिसावी. विज्ञाति हेच कीं हा मठ पूर्वपासून राजमान्य आहे. यांची साहेता माहाराज करणार समर्थ आहेत. या प्रांतीं मुजफरजंग व किलेदार वगैरे पागा आहेत त्यास हजूरचे व आपले ताकीदपत्रें पाठविलिया यांचे रक्षण होईल. यानंतर आपले मर्जीस जे येईल ते करणार आपण समर्थ आहेत. बहुत काय लिहिणे हे विज्ञाति.

¶*The letter refers to the mutual struggles between the two sects of the Gosavis—the Giri and the Puri. The writer, a Puri Gosavi, informs Nana Fadanis of the possible attack of the Giris on the Puris of Nasik and requests him to stop it.*

No. 29] [?

श्री

बाळाजी धोंडदेऊ कुलकर्णी मौजे पेठ पारगाव ताा खेड सरकार जुनर याने कलवांतिणीसमागंमे गमन व भोजन व मांसभक्षण व सुरापान केले, यामुले पतित जाला व यामुले याचें समस्त भाऊबंद आपांक्त जाले म्हणून हुजूर ब्राम्हसभा

करून धर्मशास्त्रमते यांस प्रायेछित द्यावयाचा निर्णय करून पूर्वांग प्रायेछित यास देऊन प्रिथवी प्रदक्षण तीर्थश्नानें करावयाची आज्ञा केली· आहे. प्रदक्षणेस व तीर्थश्नानास पाठविला आहे. हा श्रीपुन्यक्षेत्रीं येऊन वास करून श्रीगंगेची तीर्थश्नाने करील [अपूर्ण]

¶*Penance is enjoined upon Balaji Dhondo Kulkarni of Pargoan for having lived with and taken meat and wine in the company of a prostitute.*

No. 30] [*1750-60* ?.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक मोराजी सिंदे नामजाद जंजिरे रेवदंडा चरणावरी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना. ताा छ २९ माहे रजबपावेतों सेवकाचें व जंजिरे मजकुरचें वर्तमान येथास्थित असे विशेष. ठेवणे याचा मजकूर. गुणाबाई ब्राह्मण बाइको टाकीच्या वाडीत राहात्ये इणे येऊन सांगितलें कीं, नारोबा परांजप्या वस्ती वाडी मजकूर याची बाइको रखमाई येके दिवसीं सहज माझ्या घरास बैसावयास आली होती. तिजला पुसिलें कीं, तुझे डोले काय म्हणोन दुखतात? त्याजवर ते बोलिली कीं, आधीच डोले आपले अशक्त आणि आजी दोन च्यार दिवस जागरण होतें तेणेकरून बहुतच दुखतात. त्याजवर पुन्हा मी तिजला पुसों लागल्यें कीं, जागरणास कारण काय? त्यास तिणे उत्तर दिल्हें कीं, दाहापांच जण मिलोन सारी रात्र आपल्या घरीं जागतात आणि म्हणतात कीं, कोठें ठेवणे आहे तें काढावें. ऐसी तजवीज करीत असतात, यामुलें आपल्यास जागरण जाहालें. व याउपरी येका दोहो दिवसीं रखमाई व मी व आणीक बाइका ऐशा मिलोन देवदर्शनास गेलों होतों. त्यास येतेसमईहि तिजला मागती पुसिले जे, तूं आज बहुत कष्टीसी कां? तेव्हा रखमाईने म्हाणिलें कीं, काली रात्रीस दाहा पांच जण आपल्या घरीं मिलाले. त्याणी मजकरवीं तलणवलण वगैरे पूजासामग्रीचें साहित्य करविलें आणि वाडींत जाऊन ठेवणे घागर एक काढून आणिली. त्यांत मोहरा व पुतल्या व सोन्याच्या सांखल्या ऐसे होतें, याप्रमाणे सांगितले. यावर तिजला मी बोलिल्यें कीं, मोठ्याने बोलो नको. त्याजवर बोलिली की, मजला सारी रात्र जागरण जाहालें यामुलें दोन घटिका झोंप अधिक लागली याकरितां घरधनी याणीं मारिलें व जीवेच मारीन ऐसे दबाविलें. यावर मी बोलिले कीं, आतां तुम्हास बाइकास काय· उणे ? द्रव्य सांपडलें; येक म्हणतां पांच मिलतील. येणेप्रमाणे इणे मजपासी सांगितल्यावर मी साक्षेप पुरस्कार वाडींत जाऊन पाहिलें तों वाडीच्या

देवाची पूजापुष्पें व ठेवण्याची खांच दृष्टीनें देखिली. सदरहू प्रमाणें हकिकत गुणाबाई इणे सेवकाजवळ सांगितली. त्याजवरून नारोबा मजकूर यास बोलाऊन आणिले आणि बहुत चौकसीनें पुरसीस केली, परंतु कबूल न होय. याकरितां याचे बाईकोस पुसावयास्तव भला माणूस चौकस पाठविला. त्यास तांकीद केली कीं, तिजला सांगणे कीं नारोबास सदरेस बैसविले आहे व गुणाबाईहि गेली आहे. त्याणी ठेवण्याचे सर्व वर्तमान विदित केलें, त्यास तुम्ही जाहाली हकीकत खरीच सांगणे व गुणाबाईजवळही काय बोलिली ते सांगणे. सदरेस नेल्यावर तुझी आबरू राहणार नाही म्हणोन. त्यास तिणे सांगितले की, ठेवणे म्हणजे काय हे मजला काहीं ठाऊक नाहीं व गुणाबाईजवळ [या खालचा बंद गहाळ] वाडी-तील ठेवणेयाचा मजकूर गुणाबाईने विस्तारें विदित केला तो मनास आणितां साक्ष मोझ्यानें त्या ठिकाणचा मुदा पुरला नाहीं आणि हे सिंपुलवाडीच्या ठिकाणाची हकीकत साबूत जाहाली आणि टाकीच्या वाडीच्या मजकुराचा थाक लागत नाही. येकली गुणाबाई मात्रच सांगत्ये. दुसरा कोण्ही साक्ष मोझ्या मनास आणितां पुरत नाहीं. येणेप्रमाणे जाहाली हकीकत राजश्री नारो विठल हुजुरून रोजमरा वाटावयास आले होते यांच्या मारफतीने मनास आणून तहकीकात केली असे. येणेप्रमाणे सेवेसी विदित व्हावें याकरितां लिहिलें असे व येविषईची आज्ञा काय ते करणार स्वाम धनी आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Moraji Sindia reports to the Peshwa the findings of an inquiry he made about the alleged discovery of a hoard by one Naroba Paranjpe.*

No. 31] [?

श्री

याद. जंजिरे जयदुर्ग येथें पर्वतवासी स्वयंभू प्राचीन स्थान आहे. तेथें पांच लिंगे आहेत. त्यांतील पश्चिमेकडील येक शकल परदेशी येऊन हातानें उखलून नेले. त्या वेळेस व सांपडावयाचे वेळेस दृष्टांत पुजारी यास होऊन ते लिंग आणिले म्हणोन लिहिले. व शास्त्रमते स्थापना करावी किंवा जली निमग्न करावे, जसी आज्ञा होईल त्याप्रमाणें करूं. त्यास जर लिंगाचे शकल खपली निघाली आहे असे असल्यास शास्त्रमते शकल तुकडा असल्यास जलमग्न करावे. तथापि देवाचा दृष्टांत होऊन सांपडले त्यापक्षां फिरोन प्रार्थना करून दृष्टांत जर जेथील तेथें तुकडा लावावा आणि लिंग सचंत्रच एक स्थळी बसवावयाजोगे सगळेच आहे असे आसल्यास शास्त्रताच स्थापना करावी असे आहे. दोही प्रकारचे करणे जाले तरी अर्चाशुद्धि केलीच पाहिजे.

¶*The letter refers to the removal and also the reinstatement of one of the five lingas at Jaydurga (=Jaygad).*

No. 32] [?

श्री

श्रीमत् सेवेसी दंडवत विनंती उपर. आग्निकवतुकांची दोन झाडें राहिलीं आहेत. पर्जन्यातिवृष्टीमुळें वाळतात व चातकन्यायेची नगारियाचें निजभक्ष मागतात. अजी आज्ञा जालियां देवढीपासीं येऊन उभी राहातील हे विनंती.

¶*This is a mysterious letter, concealing the meaning in a literary conundrum.*

No. 33] [1741-61?

श्री

विशेष. सैदसादात व षेखसला पीर का। पुणे यांचे ताबूद मोहरमच्या महिनियांत फिरायाचा पूर्वी परस्परें कजिया होत होता. त्याजवरून तीर्थस्वरूप कैलासवासी आपा स्वामीनी का। मजकूरचे रहवासी याचे साक्षीने, मुलश्याम दस्तूर लेहून घेऊन निवाडा केला, यादी ती लिहून दिल्ही त्याप्रो। चालत असतां गुदस्ता षेखसलावालियानी सैद सादातवालियासी कजिया केला. परस्परें जंग होऊन जखमी जाहाले म्हणून विदित जाहाले. ऐशास तुम्ही तेथे असतां ज्यांचा अन्याय त्यास शिक्षा न केली. अपूर्व आहे. साल मजकुरी उभयता पिराकडील पिरजादियास बोलाऊन ताकीद करणे की, जो मार्ग आपा स्वामीनी करून दिल्हा त्याप्रो। उभयेतानी चालणे, त्यास अंतर जाहालियास पारपत्य होईल, ऐसे स्पष्ट सांगणे.

याजमध्ये कमबेज करणे असेल ते करून तुम्ही ल्याहावे अथवा आम्हांपासी पाठवावे, त्याप्रो। लिहिले जाईल व जिवाजीपंतासहि येक पत्र या प्रो।.

¶*The paper refers to a dispute regarding the tazias of Said Sadat and Shaikh Salla of Poona.*

No. 34] [*King Shahu's regime.*

गज्यानन

सेवेसी आनंदराऊ सोमवंसी विज्ञापना यैसी जे. साहेबी कृपालु होऊन पत्रे देविली पाहिजेत हे विज्ञाप्ति.

विठल सिवदेव यासी पत्र की, आनंदराऊ सोमवसी यासी खटखट करिता व त्याचे कलवातिनीस उपद्रव

मथुरा नायेकीन मनाजी गुणिजन यासी कौल की, तुम्ही आनंदराऊ सोमवंसी याजपासी आहा तैसी आसने

7455

करिता तर ते नायेकीन याजपासी पाच सात वर्षे आहे, तर तिसी तुम्हासी मतलब काये? याउपरी याचे कलवातिनीस उपद्रव न करणे. येविसी फिरोन बोभाट येऊ न देणे. याजपासी आहे तैसी आसेल म्हणऊन पत्र.

तुम्हासी कोन्ही उपद्रव करणार नाहीं. तुम्हासी कोन्ही उपद्रव करील त्यासी हुजुरून ताकीद केली जाईल. तुम्ही जैसी आहा तैसी आसने म्हणऊन पत्र येक.

दोनी पत्रें देणें.

¶*Anandrao Somvanshi requests King Shahu for an injunction against Vithal Shivdeo prohibiting him from harassing his (writer's) concubine by name Mathura.*

No. 35] [*1750-61?*

छ २७ जमादिलाखर

श्री

चिरंजीव राजश्री भाऊ यांसी बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. मौजे जानोरी पा दिंडोरी येथील पाटिलानी रामजी पा याची आई भुताळी म्हणोन मारली त्याजवरून पाटील मजकुरास पुण्यास आणून चोकसी केली. त्यास भोवर गावानीहि सागितले कीं ती भुताली खरी, परंतु पाटिलानी सरकारचे आज्ञेखेरीज मारिली. त्याची गुन्हेगारी करार करून रामजी पा याचा बेदावाहि करून दिल्हा व समजाविसीचाहि प्रकार केला होता. त्यास रामजीस कोणी फितावले त्याजवरून रामजी तेथे लस्करात गेला आहे. येविसी राजश्री बालाजी माहादेव याणी पत्र लिहिले तेच पाठविले आहे. तरी रामजी मजकूर यास ताकीद करून गावचा गावीं पाठऊन द्यावा. समजावीस निघाली आहे त्याप्रो समजावे. येणेप्रो करून पाठवावे. जानोरीचा हिसेब कितेब रा आपाजी अनंत याजकडे होता, तो बालाजी माहादेव याणी घेऊन लिहिले आहे. तेच पत्र पाठविले आहे, त्याजरून कलेल. रा छ २४ जमादिलाखर हे आसीर्वाद.

¶*This paper refers to a woman having been put to death by the Patils of Janori, they having suspected her of witchcraft.*

No. 36] [?

श्री

विनंती उपरी, बाजरांतील कलालाची दारू मना करणे म्हणोन लिहिले, त्याजवरून आज ताकीद करून भट्या मना करविती. कळलें पाहिजे. हे विनंती.

¶*Orders are issued prohibiting sale and manufacture of liquor.*

No. 37] [28-3-1800

श्री

यादी गोटगस्ती विा आपाजी जनार्दन छ २ जिलकाद शुक्रवार. रामनवमीचे उछव सालाबादप्रो सालमजकुरी आहेत.

१ तुलसी बागात
१ मेरालपंत पेठ सुक्रवार
१ नरसिंगराव मांडवगणे
१ त्रिंबकराव आंबीकर निा फरासखाना
१ दिनकरराव देशपांडे पुणेकर
१ हिरोजीराव पाटणकर
१ बाजीराव पाटणकर पेठ नारायण
१ हैबतराव शंकर परभू
१ जनार्दन गोपाल लघाटे
१ कृष्णाजी नाईक थते
१ जयेरामबावा गोसावी रामदासी
१ मालोजी घोरपडे

१२

¶*This is a list of persons celebrating the Ramnavami festival at Poona.*

No. 38] [30-4-1772

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
याप्रति

आश्रित कुपाशास्त्री वास्तव्य उमामहेश्वर संनिध कुंभकोण आसीर्वाद विनंती उपरी. आम्ही वैद्यक पढलो नसतां करीत होतो. त्यास सरकारांतून आज्ञा

जाहाली जे, वैद्यक करू नये आणि कोणासहि औषध देऊ नये. हे गोष्ट आम्हास मान्य आहे. अत:पर कोणास औषध देऊ तरी सरकारचे (गु)न्हेगार. वैद्यक करणार नाही. मिति शके १६९४ नंदननाम संवत्सरे चैत्र कृष्ण त्रयोदसी.

उपरी[१] लिखितं यत्तत्सत्यमेव एतद्विषये शपथपूर्वको निश्चयोस्ति.

साक्षी

बालकृष्ण शास्त्री

जानार्दन शास्त्री गाडिगिल:

नृसिंह शास्त्री

काशीनाथ शास्त्री दिवेकर:

ज्योतिर्विन्महादेवांतर्बोणि

सहस्रबुध्युपाव्हय गोविंदभट गोचरोयमर्थ:

¶*Kupashastri of Umamaheshwar submits to the order of the Peshwa restraining him in the practice of the physician's profession as he had not studied the science of medicine. This shows that quackery in medicine was prohibited.*

No. 39]

श्री

राजश्रिया विराजित राजमा(न्य)
राजश्री नारो त्रिंबक तालुके जं-
जिरे विजयदुर्ग यांसी

प्रति रामशास्त्री आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लिहित गेले पाहिजे विशेष. गणेश विठल गोखले यांचा व बलमानी गोगटे याचा भुताचा कजिया होऊन हुजूर पुण्यास बलमानी गोगटें यांची मुलेमाणसे आणिली. त्यास उभयेताचे बंधू सरकारची पत्रे व कलमझाडे याची याद घेऊन गेले की, माहास्तानी ज्याग्रुतस्थले दाहा गावी पर माहाली देवाचे प्रसादी कलमझाडेप्रो पुसोन जो निवाडा होईल तो हुजूर लेहून पाठवणे म्हणौन सरकारची आज्ञा जाहाली असतां ते तुम्ही न करिता देवाचा प्रसाद न घेता भगताचे शब्दे पडथले करून बलमानी गोगटे याचा भाऊ अटकेत ठेविला म्हणौन वारंवार हुजूर बलमानी फिर्याद होतो. तरी हे न करितां पेशजी सरकारचे आज्ञेप्रमाणे सुभाचा कारकून व सिपाई देऊन उभयतांचे समक्ष परमाहाली ज्याग्रुतस्थानी कलमझाडेप्रो प्रसादी पुसोन निवडून लवकर रवाना करणे. वारंवार हुजूर

---

१ या पुढील मजकूर व साक्षी बालबोध असून त्या निरनिराळ्या वळणाच्या आहेत.

बोभाट आल्याने उतम नाही. बलमानीयाची मुलेमाणसे आजी साहा महिने श्रमी होतात. ब्राह्मण कुटुंबवछल आहे तरी लवकर निवडून हुजूर रवाना करणे.

[या पत्राच्या मागे खालील मजकूर आहे:]

[31-1-1761

याद़ी गिरमाजी लुमाजी उपनाम मुले जोसी का। सिनर याची दाईजण सौ राधाबाई ही अपुत्रिक होती. तिणे सती निघते समई आपले घर मनभट उपासनी याचे बाप बाबदेवभट यांसी दान दिल्हे. त्यास वृतीचे घर आम्हा दाइजाच्या समताविना जावयास दान घ्यावयास आर्‍हे नाही, म्हणून गिरमाजीचा व मनभट याचा कजिया होऊन मनसुफी हुजूर आली. त्यास कसबा मजकुरी बीनवारीस जागा सरकारातून देविली, तेथे गिरमाजी लुमाजी याणी घर बांधोन द्यावे, त्या घरात मनभट याणी नादावे, आणि हे घर या दाइजाच्या हवाला करावे. याप्रा। हरदोजण सरकारातून करार होऊन समजले. त्याप्रा। हरदो जणाकडे सरकारची नजर रुपये:

गिरमाजी लुमाजी मुले याजकडील रुा।	मनभट उपासनी
७५	२५

येकूण शंभर रुा। सरकारात पोता पाठविले आहेत, जमा करून चिठी देवावी. छ २३ जाखर सुा। इहिदे सितैन मया आलफ.

¶*Two cases, one involving the practice of sorcery and the other the gift of a house by a woman, are decided in this paper addressed by Ramshastri to Naro Trimbak of Vijayadurga.*

No. 40]

श्री

तीर्थरूप राजश्री तात्या वडिलांचे सेवेसी

अपत्य भागोजी पाटील वाळुज चेरणावर मस्तक ठेऊन सा। दंडवत विज्ञापना. ता। छ १ रोखरपावेतो वडिलाचे असीरवादे करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. अम्हाकडील वर्तमान तर श्रीसप्तशृंग देवी गडावरील, तेथे माघ वद्य चेतोर्दसीस मागील च्यार साहा घटका दिवस राहातानी अंगातोन आग्नीच्या ज्वाला निघोन शरीर कवच्यासुधा दग्ध जाहाले आणि रुधिराच्या धारा मस्तकातून पाचच्यार निघोन चेरणापरियंत वोघल आले. अराधी ब्राम्हण गडावर होते त्याणी ज्वाला पाहून धावले, तो देवीजवल अग्नि तो कोठे नाही. हे

7459

आघटित चेरित्र पाहून अश्चिर्य भासले. ऐसी गोष्ट कधी जाली नव्हती म्हणोन पुज्यारी वगैरे बोलतात. काही संकटाखेरीज हा वेव्हार जाला नाही म्हणोन म्हणतात. नासिककर ब्राम्हण वगैरे अर्च्या करावयास आणविले आहेत. शेवेसी वर्तमान श्रुत व्हावे म्हणोन विनंती लिा आहे. व नासिककर ब्राम्हण वगैरे वृध वृध बोलतात की, लंकेस श्रीरामंचद्रजी जाऊन रावणाचा पराजये होणार तेव्हा श्रीकालिका देवींचे अंगातून रुधिर निघाले होते; पुढे रावणाचा पराजय जाला यैसे पुराणांतरी आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*A supernatural phenomenon, namely, the appearance of flames and streaks of blood from the idol of the Goddess Saptashringa, is reported in this letter by Bhagoji Patil, Walunj.*

No. 41] [*1761-72*

तालीक.

श्री

राजश्री हैबतराव निंबालकर

गोसावी यासी

॥ सकलगुणालंकरण आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जावे विशेष. पुणेकर सिंपी याचा व सासवडचा सिंपी याचा गंगाजी सरवद्या सिंपी याचे गोतपतीविसी कजिया लागोन मनसुफी हुजूर पडली आहे. त्यास सासवडकर म्हणतात की, गंगाजी सरवद्या सिंपी याने पदरेपदर निरालियासी सोइरिका करून निरालियांत वर्तणूक पुणेकर सिंपी यानी निरालीयाकडील सोइरिकासुधा पुणियात गोतपत करून जातीत घेतला. परंतु याप्रमाणें निरालियासी पदरेपदर सोइरिका करून वर्तला असल्याची गोतपत करून जातीत घ्यावयाची चाल नाही. पुणेकर सिंपी यानी अनुचित केले आहे म्हणौन. त्याजवरून पुणियाचे सिंपी यास आणून पुरसीस करिता त्यानी निवेदन केले की, गंगाजीप्रमाणे निरालियांत पदरेपदर सोइरिका करून वर्तले, यैसे सिंपी गोतपत करून जातीत घ्यावयाचा सिरस्ता आहे. बालोजी व गोदजी लालगा सिंपी याने मानवतात निरालियासी पदरेपदर सोइरिका केल्या आणि त्यात वर्तला त्याची गोतपत लिंगणूकर सिंपी यानी वरकड पेठाचे सिंपी यास कलोन केली आणि जातीत घेतला. त्याप्रो सुरलीत जातीत वर्तावे. याप्रमाणे जेथे लोलंगयाचे साईरिका जाल्या आसतील त्या पेठकरी याचे मुखे लिंगणूकराही खरे करून दिल्हे म्हणजे आम्ही गंगाजीस घेतला तो प्रमाण

7460

याप्रो विदित करून कतबा लेहून दिल्हा. त्याप्रो सासवडकर सिंपीहि मान्य होऊन लेहून दिल्हे. त्याजरून दोघे सासवडकर सिंपी व दोघे पुणेकर सिंपी सरकारचे जासुदासमागमे रवाना केले आहेत. तरी लोलंगा मजकुरी निरालियात वर्तोन त्यासी सोइरिका केल्या होत्या, त्याची गोतपत तुम्ही केलीत आणि सुरलीत जातीत सोइरीक करून वर्तवितात की काय हा मजकूर लेहून पाठवणे. गोतपत जालियावर लोलंग्याच्या सोइरिका जेथे जाल्या असतील त्या पेठकरी याची व सासवड सिंपी याची रुजुवात करून लोलंगीयाणे पदरेपदर निरालियाची सोइरिका केल्या त्या सोइरिका सुधा लिगणूरकराही लोलंग्याची गोतपत केली हे वर्तमान दुसरे पेठकरी यांस कलोन त्याणी लोलंगियासी सोइरिका केल्या यैसे जाले आहे की काये? हे त्या पेठकरी याचे मुखे खरे करून लेहून पाठवणे. रा छ १२ साबान. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Haibatrao Nimbalkar to institute an inquiry into the dispute of two tailor families with regard to their marriage connections and report his finding on the questions offered for settlement. See No. 54.*

No. 42] *[8-2-1748*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील तागायेत छ १९ माहे सफरपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून या प्रांतीचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. विशेष. राजश्री आपजीराव खानवीलकर यांची बहीण वधू आहे. त्यास राजश्री नरसिंगराव घाटगे यांस देऊ केली आहे. माघ मासीं लग्न आहे. याजकरितां येथून निरोप घेऊन सेवेसी आले आहेत. लग्नास जावयाची आज्ञा स्वामीनी दिली पाहिजे. व राजश्री तुळाजी आंगरे यांसी सोइरीक जोरावारीने करणार होते. त्यासीं शरीरसंम(ध) हे कसे करितील? त्याणी बलात्कारे करून सोइरीक न्यावी हा अर्थ योजिला होता. याजकरितां मौजे खानावली(हू)न याचे कबिले व यांचे निसबतीचे कबिले वतनी गाव सोइरिकेचे कजियामुले टाकून घाटावर आले. त्यास सांप्रत राजश्रीं तुळाजी आंगरे हुजूर येतील त्यास याजविसी आज्ञा होऊन पूर्ववतप्रमाणे याची स्थापना वतनावर होये तो अर्थ करणार स्वाम समर्थ आहेत. कैलासवासी राव स्वामीनी यांस वचन दिल्हे होते कीं, राजापूर प्रांती पुरातन गाव इनाम व मोकासे

7461

असतील ते मनास आणून प्रसंगोचित पूर्ववतप्रमाणे करून दिल्हे जातील यैसें वचन दिल्हें होतें. हे स्वामीचे पदरीं आहेत. स्थापना करणार स्वाम खावंद आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshao requests the Peshwa to grant leave to Apajirao Khanvilkar enabling him to proceed for the marriage of his sister whom he has betrothed to Narsingrao Ghatge. The writer further requests the Peshwa not to listen to the proposal of Tulaji Angria who wanted to marry the girl against the wish of her brother.*

No. 43] [*20-10-1758*

श्रीशंकर

यादी रुद्राक्षाचा अंगरखा गुा बोहरी सुा तिसा खमसेन मया व अलफ

नख्त खंडित रुो	कापड आख
८५	२०
पंच्यासी रुो देणे	वीस आख देणे

छ १७ सफर सन तिसा

चि * *

¶*Rupees 85 are paid as the price for a coat made of rudraksha beads probably for the Peshwa to wear.*

No. 44] [*12-9-1765?*

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री
रामशास्त्री बावा यांसी

प्रति समस्त ब्राम्हण उभयक्षेत्र श्रीकृष्णावेणीसंगम साष्टांग नमस्कार उपरी. येथील क्षेम तागाईत भाद्रपद बहुल द्वादशी जाणून स्वकीयें लिहीत असिलें पाहिजे विशेष. कैलासवासी गमाजीबावा यांस सातारा देवाज्ञा जाहाली, त्यास दहनास श्रीतीरास घेऊन आले. दहन मंत्राग्नि करून जाहालें. तदोत्तर किनईहून राजश्री वासुदेवबावा व मोर फाटक आले. उत्तरकार्यास त्याणीं आरंभ करून कर्म चालीस मोर फाटक याणीं लाविलें. त्यास येजु शाखेचीं उत्तरकार्यें पूर्वी पासून आजिपर्यंत होत आलीं, परंतु कोणी कणिकेचे पिंड केले नाहींत आणि आजि हे क्रियेस कणिकेचे पिंड कां करितां म्हणून आम्ही उभयक्षेत्रींचे ब्राम्हणांनीं पाठक यांसी विचारिलें. तेंव्हां मोर पाठक यांणीं उत्तर दिल्हें कीं, गमाजीबावा यांस मंत्राग्न परशाखोक्त केला, येदंनिमित्य कणिकेचे पिंड करणें लागले, आणि

कोणी विचारता होईल तर त्यास शास्त्रार्थहि समाजऊन देऊं. त्या वेळेस राजश्री मेरुराव श्रोत्री यांणीं मोर पाठक यास पुशिलें कीं, कैलासवासी रावदादा यांचे उत्तरकार्यें जाहालीं, त्या समयीं तुम्ही होता आणि वेदशास्त्रसंपन्न राजश्री बामन पाठक होते परंतु ते समयीं कणिकेचे पिंड जाहाले नाहींत. कैलासवासी आणाची स्त्री चिमणगावीं वारली तिचें उत्तरकार्य तेथेंच जालें; त्या वेळेस वेदमूर्ति राजश्री लक्षुमण पाठकजी होते तेव्हांहि कणिकेचे पिंड न जाहाले, आणि तुम्ही हा प्रकार आरंभून कणिकेचे पिंड करितां; बरे थोर आहां! तोच द्वेष चित्तांत धरून सातारियांतील व प्रांतींचे आपले शाखेचे ब्राह्मण मेळऊन संमत करून मेरुरायाशीं कज्या आरंभिला कीं, तुम्ही ऋग्वेदी ब्राह्मण यांस श्राद्धीं सांगतां तें न सांगावें, यांकडून रुद्राभिषेक न करवावा. ऐसा निश्चय कराल तर तुमचे घरास भोजनास येऊ, नाहीं तर येणार नाहीं. तेव्हां रायांनीं प्रतिउत्तर केलें कीं वडिलांपासून चालत आलें आहे ती चाल आमचे बस्तु मोडून नूतन चाल आपणांकडून घडणार नाहीं. पूर्वी ऋग्वेदी ब्राह्मण श्राद्धास सांगतों व रुद्राभिषेकास सांगतों त्याप्रमाणें सांगू. यैसे ऐकोन मोर पाठक बहुत रुष्ट होऊन किनईस श्रीमंत भवानराव प्रतिनिधि यांकडे जाऊन वर्तमान निवेदन केलें. त्या समयीं त्यांचे घरीं लग्न होतें. तेव्हां आक्षेप श्रीमंतांसी केला कीं, उभयक्षेत्रींचे ब्राह्मण आले आहेत यांसी देकार न द्यावा आणि यांचे पंक्तीस भोजन करूं नये. तेव्हां श्रीमंतांहीं पाठकास उत्तर केलें कीं हे गोष्ट आम्हांस उचित नाहीं. त्यांस देकार देऊं आणि त्यांचे पंक्तीस आपण भोजन करूं. तुम्ही आग्रह करितां तर तुम्ही गेला तर पुरवेल. ऐसें उत्तर ऐकोन पाठक रुष्ट होऊन गेले. च्यार दिवस लग्नांत नव्हते. मग बच्यंभट व आणखी चौघांहीं येजमानांस विनंती करून पाठक यास आणिलें. तेथें काहीं न चालिलें. मगहि इकडे येत्न करून पाहात होते, परंतु कोठें त्यांचे-सारिखें न चाले. याकरितां पुणियास जाऊन आपले शाखेचे ब्राह्मण यांस हें वृत्त निवेदन करून त्यांचे शाखेचे ब्राह्मणांचें पत्र पाठविलें आहे कीं तुम्हीं महद् अन्यायी आहां, तर पत्रदर्शनीं स्वार होऊन येणें. त्यावरून रावजी पुण्यास येणार आहेत. तेथें आल्याउपरी त्यांचे शाखेचे ब्राह्मणांचा व त्यांचा बोलीचा प्रसंग होईल. ऐशियास पाठकांहीं कणिकेचे पिंड करविले म्हणून आमचे उभये क्षेत्रांच्या संमतेंकरून त्यासी रायांनीं बोलीचा प्रसंग केला, यामुळें हा कलह प्राप्त जाहला आहे. यास्तव उभय क्षेत्रांस रायाचा अभिमान आहे. त्यास आपण तेथें प्रसंगीं आहेत, तर त्यांचे शाखेचे ब्राह्मण आहेत त्यास आपण बोलाऊन आणून विचारावें कीं, ऋग्वेदी ब्राह्मण यांणीं आपले घरीं अन्नग्रहण न करावें, आपण त्यांचे घरीं न करावें. ऐसा त्याचा निश्चय होत असेल तर करून

श्रीमंतांचे विद्यमानें संमतपत्र करून देतील तें घ्यावें म्हणजे. गोष्ट आम्हांस व रावजीस मान्य आहे. नाहीं तर लटकें कुपेंच करून रायास हारीस आणूं म्हणतील तर सर्व प्रकारें आपण रायाचा अभिमान धरून त्याचा शह प्राप्त न होय तो अर्थ केला पाहिजे. पत्राचें उत्तर पाठवणें, सर्वज्ञांप्रति विशेष काय लिहिणें हें नमस्कार.

¶*Some discrepancy in the funeral ceremony of Gamajibawa is discussed in a memorandum addressed by the Brahmins of Mahuli to Ramshastri. Gamaji Yemaji Mutalik of Karad died in 1764.*

No. 45]

वतनपत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री माधवराव पंडित प्रधान ता। नागोराम भागवत गोत्र कपि सूत्र अश्वलायन सु॥ सबैन मया व अलफ शके १६९१ विरोधी नाम संवत्सरे. तुम्ही हुजूरला कसबे पुणें येथील मुकामी विदित केले की आपण स्वामीशेवा एक निष्टपणें बहुन दिवस केली, त्यास स्वामीनी कृपाळु होऊन कसबे बामुरी ता॥ राहुरी पा॥ संगमनेर सरकार मजकूर येथें सदशिव पेठ नवी आपण श्रमसायास करून वसाहत केली. तेथील सेटेपणाचे वतन नूतन आपणास करार करून देऊन चालविले पा॥ म्हणोन, त्याजवरून मनास आणिता तुम्ही राज्यातील पुरातन सेवक यास्तव तुमचे चालवणे आवश्यक जाणून तुम्हावर कृपाळु होऊन कसबे मजकूर येथे सदशिव पेठ नवी तुम्ही श्रम सायास करून वसाहात केली तेथील सेटेपणाचे वतन नूतन सरकारातून तुम्हास करार करून देऊन वतन समधें हक दक मानपान ब्रि तपसील.

कि॥

१ भुसार कैली हरजिन्नस
दर गोणीस दर गाड्यास
৺৺= ৺৺॥

— येणेप्रमाणें दर बैली
निटवे व गाड्यास आधोली.

१ किराणा वजन पक्के हर जिनस
दर बैली वजन दर गाड्यास
৺৺॥ ৺৺२॥

कि॥

१ तेली याजपासून
৺৺। दर घाण्यास दर आठवड्यास पावशेर तेल्याचे मापे.
৺৺৺२। बिछायेती दुकानदार येतील त्यास व बाजारकरी याजपासून दर घाण्यास आठवड्यास.

१ चांभाराचे दर दुकानास जोडा एक दरसाल.

7464

दर बैली अदसेर व गाड्यास साडे-
तनि सेर प्रों.

१ डाका घालील त्याजवळून नारळ
व विडा.

१ तांबोळी याजपासून दर बैली पान
सुमार १०० व दरदुकानास दर-
रोज सुमार १३ तेरा प्रो.

१ सेव्याचें दुकानास व घरास वेठबे-
गार व घालपटी नाहीं.

१ पाती शेव्याची.

१ माळवे सर्वे वजन पक्के.

८। दर गाड्यास दाहा शेर
८८१ बैलास एक शेर
८८१ मेवा द्राक्ष वगैरे आणितील
त्यास दरबैली एक शेर प्रमाणे.
" निंबें वगैरे दर बैलास पंचवीस.
"मोकळी भाजी बचक
" आंबे दर बैलास दाहा.

---

१ पाट लागेल त्यास शेला विडा.

१ गोंधळास विडा, वाटी, ऊस, फुले.

१ बाजारचे वाणी याजपासून दर
आसामिसि दर अठवडा सुपाऱ्या
सुमार दोन.

१ झेडेपटी वर्षाभऱ्या.

१ वैरणी विकावयास येईल त्याजपा-
सून पुले

१५ दर गाड्यास पंधरा.
५ कावाडास पाच.
१ वोझ्यास एक.

२१.

१ [1]सालीकोष्टी दर मागास दरसाल
पासोडीस नग ॥ निमे.

१ गुडाखुवाल्यापासून दर दुकाने
तंबाखु दोन चिलमे दर अठवड्यास

१ दुकानदार व पालकरीवाणी याज-
पासून दर आसामीस दर सणास
गूळ पावसेर.

१ पेठेतून भुसार भरून जातील त्यास
दर गोणीस रुके ८२ दोन.

१ धनगर दर दुकानास चेवळे एक
वर्षाभऱ्हा.

"खाटकापासून दर आठवडा
दर आसामीस मास ८८। पावशेर.

१ पेठेंतील घर जागां व मिरासपत्रें
केल्यास सेव्याची साक्ष घालून दर
सेकडा रु. पाच शेल्याबद्दल.

१ दीपवाळीस वाणी उदमी याणे
दर आसामीस भेट रु. १ एक.

१ दंड फुरई शेव्याचे मारफतीनें
चुकवावी.

१ पेठेंत सेव्याचे आधोलीनें व धड्यानें
माप व्हावें.

१ बाहेरील वाणी उदमी येतील
त्याजपासून जीवन पाहून वासीला
घ्यावे.

१ सुत व रेशीम व कापड व जर-
मीना दर सेकडा ८= चवल.

१ जोगी राऊत याचे मागास नवार
वगैरे जिन्नस सेव्याचे घरास लागेल
तो त्याणी अंगमेहनत करून बिन-
मजुरी विणून घ्यावा.

---

[1] A coarse blanket square and small.

१ पेठेतील मान.

१ पोळ्याचा बैल.
१ होळीची पोळी.
१ सणाचे वाजवणे.

१ लाकडे विकावयास आणतील त्याजपासून.

५ दर गाड्यास पांच.
१ दर मोळीस एक.
२ दर कावाडास दोन.

१ पाथरवटापासून जाते दर आसामीस वर्षाभरा.

१ सरकारचा सीरपाव.

१ पेठेत जिन्नस विकावयास वाणी उदमी बिछायेती वगैरे येतात त्याचा निरख चौधे उदमी मिळून सेट्याचे मारफतीने करावा.

१ शेट्याचे घरचे गुरूढोर मरेल त्याचा चर्+सा शेट्याने घ्यावा.

१८ अठरा कलमें.

पेठेंत दुकानें दोन तुम्ही बांधिली आहेत ती सेटेपणाकडे दिल्ही असेत.

१ वारषकि जिन्नस पाहून घ्यावे.

१ खीस्ती व सराफ.
१ बोहरी.

२

सदरहू असामीपासून.

१ खत्री याजपासून शेला वर्षभरा एक सारे.

१ साळी मोमीन सारे याजपासून वर्षभरां पागोटे एक.

१ सारे हजाम वर्षभरा लुगडे एक.

१ नकाशावर दाखला शेट्याचा असावा, आकार होईल त्यास दर सेकडा रु. १ एक.

१ सलतनगार याणी शंभर सागली विकल्यास एक सागे[१]ल घ्यावी.

१ गावकुसु दर असामीस चार गज मुकरर करून घ्यावे निमा शेट्याचा

१ अठरा दुा बारा बलुती याणी जविन माफक कामगारी सिरस्तेप्रमाणें करावी.

२३

एकोन तेवीस कलमें.

येणे प्रमाणें हकदक मानपान व दुकाने दोंन वतनसमध्ये करार करून दिल्ही असेत, तरी शेटेपणाचे वतन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन सुखरूप राहाणें.

¶*Peshwa Madhavrao fixes the claims of Nagoram Bhagwat for establishing a market place at Wamuri.*

१ बोकडाचें कातडें सं. छाग छागल. + कातडें.

No. 46]

श्रीं४

पुरवनी साहेबाचें शेवेसी

जयेपुरी श्रावक लोकानी श्रीसदासिवाचे पिंडीस उपद्रव दिल्हा त्याजवरोन राजे-माधोसिंगजी यानी श्रावक लोकास बहुत उपद्रव देऊन पंधरा लक्ष रुपये दंड ठरविले. बहुत सज्या दिल्ही. श्रुत जाले पाहिजे. साहेबाचे शेवेसी विज्ञाप्ती.

¶*Raje Madhosing punishes the Jains with a fine of 15 lakhs of rupees for defiling the idol of Sadashiva.*

No. 47]

श्रीप्रो

दखनचा दिवा मालवला: हिरा हारपला कसा गुपित घाला केला रावसाहेबाला: येक छेत्र करून गेले मांधवराव थरथरां कांपत होते यासि उमराव बसविले हस्तनापुरी बाछाव दादांसी मोकले राज करावे तुटली आउक्षाची दोरी नाही उपाव मरतेसंमई बोलविले नारायणराव: चाल: दादासि मिलुन आसावे द्वैत मनि नसावे येकछत्री राज करावे असे फार फार विनिविले राव दादांला नारायणराव तुमचे वोटीत घातला १ राव गेले साताऱ्यासी राज्यापासी सिके रोखे वस्त्रे दिल्हे नारायनरायासी आले वाजवित चववडे शेहर पुण्यासी कूच करून लौकर गेले नाशकासी बाइची बुद्धि ऐकुनि निमित्य त्यासी मग ठेऊन जसी केलि फार दादासी थोर केली बदोबस्ती देतिं घस्तीवरते घस्ती पुल बाधून करून वेवस्ती नकस काम लाविले हुकुम जाले पुढे कोट बांधणार होते शेहर पुण्याला २.

¶*A contemporary copy of the Ballad of the murder of Narayanrao. Unfortunately it gives the first two stanzas only. It, however, gives some new readings and hence will be useful to students of ballad poetry.*

No. 48] [?

नकल

श्री

श्रीमंत सर्वज्ञतम राजश्री बाबा-

साहेब यांजप्रति

शुभेछुक कृष्णशास्त्री नासीककर यांचे आनेक असीर्वाद उपरी. येथील वृत तागाईत पौष वा। १३ परियंत आपले कृपेकरून सुखरूप असो विशेष. आपल्यास

7467

रविसक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत. श्वीकार करून प्रविष्ट जाल्याचे उतर आले पाहिजे. नंतर क्षेत्री मैत्राणी यांचा आन्नवेव्हार वगैरे पूर्वीपासून सांप्रदाय कसा चालत अला आहे याचे वृत सरकारांत लिहून आणविले आहे म्हणोन कमाविसदार याणी समजाविले. त्यास हे क्षेत्र चौ युगाचे येथे व आन्यंत्र श्रीवाराणसी क्षेत्रप्रभ्रुता रामेश्वर परियंत द्वापार युगापासून आन्नवेव्हार नाही ऐसे असता क्षेत्री वेदमूर्ति राजश्री रामभट दादा घारपुरे व नारायेणभट इयांटे या उभयतानी सांप्रत आन्नवेव्हार आरंभिला आहे. यास काय विशेष शास्त्र आढळले असेल ते असो. परंतु रूढि सर्वत्र ऐसी नाही. बहुत काये लिहिणे हे[१] आशीर्वाद.

¶*Krishna Shastri Nasikkar gives his opinion with regard to the question of interdining with the Maitranis.*

No. 49] *[7-2-1776?*

श्री

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. राजश्री माहादजी शिंदे याचा मानस मराठे मातबर घरंदाज यासी गोतपत करावी व तनपुरे पाटील राहुरीकर याची कन्या मागतात. त्याणे मूल पलविली. त्याचे घरी चौकी बसविली आहे. मराठे सरदार रोज येऊन ये विसीचे काय ते आम्हास सांगा म्हणतात. येवि-सींचा मार लिहिला तो कलला. त्यास हा प्रकार सरकारातून व्हावयाचा नाही. राजीमंताचा प्रकार ज्याचा त्याचा आहे. बलात्कारे होणार नाही. तुम्ही लोकास समजाऊन सागितले, उतम आहे. खातरजमा * * तनपुरे याचे घरी चौकी बसविली आहे त्याविसी व लोकास पत्रे येतात येविसी त्यास वाईट न वाटे गोड दिसे असा प्रकार करितो. तुम्ही लौकर कूच करून जावे म्हणजे गोतपत सहजच राहिली. रा छ १६ जिल्हेज हे[+] विनंती.

¶*Sakharam Bapu (probably) to Haripant Phadke in the matter of Mahadji Sinde desiring to have matrimonial alliance with high-born Maratha families.*

No. 50] *[1-10-1777*

श्री

प्रभुवर्य श्रीमंत राजश्री रावसाहेब यांसी प्रति रामशास्त्री आसीर्वाद विनंती. तागाईत छ २८ साबानपावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. सदाशिवभट

---

१ या पुढील मजकूर बाळबोधींत आहे. नकल तत्कालीन. + 'हे विनंती' हे शब्द सखाराम बापूंच्या हातचे आहेत यावरून सदर पत्र बापूनें हरिपंतास (?) लिहिलें आहेसें दिसतें.

सिंत्रे गुदस्तां तोतयाकडे जाऊन श्राधाचें अभिश्रवण करून त्याचे पंगतीसहि बसले. परंतु याचा विचार पाहातां, हे वैदिक भोळे; राजकी व्यव्हार यांस ठाऊक नाहीं, यामुळे ही गोस्ट त्याजला घडली. यैशास, ब्राम्हण वैदिक उतम बहुत दिवस श्रमी जाले. त्याचे प्रायश्चितावसी चिंचवडच्या देवाचे पत्र हुजूर आले. हुजरून मंत्र्युत्तम राजश्री नानाकडे पाठविलें. ते पाहून मुंडणादि पूर्वांग उत्तरांगसहित च्यांद्रायणे च्यार, येकून प्राज्यापत्ये बत्तीस, दर प्राज्यापत्ती येकसहस्त्र, तिल होम प्रो बत्तीस सहस्त्र तिल होम ब्राम्हणद्वारा करावा, याप्रो यादी मंत्र्युत्तम राजश्री नानाकडे पाठविली. त्यांचेहि विचारास आली. त्यावरून सदरहूप्रो प्रायश्चित्त त्यांजकडून करऊन शुध्ध करावे म्हणोन चिंचवडच्या देवास सरकारचे पत्र पाठविले आहे. श्रुत होय+ हे विनंती.

¶*This letter refers to a learned Brahmin who is to be purified, by the performance of certain religious rites, from the social pollution which he suffered on account of his having dined with the pretender of Sadashivrao Bhau.*

No. 51] *[15-3-1780*

श्री

आज्ञापत्र राजश्री पंत प्रधान ताा लालखान व मलिकखान व पीरखान व दाऊदखान व लाला वस्ती मौजे देवठाण परगणे सिरसाळे सुाा इहिदे तिसैन मया व अलफ. राघू वगैरे चारण[१] याणी तुम्हांपासून कुलबिणी म्हणोन खरिदी करून, ताज्या बराबर कोकणांत पेणचे बंदरीं नेऊन, ब्राह्मणास वगैरे लोकास विकीत होते; परंतु त्या गर्ती बायका असें पेणचे जकाते यास व हुजूरचे गाडदी तेथें होते त्यांस कळलें. त्याजवरून त्याणी बायका व चारण यास सरकारांत आणून हवालीं केल्या. त्याची चौकसी करितां बायकाचे जबानींत लिहिलें घडलें कीं, आम्हांस चारणानी फिताऊन नेलें, आणि विकीत होते. त्याजवरून चारणास पुसतां त्याणी लेहून दिल्हें कीं आम्हीं लालखान व मलिकखान वगैरे देवठाणकर याजपासून खरीदी केल्या आहेत ते दाखऊन देतों; म्हणोन त्याजवरून हे आज्ञापत्र सादर केलें असे; तरी येविसीची चौकसी करावी लागते. सबब ढलाईत आसामी २ दोन पाठविले आहेत, याजबराबर देखत आज्ञापत्र हुजूर येणे. जाणीजे छ ७ रबिलावल आज्ञाप्रमाण.

¶*The Peshwa issues summons to Lalkhan and others of Deothan to appear before him in connection with a case of sale of some females as slaves who were respectable married women fraudulently enticed away from their homes.*

+ येथून पुढील अक्षर बालबोधींत रामशास्त्र्यांचे हातचें. १. धान्य, मीठ वाहून नेणारे लोक.

7469

No. 52] [16-6-1780

श्रीयोगेश्वरी

वेदशास्त्रसंपन्न राजसभास्तंभि-
भूत राजेश्री रामशास्त्रीबावा या प्रति

समस्त ब्राह्मण क्षेत्र अंबजोगाई नमस्कार विनंति उपरि. आपण राजेश्री सदाशिव नागनाथ याचे कन्येचे विवाहविषई अंम्हास पत्र लिहिल कि, वेदमूर्ति शेषभट व विठ्ठलभट या उभयतास श्रीयोगेश्वरीचे देवालयांत घालून शपथपूर्वक त्यांपासून लेहून घेऊन पत्र पाठवण. त्यावऱ्हुण अंम्ही समत ब्राह्मण व राजेश्री व्यकटराव निसबत सरकार मिळून उभयता मशारनुलेस श्रीयोगेश्वरीचे सान्निध नेउन सदाशिव नागनाथ यांचे पुत्र व त्यांचे गोत्रज लक्ष्मणपंत पाथरकर मिळून श्रीचा अंगारा व पुष्पें त्या उभयताचे मस्तकि घालुन विवाहसंबंधि वर्तमान पुसलें. त्यास त्या उभयता ब्राह्मणानि अंम्हा क्षेत्र मजकूर ब्राह्मणास लेहून दिधल त्याच पत्राचा मजकुर लिहिला तो या प्रमाणें: समस्त ब्राह्मण क्षेत्र कसबे अंबजोगाई स्वामिचे सेवेसि शेषभट उपाध्ये व विठ्ठलभट्ट कसबे मजकुर विज्ञापना ऐसिजे. वेदशास्त्रसंपन्न राजेश्री रामशास्त्री व श्रीमंत पंतप्रधान यांची पत्रें सदाशिवपंत पाथरकर यांचे कन्येचे लग्नाचे उद्येशे तुम्हा ब्राह्मणास अलि त्यावऱ्हुण सरकारचे कारकूण व समस्त ब्राह्मण मिळून अंम्हा उभयतास देविचे देवालयांत घालून शपथपूर्वक पुसल व सदाशिवपंताचा पुत्र व लक्ष्मणपंत पाथरकर यानि देविचा अंगारा पुष्पें आपले मस्तकि ठेविलि त्या वऱ्हुण अंम्ही अपले सत्यसुकृत बोलिलो कि अनंतगावि पाथरकर मजकुर याचे कन्येचे लग्न अपणास ठाऊक नसता नारो बावाजि यान अंम्हा उभयतास फलशोभन आहे म्हणुन बोलाउन अनंतगावास नेले तेथ अपणादेखता सरकारचे प्यादे याचे हाति मुलिस उचलुन पाटलाचे घरास नेल. अंम्हासहि प्यादे यांचे हत धकाबुकि करूण बलात्कार नेल. लग्न लावा म्हणो लागले. त्यांस लग्न समय नाहि ऐस अंम्हि बोलिलो अस्ता बलेकडोन लावा ऐसे म्हणितले. त्यास वधुवरें अस्नात असता देवप्रतिष्ठा व नादिश्राद्ध कन्यादान न कर्ता गणपतिपूजन करूण उदकेकडोन मधुपर्क केवल केला. विवाहलग्न मंगलाष्टक म्हणोन लाविले. सवेच विवाहहोम व ग्रहप्रवेशानि होम लाजादि साहित्य रहित केला करूण साडे केले. अंम्ही वधुपाक्षिच कोण्हि नहोत. लग्न साडे सर्व कर्म सहा घटिकेत उर्कल. हे जाहाल वर्तमान श्रीयोगेश्वरी व समस्त ब्राह्मण राजेश्री व्यंकटराव यांचे साक्षीण अपल सत्यसुकृत स्मरोण सांगोन हेच पत्रारूढ करूण हे पत्र लिहून दिधल असे. हे शेषभट उपाध्ये व विठ्ठलभट सदरहु लिहिल. सहि विकल लक्ष्मण भट डुबगें शके १७०२ शार्वरनाम

संवत्सरे ज्येष्ठ शुद्ध १३ अपल्या लिहिल्याप्रमाणें लिहिल असे. या पत्रापूर्वि श्रीमंत पंतप्रधान यांचा नांवें शेषभट यांचे बोलिल्याप्रमाणें पत्र एक व जमेदाराचा नांवे शेषभट व विठ्ठलभट यानि लेहुन दिधल पत्र एक, ऐसि दोन पत्रें तेथें आलि. त्याउपरी शोध करूण हे पत्र लिहिल असे. श्रुत होईल. विशेष काय लिहिन हे विनंति

शके १७०२ ज्येष्ठ शुद्ध १९
समस्त ब्राह्मणाचि साक्ष.

गोविंदभट उपाध्ये देव.
साक्ष माणिकभट व्यास
सोयरंभट जोषि कास्यप गोत्रि अमणभट जोसि भारद्वाज गोत्री पत्र प्रमाण साक्षे लक्ष्मण दिगंबर जोसी
सदासीवभट जोसी भारद्वाज गोत्री
साक्ष राजेश्व(र) पाठक
साक्ष गोपाल पाठक
रामभट जोसी
लक्ष्मण जोसि भारद्वाज गोत्री सोयरंभट जोसि भारद्वज गोत्री लक्ष्मणभट डुबगे जोसि
गोपाळभट्ट शकुने
घनश्यामभट जोसि
बाळंभट जोसि. का.
पत्राप्रमाण साक्ष देवभट जो.
सारंगधर धनवटे
उमाभट जोसि का
कृष्णशाम गोसावी.

साक्ष विश्वंभर गोस्वामि देवालयांत उभयता बोलिले सदरहुप्रा त्यास साक्षी आपा गोस्वामी
अंनताचार्ये साक्ष गुरू गोसावि शेषभट अंबेकर
वसुदेवाचार्ये अंबकर
संमत आचार्य नारायणस्य संमत मुद्गल कऱ्हाडि
संमतमिदं यदुपति आचार्यस्य गदाधर अंबेकर
नारायणभट पिंगळे
नरसोबा कऱ्हाडीकर
रामचंद्र कऱ्हाडीकर
केशवभट कुर्मे
वासुदेव दामोषण
वरंभट पिंगले
काशिभट्ट पिंगले
साक्ष विसोबा गोसावि शकुने
साक्षि नागोबा अयाचित

¶*The Brahmins of Ambejogai submit an affidavit of two Brahmins Sheshabhat and Vithalbhat in which they deny on oath that the marriage of the daughter of Sadashiv Nagnath was performed by them according to religious rites.*

---

१ सबंध पत्र बालबोधींत असून साक्षीदाराच्या सह्या निरनिराळ्या वळणाच्या आहेत.

7471

No. 53] [19-11-1780

नकल

श्री

यांदी सदासिव नागनाथ याणी हुजूर विदित केले की, मौजे अनंतगाव प्रा आंबेजोगाई येथे आपण कुटुंबसुधा राहात असतां सिव्हस्तविधीस गंगेस गेलो. घरी कुटुंब व कन्या वधू होती. त्यास केसो बावाजी कुलकर्णी मौजे मजकूर याणें दाहा प्यादे व शेषभट उपाध्ये व विठलभट जोसी कसबे मजकूरचे येसे अनंतगावास अस्तमानी आणून आपले घरी मारामार करून जबरदस्तीने मूल उचलून पाटलाचे वाडियात नेऊन श्नान मधुपर्क देवकप्रतिष्टा नांदीश्राध सप्तपदी इत्यादिक काहीच विधि न करितां मंगलाष्टकें म्हणून मंगलसूत्र बांधून चव घटिकांत मूल सोडून दिल्ही. ते दिवसी पाटलाचे घरी सुतक होतें म्हणौन. त्याजवरून केसो बावाजीस मसाला करून आणावा तो तोच पुणियास आला होता. त्याचा पता सदासिव नागनाथ याणे लाऊन सरकारांत विनंती केली त्याजवरून केसो बावाजीस धरून आणून पुरसीस करितां त्याणें सांगितलें कीं, सदासिव माहादेव गडबोले कमावीसदार याणी आपलेबराबर प्यादे व ब्राह्मण देऊन लग्न केलें. त्याजवरून केसो बावाजीस कैदेत ठेविला. आनंतर त्याणें आपला आप्त जमिदाराकडे पाठविला. तेथे शेषभट व विठलभट याणी जमिदारास लिहून दिल्हे कीं, लग्न विधिपूर्वक जालें. त्या पत्रावर साक्षी पंचवीस आहेत. तें पत्र दाखल्यास केसो बावाजी याणें आणिलें. त्याजउपरी सदासिव नागनाथ याणे समस्त ब्राह्मणाचे नावें येकूण चालीस आसामीचे समतीचें पत्र सरकारांत आणिलें कीं, लग्न विधिपूर्वक झालें नाहीं. जेथें लग्न करावयास गेलें तें घर शूद्राचें, सुतकी होतें म्हणून लिहिलें व तुम्हा समस्त ब्राह्मणास सरकारचें पत्र गेलें होतें त्याचे उतर पसतीस ब्राह्मणाचे समतीचें आले की, शेषभट व विठलभट या दोघांस श्रीयोगेश्वरीचे देवालई व्यंकटराव निसबत नवाब जोरावारजंग यांचे गुजारतीनें शपथ घालून पुसतां त्याणी लिहून दिल्हे कीं, लग्न समय नव्हता व वधुवरांस श्नान नसतां देवकप्रतिष्टा, नांदीश्राध्ध, कन्यादान न करितां मंगलाष्टकें म्हणून मंगलसूत्र बांधून मूल सोडून दिल्ही म्हणून साक्षीपूर्वक तुम्ही लिहिलें. त्यावरून

7472

पाहातां विध्युक्त लग्न जालें नाहीं असें सिध होऊन हे पत्र लिहिलें असें. तरी सदासिव नागनाथ वर योजील त्यासी लग्न विध्युक्त करावें म्हणून पत्रें :

१ समस्त ब्राह्मण क्षेत्र आंबेजोगाई

१ जोरावरजंग जागीरदार दिा नवाब निज़ाआलीखान

—

२

१ सदासिव नागनाथ याचे नावे की,' तुझे कन्येचे लग्न यथाविधि जालें नाही म्हणून समस्त ब्राह्मण क्षेत्र आंबेजोगाई याचे पत्र आलें त्यावरून हे पत्र सादर केले असे. तरी वर योजून मुलीचें लग्न करणे म्हणौन, वरील अन्वयें.

—

३

सदरहू आन्वये तीन पत्रें संमत

छ २१ जिलकाद सुाा इहिदे

समानीन कार्तिक मास.

¶*The Peshwa issues authority to Sadashiv Nagnath to revoke the first marriage of his daughter as it was not performed according to strict religious injunctions and to celebrate again the marriage of his daughter with a fresh bridegroom of his choice.*

No. 54] [?

तालीक

श्री

श्रीमंत प्रभुवर्य राजश्री

रावसाहेब यासी,

प्रति रामशास्त्री आसीर्वाद विनंती. ताा छ १२ जिल्हेजपावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. पत्र पाठविले ते प्रविस्ट जाहालें. सासवडकर सिंपी व पुणेकर सिपी याचा जातीचा कजिया आहे त्याचा फडशा जाहाला नसता गंगाजी सरवद्या सिंपी चांगले सिंप्यासी सोइरीक करितो, लग्न होते, म्हणून कल्ले. तरी गंगाजीचे लग्न होऊ न द्यावे म्हणोन आज्ञा त्यास, आज्ञेप्राो येविसीचा बंदोबस्त केला. शृत होय हे विनंती.

सदरहूप्राो जाब निंबाजी गाडे खिजमतगार सरकार याजवळ दिल्हा असे व सरकारचे पत्रहि याणेच आणिले.

¶*Ramashastri executes an injunction of the Peshwa in a case of the tailors' dispute awaiting decision. See No. 41 above.*

No. 55] [13-3-1782

नकल

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री पाठकजी यांसी

विनंती उपरी. जिवाजी नारायेण अडगरे कुलकर्णी कसबे बावडे प्रो इंदापूर याचें बोलणें कीं, आपले आजें भगवंत तुकदेव यास पुत्र लक्ष्मणपंत व नारोपंत. या उभयतांचे मातुल गोपाळ सिवाजी बोकील जमदग्नि वत्सगोत्री पंचप्रवरी यास लक्ष्मणपंत भाचे दत्तक दत्तविधान करून दिल्हे असतां त्याच गोत्रीं आनंदराव लक्ष्मण याणी शरीरसंबंध केले म्हणोन त्याविसी आनंदराव लक्ष्मण याचा व जिवाजी नारायेण अडगरे याचा कजिया लागोन मनसुबी हुजूर पडली आहे. त्याची चौकसी होऊन फडशा न होता आनंदराव लक्ष्मण याने गैरवाका समजाऊन आपले मुलीचे लग्न करण्याविसी परवानगी घेतली आणि ते मूल बावाजी मल्हार तटू जमदग्नि वत्स गोत्री याचे बंधूस देऊन लग्न केले. सबब जिवाजी नारायेण याने फिर्याद केली. त्यावरून उभयतांचे कजियाची चौकशी होऊन फडशा होये तोंपर्यंत तुम्ही कोणासी शरीरसंबंध न करणे म्हणोन गुदस्तां बावाजी मल्हार तटू यास ताकीद केली. यास्तव तैसेंच आजपर्यंत राहिले आहेत. त्यास हाली बावाजी मल्हार तटू याणी विनंती केली कीं आपल्या मुली उपवर जाल्या, त्यांची लग्नें करावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणोन. त्यास उभयतां अडगरे याचे कज्याचा फडशा सत्वर होत नाहीं. परंतु मुली उपवर जाल्या त्यांची लग्ने केलीच पाहिजेत, येविसींचा शास्त्रार्थ मनास आणून मुलीचीं लग्ने कोणी करावी किंवा न करावी हे लिहून पाठवावें. सुा इसने समानीन मया व अलफ छ १९ जावल.

¶The marriages of the daughters of one Bawaji Malhar Tatu were prohibited by order of the Government as his brother happened to be married to a girl of the same Gotra and the case came before the justice of the place. A request is made by Bawaji Malhar that he could no longer postpone the marriages of his girls and that he be allowed to perform them.

No. 56] [9-9-1781

नकल.

श्री

वेदमूर्ति राजश्री बाळंभट

साळवेकर क्षेत्र वांई यांसी

प्रति रामशास्त्री नमस्कार विनंती उपरी. गंगाधर सोवनी हा सखाराम केशव निसबत तोतया याकडेस गेला व त्याजवळ शागीर्दीस राहोन महिनाभर त्याचे

पंक्तीस भोजन केलें. यास्तव त्यास प्रायश्चित चांद्रायण नेमून येथे पंचगव्य देऊन पादचाली कृष्णा स्नानास पाठविला आहे. तरी कृष्णा स्नान व दाहा सहस्र गायत्री जप व ब्राह्मणभोजन करऊन शुध्ध करावा. रा। छ २० रमजान सु॥ इसने समानीन मया व अलफ. बहुत काय लिहिणे ?

¶*Penance is prescribed to one Gangadhar Sovani for having dined with the Pretender.*

No. 57] [*1777*

नकल बाळंभट साळवेकर

श्री

यादी गंगाधर सोवनी हा सखाराम केशव निस्बत तोतया याकडेस गेला व त्याजवळ शागिर्दीस राहोन महिनाभर त्याचे पंक्तीस भोजन केला. यास्तव त्यास प्रायश्चित्त चांद्रायण नेमून येथें पंचगव्य देवून पादचारी कृष्णास्नानास पाठविला आहे; तर कृष्णास्नान, दाहा सहस्र गायत्री जप व ब्राह्मणभोजन करून शुद्ध करावा.

¶*Penance is enjoined in the case of Gangadhar Sohoni for dining with the Pretender of Sadashivrao Bhau.*

No. 58] [?

पौ छ २४ रजब.

श्रीगणराज

राजश्री कृष्णाजीपंत दिवाणजी सा॥ ना॥ विनंती उपरी. कागीनेल्या प्राती ब्राम्हणाची बायको लस्करांत आली ती आठ दाहा दिवस लस्करांत मराठ्याचे राहुटीस होती. मराठ्याचे घरची भाकर घेऊन येक दिवस खाली, याप्रमाणे येथें वडिली सांगितले. त्यास ब्राम्हणाची तिचें माहेर देवगिरीस आहे यास्तव हली तुम्हाकडे पाठविली आहे ; तरी बाहेर हिला कोणाचे घरी दोन दिवस ठेऊन निराळे जेवावयास द्यावे आणि हिचा सासरा व बाप कोठे आहे त्यास लि॥ पा॥ त्यास आणऊन त्याचे हवाली करावी. पुढे याप्रो होऊ नये असे सागावे. हिला हाली रा॥ राघोपंत मामास सागून त्याजकडील दोन माणसे देऊन पा॥ आहे, रा॥ छ २३ रजब हे विनंती.

¶*Parsharam Ramchandra Patwardhan writes to Krishnajipant that a certain Brahmin woman was discovered in the camp, who lived in the hut of a Maratha and ate bread offered by him. The addresee is asked to find out her relations and entrust the woman to them.*

No. 59] [1788

पुणें जमाव रु. नं. ७७६

कागद नं. 56078

श्रीमंत रा पंतप्रधान साहेबाचे सेवेसी

ऽ आज्ञाधारक देशमुख व देशपांडे पा इंदापूर दंडवत आा सा ना विा यैसीजे. मौजे वडेपुरी पा मजकूर येथील पाटीलकी देवकर करीत आहे. देवकरासी नरसोजी नाईक नवरा कजिया करीत आहे की मौजे मजकूरची पाटीलकी आपली आहे म्हणोन हरदोजणाचा कजिया हुजूर पडला आहे. त्याजवरून साहेबी आज्ञा केली की पूर्वील पाटीलकीचा मजकूर कैसा आहे तो सांगणे म्हणोन आज्ञा केली. त्यास मौजे मजकूरची पाटीलकी नाथ नाईक नवरा याची आहे त्यास नाथाने समाध घेतली. याजवर तान्हाजी पा नाईक नवरा गांवावर होता, तो पाटीलकीचे वतन सोडून गेला. मौजे मजकूरी नाईक नवरियाचे कोन्ही राहिले नाही, आणि त्याची निसबतहि कोन्ही गावावर नाही. तेथे वेतनसंबंध जमेदाराचा आहे. म्हणौन रामाजी व बाजी देवकर पाटीलकीवर उभे राहून पाटिलकी करू लागले. रताजी व त्याचा लेक सिवाजी व बाजी देवकर याणे मौजे मजकुरची पाटिलकी निर्वेध केली. त्याचे दाखले पा मारी महजर जाहले आहेत त्या महजरावर रताजी व बांजी देवकराचे दाखले आहेत ते दाखले लिहिले असत.

१ शके १५७७ मनमथनाम संवत्सरे मौजे पलसदेव येथील कुलकर्णाचा महजर जाहला आहे त्याजवर बाजी देवकर मोकदम मौजे वडेपुरी यैसा दाखला आहे. कारकीर्द माहाराज राजश्री सिवा(जी) राजेसाहेब.

१ कसबे बावडे येथील पाटील भाऊ भाऊ भांडले होते, त्याचा महजर जाला आहे त्याजवर दाखला देवकर पा मोकदम वडेपुरी यैसा आहे. कारकीर्द उमाजी संभाजी राजे भोसले, सुरू इसने सितैन

१ शके १६०७ क्रोधीनाम संवत्संरे हणमंतराव.

No. 60] [?

श्री

पत्रे निा नारो मोरेश्वर :—

जनार्दनपंत यांस पत्र की, रामाजी आनंत यांची कन्या मारनिलेच्या पुत्रास द्यावी, गोत्र घटित पाहून निश्चये करोन लग्ने देखील् काढिली, यैसें असतां गिरमाजी

शंकर व लक्षुमण दामोदर याणी इसकील काढिली कीं पूर्वी शरीरसंमंध याचा जाला तो सप्रवरी आहे. यासी सरीरसंमंध न करणे. यैसी इसकील काढोन शरीरसंमंध मोडिला. तरी यांचे मनास आणून सप्रवराचा दोष यांजकडे नसिला तरी त्यास ताकीद करोन याची सोयेरीक यांजकडे देवणे. आणि हरदोजणास आणून फजीत करणें की, यैश्या गोष्टी करावयासी प्रयोजन काये आहे? तरी याची तहकीक करोन विल्हे लावणे. येकगोत्री याचा शरीरसंबंध जाला यैसे ते म्हणतात. तरी मनास आणून यांजकडे दोष न लागे तरी सोयेरीक देवणे १

सदरहू प्रो गोविंदपंतास पत्र.

¶*Orders are issued to Naro Moreshwar and Govindpant that the objections raised by Girmaji Shankar and Lakshman Damodar to the marriage of Ramaji Anant's daughter be carefully examined and the ceremony be allowed to proceed, should the objections prove false.*

No. 61]. [?

नकल

श्री

स्वस्ति श्रीमन्निखिलवसुधामूर्धावतंस श्रीकृष्णातीरस्थलीभयेतविराजित समस्त-ब्राम्हणसमुदायेणानां सकलगुणकृपापारंगत राजेश्री गोविंदपंत नाना प्रभुवर्य सिरोमणि प्रति अनेक असीर्वाद उपरी: येथील क्षेम येथापूर्व असे. यानंतरी राजश्री राजोबा डांगे पंढरपूरकर याची स्नुषा माहेरास वडगांवास आली होती. तेथ बापू पाठक पुराणिक याच्या पुत्राने तिसी विभिच्यार कर्म करून तीस गर्भधारन जाले. हे वर्तमान तिच्या भर्तारास विदित जाले तेव्हां आपले स्त्रीस पुसिले की, हा गर्भ कोण्हापासून निर्माण जाला. तिने नामग्रहण बापूभटाचे पुत्राचें घेतलें. येसे श्रवण करून तिचा भर्तार बापूभटापासी जाऊन बोलला कीं, तुमच्या पुत्रानें माझी स्त्री भ्रष्ट केली, मी या स्त्रीचा त्याग करितो. माझे लग्न करा. तेव्हा लोकापवादास्तव गुप्तरुपे रुपये आठशत राजोबाचे पुत्रास दिल्हे लग्नानिमित्य. तदनंतर दैवात् जारिणी गर्भवती स्त्री मारिली किंवा आपमृत्याने मेली हे सर्व ईश्वर जाणे. हें कृत्य मृत्युपर्यंत झालियावरी बापूभट व त्याचे पुत्रानी राजोबाचे पुत्रास निग्रहत्राटणबंधन योगादि करून रुपये ते द्यावे हा उपाय केला. परंतु रुपये न येत येसे जाणून कर्जरोखा लिहून घेऊन ठेऊन ते समई सोडून दिले. पुनरपि राजोबाचे पुत्राची गांठ न पडे येस जाले. मग मार्गी संधि साधून उभयेता पुत्रास नेऊन कोंडोन ठेवलें. हें वर्ष येक झालें. ते उभयेता

मृत्य पावले की गडकिल्यावर घातले न कले. राजोबा वडगावास बापू पाठक याजकडे जातो. पुत्रांचे वर्तमान पुसतो. बापू पाठक उतर देतो, आम्हास कांही विदित नाही. हे कृत्य श्री उभयतीरी समस्त ब्राह्मणास विदित आहे. बहिस्कृत करावे तर सर्व द्रव्याश्रित राज्यसेवक. ब्राह्मणास ब्राह्मण्यविचार नाहीं, आपण धर्मपरायेण ; राजोबा अनाथ, याचे पुत्राची मुक्तता होये, बापू पाठकास धर्मशास्त्रोक्त सिक्षा कीं, गर्भिणीवध आणि ब्राह्मणनिग्रह हे माहाप्रायेश्चित्तसमयेस माधवमिताक्षरी हेमाद्रिनिबध्धमतेकरून घडेल. येतद्विषई विज्ञापनापत्र लिहिले ते अक्षरशा अवलोकन करून राजोबास संकटातून काढावे. विशेष सुज्ञशिरोमणि प्रति काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*This is a representation, probably from the Brahmins of Wai, to Govindpant to render justice to one Rajoba Dange. His daughter-in-law was defiled by the son of Bapubhat Pathak and the father and the son were shielding themselves behind Government officers whom they had bribed.*

No. 62] *[1790-91*

श्री

यादी रामचंद्र मेलगिरी दिमत पागा राजजी दिवे सुाा इहिदे तिसैन मया व अलफ. मशारनिल्हे तिगस्ता भाद्रपदमासीं पागेचे ठाण्यांतून पुण्यास येते समई मौजे धामारी ताा पाबळ प्रांत जुन्नर येथें श्रीविठोबाचे देवाल्यी रात्रीस राहिले. पाहाटेचे प्रहर रात्रीस निघोन पुण्याचे मार्गे येत होते तेव्हां गांवापासून बाणाचे टप्यावर चोरानीं लुटले. यावर माघारे गांवांत येऊन आरोली केली. तेव्हां गांवकरी चौवे मिलोन मशारनिल्हेजवळ आले. तेव्हां लुटल्याचे वर्तमान गांवकरीयाजवल सांगितले. यावर मशारनिल्हेचा माणूस घेऊन गांवकरी चोरी जाहाली त्या जाग्यावर गेले. तेथें पाहातां दोन घोडी चरत होती. तेथें आसपाशी शोध करितां पावशा कुलंबी याचे मलईत कंठाल व कागदाचा रुमाल सुद्धा सापडली. ते व घोडी घेऊन मशारनिल्हेची माणसे व गांवकरी गांवांत आले. रामसिंग व तात्या कुलकर्णी व तावजी हंबीर हे पुढें रामसिंगाचे बैल व आपले राणू डफल व बाल्या पोरगा याणें चारावयास नेले होते, त्याचे शोधास गेले. गांवकरी गावात आल्यावर माग काढावा तरी गांवचे रखवालीचा बेरड पेराजीच पलोन गेला होता. त्याजवर रामचंद्र मेलगिरी घोडी व कंठाल घेऊन पुण्यास आले; आणि सरकारांत चोरीचे वर्तमान विदित केले. तेव्हां गांवकरी यांस हुजूर आणून मनास आणिता रामचंद्र मेलगिरी गांवांत वस्तीस राहिले, तेव्हां जागले मागावे ते मागितले नाहीं. प्रहर रात्रीस निघाले. वाटाड्या मागितला नाहीं; परंतु मी निघालो तेव्हां

कुणबीयाणे बैल सोडून माझे आगे मागें जात होता त्याची व चोराची गांठ पडली म्हणोन मशारनिल्हेनीं सांगितले. त्याजवरून बैलक्याची चौकशी करितां राणू डफल बैल सोडून गेला होता, त्यास हुजूर आणून पुरसीस करितां त्याणें सांगितले कीं, मला दोघे गांवचे मांग रखमा व माहाद्या भेटले; त्याणी मला दाबिले तेव्हां पलोन बैल घेऊन आपले मळईत गेलो. तेथें मागाहून रामसिंग व तावजी हंबीर व तात्या कुलकर्णी हे बैलाचे शोधास आले. त्याजवळ हरदूजण मांग भेटले, हे वर्तमान सांगितले. मग तिघे निघोन गांवांत गेले, याप्रमाणें राणू मजकूर याणे सांगितलें. यावर मांग व रामसिंग वगैरे तिघे यांस हुजूर आणून, मांगास पुरसीस केली. त्याणी केंदूरचे मांगानीं व बेरडानीं चोरी केली म्हणोन लिहून दिल्हे. त्याजवरून केंदूरचे मांग आणिले. यावर धामारीचे मांग म्हणू लागले कीं आम्ही त्याची आदावतीनें नांवें गावकरी यांचे सांगण्यावरून लिहून दिल्ही. तेव्हां फिरोन मांगास पुरसीस करितां रखम्या बोलिला कीं, दावमालीयाची मका खंडून घेतली होती, तेथे माल्यावर राखीत होतो, ते रात्रीस गांवांत बोंब जाहाली हे कशाची म्हणोन दाव मालीयानें मला जागें करून विचारिलें. तेव्हां दाव मालीयास हुजूर आणून पुरसीस केली. तेव्हां दावमाली बोलला कीं आपण रखम्यास हाक मारिली नाहीं. रखम्यानें मला हाक मारली की गांवांत गलबला कशाचा? तेव्हां लांडग्याचा गलबला असेल असे मी बोलिलो; व माझी मकाहि मांगाने घेतली नाहीं याप्रमाणें लेहून दिल्हे. त्याजवरून रखम्यानें चोरी करून दाव माल्यास जागे करून बोलिला असे संभवते. त्यास सारांश पाहतां गांवकरी चोरीत होते नव्हते याचे निखालसे करावे तरी मांग * * * खरी आहे म्हणतात. परंतु गांवकरी आपण यांत नाहीं म्हणोन लिहून देतात, आणि तेव्हां गांवकरी याजकडेची चो(री)चा संबंध दिसत नाहीं. चिंचौलीचे पत्रात कुमक करावी असे आहे. मांग तरी निखालस चोरांत होते असे राणूस आढळले आणि त्याणी यांस दाबिवले असे राणूचे म्हणणे आहे आणि ते समई दुसरेयाजवळ बोलला आहे त्या पक्षीं मांग चोरीत होते हे जाणौन रामचंद्र भेलगिरी यांस वस्तवानीं काय गेली ते खरे लिहून देणे म्हणोन सांगितले. त्याजवरून त्याणी अजमासे किमती घालून साडे चारशे रुपयाची सनगे व नख्त सुद्धा गेली म्हणोन सांगितलें; परंतु अजमासे जुन्या व नव्या सनगाच्या किंमती घातल्या त्याचे प्रमाण काय? सबब मोहघम चोरीचा ठराव: ३९० रुपये

तपशील

१९० रखम्या व माहाद्या मांग याणी द्यावे; व अगोधर चोरी भरून द्यावयाविसी माली जामीनहि दिल्हा होता.

7479

२०० गांवकरी याणीं द्यावे; सबब की, मांगच चिंचोलीस गेले होते त्याणी गांवचे कामकाज करावे याबद्दल संत्या मांग यास आणावयास रखमाजी व लक्ष्मण डफल व बाल्या माली हे तिघे गेले. तेव्हां मांग मजकूर बोलिला कीं सरकारचा आरोप कांहीं चोरीचा आला होता, म्हणोन पांच सहा महिने सरकारांत पेचांत होतो. त्यास आदा मसाला वगैरे पडला तो देऊन सुटून आलो, त्यांस कुमक करावी त्याजवरून गांवांस नेऊन चौघांचे विचारे कुमक होईल ते करूं म्हणोन चिंचोलीकरास त्रिवर्ग गांवकरी याणी लिहून दिल्हे. सबब गांवकरी याणी द्यावे मांग नादान बजित जाहाले सबब रुपये १५०

५० रामसिंग व तावजी व राणू डफल व तात्या कुलकर्णी यास चोरीचा मजकूर समजला असतां चौकशी करावयास कारकून गेला त्याजवल मजकूर सांगितला नाही सबब रुपये

२००

३५०

¶*A case of dacoity is enquired into and a report made with the fines imposed upon the culprits.*

No. 63]

श्री

सेवेसी विनंती यैसीजे. राजश्री खंडो नारायेण देसपांडे पेण याचे लेकीवर तिचे दादलियाने आरोप ठेऊन अपंगत केली. त्यासी आम्ही मावलात ते वर्सी होतो त्यास तीन वरसे जाली. आम्हास काही ठावकेच नाही. सांप्रते यैकतो की, कुलाबियासी राजश्री सोइरोबा याजकडे याचा विचार पडला होता. त्यासी याही पस्ट उत(र) केले की, श्रीमंत राजश्री (गोविंद)राव बावा चिटनीस व महिपतराऊ यैसे पुणियासी आहेत तेच आज्ञा कारतील ते सर्वास माने आहे. यासी सांप्रते रा। खंडो नारायेणाची लेक पणवलीचे मुकामी श्रीमत राजश्री रामाजी माहादेव सुभेदार (याज)कडे गेली. त्याजवरून पेणाचे ग्रहस्तास आज्ञा केली जे, तीस पग्तीपावन करणे. त्यासी ते ग्रहस्त स्वतंत्र अपखुद आहेत त्याही माने केले. आम्हास

पेणेचे हवालदाराचे कारभारी राजश्री केशोपंत याही बोलाऊन पाठविले. त्यासी मूल पाठवितो आमच्याने चालवत नाही येसे सागोन पाठविले. त्याजवर दाहात्रीस मानूस पाठऊन द्वाही दुन्हाई[1] देऊन सदरेस घेऊन गेले. त्यासी आम्हास सांगितले की, आवघे ग्रहस्ताहि माने केले याजप्रमाने तुम्हीहि माने करणें. त्यासी आम्ही उतर केले की, ते ग्रहस्त आपखुद श्वतंत्र आहेत. आमचे वडील श्रीमत गोविंदराऊ बावा व महिपतराऊ याचे आज्ञेखेरीज आमच्याने माने करवत नाही. येसे उतर करितांच आम्हास बोलिले जे तुम्ही सुभेदाराकडे कल्याणास जाणे. याजवरी आम्ही उतर केले की, मूल जाईल, जाबसाल करणे तो करील. त्यासी त्याही आम्हासच अतिशयेकरून तुम्हीच जाणे. आम्हास डोलीखेरीज जावत नाही. डोली तो येथे मिलत नाही. त्यासी पुढे तरणखोपाहून हाजीर बेगारीचे डोलकर देवविता. त्यास आम्ही तेहि माने केले. घरास जाऊन वोढना, बिछयाना, सोवले घेऊ. त्यासी घरास जावयासी दरकार नाही, परभारेच * * * दे देऊन लाऊन दिल्हे. त्यासी बसत उठत अदकोस पाऊण कोस जमीन गेलो. तेथे उबासा आला. तेथे बैसलोच आहे तो मागाहून मानूस पाठऊन फिरविले ते परभारा घरास आलो. पुढे पंत काये करितील हे न कले. येसा विचार आहे, ते श्वामीस लिहिला आहे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The letter refers to a case of ex-communication of the daughter of a certain Deshpande of Pen and the attempts made by the father of the girl to remove the ban.*

No. 64]

श्री

तीर्थरूप राजश्री दादा मुा पुन
वडिलाचे सेवेसी

बालके गोविंदराव सिंदे देशमुख प्रा कुडाल चरणावर मस्तक ठेऊन सिर साष्टांग दंडवत विज्ञापना. ता भाद्रपद वा ३० पावेतो सर्व मंडली सुखरूप आंको विशस. यानंतरी गावचे वर्तमान तरी जाणू गावडा धनगर याचे लेकीचा मुहुतर श्रावण मासी लाविला. त्यास मौजे मजकुरी पूर्वीपासून आपले मोकाशाचे चिठीने गावातील मुहूर्त लागत आले. त्याप्रो हालीहि केले. ऐसे आसता हाली रो सदासिवपंतानी खानशाचा (?) आमल करून भाद्रपद मासी आले, त्यानी मौजे आखाडे येथे मुहूत लावावयास आमची चिठी का नेहेली नाहीत म्हणून

---

१ प्रतिबंध.

मुकद्मावर मसाला रुो २ दोन व जोसीभट याजवर मसाला रुा २ दोन व जाणू गावडा याचे बायकाचे डोईवर दगडी देऊन रुा ४ च्यार घेतले व जिल्हेदारहि याप्रोच घेईल ऐसे म्हणतो. गावी धनगर उपद्रवामुळे परागंदा होतात. पूर्वीपासून जिल्हे खानशाची चिठी मुर्हुतास वगैरे कधी येथे आणली नाही. याचा बंदोबस्त करून धनगर मजकूर याचा मसाला माघारा दिल्हा तर बरे; नाही तर गावातून जातात. कलावे सेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*One Janu Gawada of the goat-herd caste performed the marriage of his widowed daughter with the usual permit of the Mokasi of the place. But the new Government officer fined the persons involved in the ceremony for not having taken his permit. The Deshmukh of the place enters his protest against this innovation and requests that the fines be paid back.*

No. 65]

श्री

श्रीमंत राजमान्य राजश्री मोरो कृष्ण
पिंपुटकर यांसी आश्रित

लक्षुमण जोसी आशीर्वाद विशेष. येथी (ल) क्षेम तागाईत वैशाख शुध द्वादशी पर्यंत सुखरूप असों. यानंतर एक दोन पत्रें पाठविलि परंतु प्रतिउत्तर त्यांचें आलें नाहि. याकरितां चितास संतोष वाटत नाहि तर ऐसें न करणें. आलेया मनुष्याबराबर सविस्तर वर्तमान पत्रिं लिहोन पाठवित जाणें. श्रीचे दृष्टांत एक दोन झाले ते कैसे झाले यैसेच म्हणाल तर पिशाचे येथें जात नाहि. हरीहरेश्वरी जातात, १ देवतार्चन करित होतो तेथे दीप आणून कुमारीं लाविला. "आतां उठा" यैसी बोलिलि. २ या उतरी सप्तचंडी ज्येष्ट मासीं समाप्त होईल सूज्ञाप्रति विस्तार बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद

यानंतर तुह्मी ब्राह्मण सांगितला होता. तो तिन मास लावला. त्या उपरी त्याचे मातुश्रीस बहुत बरें वाटेनासें झालें या (क) रीतां त्यास दुर केल्यानंतर पनरां दिवशीं फिरउन त्यास लावावा एशास आहे, तुमचा चित्ताचा विचार काय असेल तो लिहोन पाठवणें त्या सारीका त्यास अथवा तुह्मीच करावा दुसरा ला का णे चे लिहोन पाठवणें हे आशीर्वाद.

¶*Lakshman Joshi writes to Moro Krishna about a dream that was revealed to him by his deity.*

+ सबंध पत्र बालबोधींत असून आहे तसेंच छापलें आहे.

No. 66] *[About 1810?*

श्रीकांसी

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवसी

विनंती शेवक भिकाजी अनंत पटवर्धन दोनी कर जोडून चरणावरी मस्तक ठेऊन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा आश्विन शुाा १० पावेतों मुकाम श्रीक्षेत्र येथें श्रीचे व माहाराजांचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. साल मजकुरीं पर्जन्य पुनर्वसु सरता चरण येक रोज व पुष्य सरता चरण दोन रोज त्यावर गोकुळअष्टमी जाहाल्यावर दोन दिवस ऐसे सिंपणे पाऊस पडले. त्याणे कांही पेरे जाहाले; परंतु सेतें चांगली जालीं नाहीं. त्यावर आश्विन शुाा ६ पर्यंत बिंदुमात्र नाहीं. तेणें करून दिवसेंदिवस महर्गता, इंग्रजाची सख्त ताकीद असतां होत गेली. हाली श्रीनें कृपा करून सप्तमीपासून आजपर्यंत सुवर्णवृष्टि केली, तेणेकरून धान्य स्वस्थ होत चाललीं. त्याचे भाव सरस निरस जिनस:—

षष्टीपर्यंत महर्गता जाहलिया कालचा				पर्जन्य पडल्यावर (११॥ पायली १) (१३ पायली)			
१	तांदुळ बारीक	०।	०।१	१	ताा बारीक	०।४	०।६
१	ताा मध्यम	०।२	०।३	१	ताा मध्यम	०।७	०।८
१	ताा मोठे	०।६	०।८	१	ताा मोठे	०॥.	०॥२
१	दाल तुरी	०।६	०।७	१	दाल तुरी	०॥२	०॥४
१	गहू	०।६	०।८	१	गहू	०॥८	०।॥
१	चणे	०॥.	०॥२	१	चणे	०।॥.	०।॥२
१	जव	०॥.	०॥२	१	जव	०।॥२	०।॥५
१	मूग	०॥.	०॥१	१	मूग	०॥२	०॥३
१	उडीद	०॥२	०॥३	१	उडीद	०॥५	०॥६
१	पकीचिनी	००३	००४	१	पकी चिनी	००३	००४
१	चिनी	००५	००६	१	चिनी	००५	००६
१	साल साकर	००७	००८	१	साल साकर	००८	००९
१	खड साकर	००८	००९	१	मीठ	००५	००७
२	मीठ	००५	००७	१	तेल गोडें	००६	००५
१	तेल गोडें	००५॥	कडू ००४॥	१	तूप	००२॥	००२।॥

7483

१	तूप	८८२॥।	८८३		१	गूळ	८।४	८।६
१	गूळ	८।४	८।६		१	मकाणें	८८५	८८६
					१	दूध दहीं	८॥।	८॥७

येणेप्रमाणें आहेत. तांदुलाचें पीक गेलें व मूग उडीद तुरीचेही कमी; पुढेपर्यंत पर्जन्य पुरल्यास गहूं जव चणा वगैरे होतील. येथें सरकारच्या हवेल्यास फाटकबंदीची बोहेरी रयेत बरोबर लाविली. दरमाहा प्रा ।= प्रमाणें हवेलीस येणेप्रमाणें देणे लागतें. त्यास म्हणोन पाहिलें सोडीत नाहीं व भोसले, सिंदे, होळकर याचे कारकुनाचा आदरमान करितात, तसा माझा राखीत नाहीं. कारण त्याचें या प्रांतीं दबाव भारी व वर्षास साहित्य पत्रें खलीते येतात. गोष्ट तों थोडी परंतु मान आहे. वकिलास ताकीद होऊन त्याची चकती आलियास उत्तम. येथे हरघडी लाहान मोठी गोष्ट पडते. नांवाप्रमाणें घडोन आल्यास संतोष, न आलियास अपकीर्ति. सूचनार्थ विनंती लिहिली आहे. गोष्ट सरकारची मर्जी असेल तसें होईल. यानंतर येथे भाद्रपद मासीं येके रात्रींत दोन तारे पडले, बाजारास आग लागली व धरणीकंप जाहाला; तो गया, प्रयाग, लखनौ फरकाबाद जबलपूरपर्यंत घडी आर्ध घडीपर्यंत जाहाला. कासींत येक देवल जीर्ण होते पडलें. दोन च्यार हवेल्यास दरजा+ जाल्या. लखनौत दाहापाच हवेल्या पडल्या व बहुत हवेल्यास दरजा जाहाल्या. या प्रमाणे कोठे कोठे जाहालें. गंगेचे पाणी गडमळून जलचरे हाडबडलीं, हे मजकूर दोन च्यार पत्रीं पेषजी विनंती लिहिली आहे ती पावतील, न पावतील याकरितां हालीं विज्ञापना लिा आहे. त्यावर आलीकडे दुसरा तारा पडला, व येक रोज गर्जना विपरीत जाहाली, सेवेसी कलावें म्हणोन लिा आहे. राजश्री राघो रामचंद्र सरकारचे तिरस्थलीस आले त्याविसी व सरकारचे छत्रास खर्चास पैसा नाही, याविसी दोन च्यार वेल विनंती लिा व राघो रामचंद्र हुजूर आहेत, विनंती करीत असतील तेथें मी काय लिहूं? समय या तरेचा, वारंवार लिहिणें याचें प्रयोजन नाहीं. सुश्रिता जाल्यावर आपण विसरणार नाहीं. आपण होऊन छत्र घातलें प्राचीन नव्हे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bhikaji Anant Patwardhan gives from Benares the rates of several articles. He also describes some curious incidents occurring in the north, e.g., an earthquake, fall of meteors, etc.*

\+ दरजा = भेगा.

7484

No. 67]

श्री

श्रीमत् राजश्री नानासाहेबाचे
सेवेसी

सेवेसी आज्ञाधारक अर्जूनजी हवालदार पेठ विज्ञापना यैसी जे, साहेबी पेठेमधे विहीर खाणितली. त्यास त्याचे उद्यान[१] करावे ते केले नाही. याकरिता आम्हास लागीर[२] होऊन पाये गेले; पागूल जाहालो. च्यार मुले माणसे हैरान. उपासी मरतात. कर्ज गोसावी वगैरा कर्जदार मिलोन दोनसे रुपये जाहाले आहेत. ते रोज उठोन धरण बैसतात. आमचे पोट भरेना तरी वडिली साहेबाच्या आमचे चालविले तैसे आगत्ये धरून चालवण. मजला साहेबावाचून दुसरी गत नाही. यैसी कारकून आम्हापासी घसघस करितात. काये निमित्य की, हरयेक खर्चवेच होतो त्यास मुदईगिरी[३] माझी जे, धण्याचे हित ते करा म्हणतो. यामुले मी नसावा यैसे त्याचे चिती. तरी बरे त्याची वादपूस करणार साहेब धणी आहेत. मी तो बुडालो आहे. साहेब मेहरबानगी करून चाकराचे ऊर्जित करतील, कर्ज वारतील, माणसात घालतील तरी सेवक पदरीचा आहे. नाही तरी समुली बुडालो. याचे अभिमान धन्यास आहे. विशेश काये ल्याहावे? साहेब धणी मायेबाप आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*One Arjunji Havaldar, who is possessed and maimed, solicits maintenance from the Peshwa. The writer attributes his disability to the fact that the necessary religious ceremony was not performed after the completion of the excavation of a well at Peth.*

No. 68] [1734?

श्रीजयति

अपत्यें सा। नमस्कार विनंती. राजश्री स्वामी माघी यात्रेस प्रतिपदेनंतर स्वार होऊन येणारसे राजश्री अंबाजीपंताचे पत्र आलें. आम्हासहि राजश्री श्रीजवल आलियावरी येणेस लिहिले आहे. वरकड साहित्याविसीं लिहिलें त्याजवरून वेठ्याचे रोखे करून साहित्याविसीं सर्वास ताकीद केली आहे, करीत आहो. सेवेसी विदित व्हावें म्हणून लिहिलें असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Balaji (Nanasaheb) informs his father that the King is proceeding to Jejuri for the Magh gathering of pilgrims and that the writer is also asked to meet the King at that place.*

---

१ उद्यान = उद्यापन. २ लागीर = पिशाचबाधा. ३ मुदईगिरी = दावेदारी.

7485

No. 69] [1751?

॥ श्री त्रिंबकेश्वर ॥

वेदशास्त्रसंपन्न श्रित्रिबक नाशिक
क्षेत्रत्छित ऋग्वेदि व तैत्रीय व
वाजसनि व कात्यायन व सामवेदि
व अथर्वणवेदि समस्त ब्राह्मण याप्रति

विद्यार्थी बाळाजि बाजीरावपंत प्रधान साष्टांग नमस्कार विनंति उपरी * * * * * सर्व कर्मानुष्टानंतर आशिर्वादमंत्र य * अनुक्रम * ई ऋग्वेद मत्रोतर. तैत्रिय व वाजसनियाहि परस्परे कलह * * त्यामध्ये मारामार केली. त्यानंतर ऋग्वेदप्रभृति स(म)स्त ब्राह्मणाहि समापत्र केले जे, वाजसनि याशि अंन्नव्यवहार न करावा ऐसे समापत्र करून काही दिवस चालत होते. त्यानंतर रा। भाऊसाहेब श्रियात्रेस आले. त्यास वर्तमान विदित जालियावर समस्त ब्राह्मण बलउन पूशिले कि तट किंनिमित्य केला आहे. त्याहि पूर्ववृतांत सांगितला ऐसा जे, क्षेत्रामध्ये प्रयोजन जाले तेव्हा ऋग्वेदि याहि मंत्र म्हणला. मग तैत्रियाहि मंत्र अरंबिला. म्हणउन वाजसनियाहि मारले. ऐसे वर्तमान सांगितले. त्याजवरून रा। भाउसाहेबाहि ऋग्वेदि व अपस्तंब व वाजसनि समस्त ब्राह्मणास अज्ञा केलि जे, अह्मि श्रियात्रेस आलो आहो. येथे सर्वाचे पूजन करावे लागते यास्तव तुम्ही समापत्रे केलि ति आम्हाजवळ ठेवणे. यात्राविध करून पुण्यास जाऊ तेथे स(म)स्त ब्राह्मण त्रिंबकर येणे. श्रावणमासि सर्व देशिचे ब्राह्मण सर्व शाखाध्यायि येतिल तेथे निश्चय मंत्राचा होईल तो करून देउ. तदनरूप वर्तणुक करणे. त्यास समस्त पुण्यास आलेत. मग येथे सभा केलि. सभासद ब्राह्मणाहि श्रिभागवत व विष्णुपुराण व चरणव्युहु व अनेक ग्रंथ विचारणा करून एकवाक्यता पाहून व श्रिकाशिप्रभृति यावद्रामेश्वरपर्यंत मध्यगत थोर थोर क्षेत्रि समस्त माहाराष्ट्र व तैलंग व कानडे व द्राविड यामध्ये सर्व शाखाध्यायि याचि येकत्र सभा जाली असता प्रथम मंत्र ऋग्वेद व द्वितिय मंत्र तैत्रियशाखा तदनंतर वाजसनिय व कात्यायन त्यानंतर सामवेदि व अथर्वणवेदि मंत्र एसा क्रम शास्त्रनिश्चित अनादि शिष्टाचार आहे. त्याप्रमाणे श्रित्रिबकेश्वरी व ना(शिक) क्षेत्रि समस्ताहि मत्रपाटक्रम म्हणत जाणे. या(विसि) समस्तास पत्र (पा)टविले असे. येणेप्रमाणे वर्तणूक करणे. याविषयी जे अन्यथा करतिल त्यास शास्त्रविचारे शासन होऊन येईल.

¶*The Peshwa communicates to all the Brahmins of Nasik and Trimbak the decision of the conference held at Poona regarding the priority to be observed in reciting the Vedic hymns by the Brahmins of various sects.*

१ सबंध पत्र बालबोधींत आहे. नकल मुळाबरहुकूम आहे.

No. 70] - [16-4-1756

श्री

राजश्री कमाविसदार वर्तमान
व भाव प्रांत पुणें गोसावी यासीं

श्री बाळाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद व नमस्कार. सुा सीत खमसैन मयां व अलफ. श्रीमार्तंड जेजूरी येथील यात्रेस वगैरे बारमाही कर बसतो. कलम :

१ देवद्वारचा कर
१ खुटफेलीचा हासील व मेट
१ बगाड व जावळ
१ खोडाबेडी
१ तीर्थांचा कर
१ भंदी
१ डांका
१ बकरकसाई

८

येकून आठ कलमे याचा कर सालमजकुरीं माफ केला असे; तरी सदरहू आठ कलमाचा हासलि व कर साल दरसाल येकंदर न घेणे. बार जाणिजे. छ १९ रजबू.

¶*An order of the Peshwa abolishing the eight different cesses which were till then levied on the pilgrims visiting Jejuri.*

No. 71] [9-9-1757

श्री

आश्रित जनार्दनभट ढेरे अग्निहोत्री विज्ञति यैसीजे : आपल्यास माहायात्रेचे ब्रह्मस्व¹ जाले आहे. माहाराज ब्राह्मणाचे छत्र आहेत यास्तव विनंती केली आहे; तरी राजश्री मेघ:शाम बापूजी व गोपाळराव बापूजी याचे तालुकियांत गावगना संभवना करून देविलिया ब्रह्मस्व परिहार होईल. स्नानसंध्या स्वस्थचितेकरून चालेल. हे विज्ञापना.

सन समान छ २४ जिल्हेज.

---

१ कर्ज.

7487

हजार रुपयेपर्यंत शिवाय सरकार यैवजी साधून भटजीस देणे, आसी गोपाळराव बापूजीवर सनद द्यावी. देणे:

छ ७ मोहरम सन समान सनद लिहिणे.

¶*Sadashivrao Bhau allows a grant of one thousand Rupees to one Janardan Bhat Dhere in order to free him from his debts.*

No. 72] *[9-3-1759*

श्रीशंकर प्रो

राजश्री नानासाहेब

राजश्री भाऊसाहेब

श्रीमंताचे सेवसी

विनंती जानो माणकेश्वर कुलकर्णी काा वाघोली प्राा वाई विज्ञापना यैसीजे. आपली मूल वधू पाचा वरशाची होती. तिजला भोजननिमित्य माहादाजी सिधनाथ मेढेकर याने अपले घरास नेली. मग तेथून रानात श्रीरामस्वर याचे देवालई मुलीस नेले. बायेका तिघी विधवा व भट माभळस्वरकर यानी नेऊन अमंत्रिक पिशाच लग्न लाविले. ते समईच आपण जाऊन त्या ब्राम्हणाच्या गळा पडलो. तो भट आपण घेऊन वाईस गेलो. मग तेथील ब्राम्हणानी ष(ब्द) ठेऊन दंड घेतला. त्याजपासून अम्हास पत्र (ले)हून देविले व क्षेत्रस्थानीहि अपले पत्र दिध(ले) की, आल्या वरास मूल देणे. ती दोन्ही पत्रे घेऊन पुणियास आलो. तीं पत्रे श्रीमंत यासी दाखविली. त्यानी रो शामराव अंबाजी यास आज्ञा केली की, शोध पाहून विनंती करणे. त्यावरून रो शामराव यानी शोध पाहून माहादाजी सिधनाथ याजपासून येजिदपत्र घेतले. हे तिन्ही पत्रे श्रीमंत यानी ध्यानास अणून राजश्री येमाजीपंत अन्ना व शास्त्री व जोतिसी यासी विचारले. चतुस्ट करून शोध पाहून परवानगी रो नारोपंत प्रचुरे यासी सागितले की, अल्या वरास मूल देणे. यैस पत्र देवयाची आज्ञा करविली. सेवसी श्रुत होय.

येणेप्रमाणे पत्र द्यावयाची परवानगी राजश्री भाऊ साहेबानी सागितली आहे तरी सदरहू प्रो पत्र द्यावे.

लिहिणे

छ ९ रजबू सुाा तिसा खमसेन फाल्गुन.

¶*Jano Mankeshwar applies to the Peshwa for an order cancelling his daughter's marriage, performed by the Pishacha (i.e., irreligious) form, and granting him permission to celebrate the marriage of his daughter, with another bridegroom, according to proper forms and rites. The order applied for was issued.*

No. 73] [4-4-1760

छ १९ साबान्-
-सन सितैन

श्री

सेवेशी विज्ञापना ऐसीजे. स्वामींनी कृपा करून आज्ञापत्र पाठविले, तेथे आज्ञा की श्रीभवानी तुळजापूर येथे श्रीदेवीजवळ नगारखाना घालावयाचा नवस केला होता त्यास हली श्रीजवळ नगारखाना ठेऊन चालता करावा म्हणोन आज्ञा केली. त्यास आज्ञेप्रमाणे शहरीहून नगारची व नौबतखानियाचा सरंजाम आणोन स्थलाची योजना आज्ञेप्रा करून चालता करितो. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. छ १७ शाबान.

¶*The Peshwa is informed of the drummers being employed in the temple of Bhavani at Tuljapur, as instructed by him.*

No. 74] [16-5-1761

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री विसाजी कृष्ण व हरि
गोपाळ गो यांसी

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुा इहिदे सितैन मया व अलफ. सरकारांत हेणमगाईचे[1] प्रयोजन आहे. तर हणमगाई चांगल्या चारपांचसेपर्यंत घेऊन येणे. तुमचे लस्करांत लुटीची गुरे येंदा पुष्कळ आली आहेत. कांही गाई त्यातून काही मिळवाव्या फुकट; येणेप्रो करून चारपाचसे गाईचा भरणा येऊन पोहचेसे करणे. जाणिजे छ १० सवाल.

¶*The Peshwa orders Visaji Krishna and Hari Gopal to send some 400 to 500 cows.*

No. 75] [29-3-1763

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री व्यंकटरामशास्त्री स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी रघुनाथ बाजीराऊ नमस्कार विनंती. उपरी, चैत्र वद्य अमावास्येस सूर्योपरोगसमई[2] गोदानें वगैरे येणेंप्रा धर्मादाव करावा:

शंभर गोदानें गाय व साहित्य व दक्षणा दर गोप्रदान मोईन रुा पर्वकालीं येक ब्राम्हण स्वतंत्र लाऊन कुशेंकरून ग्रहण सुटे तों-

---

१ मोठाड गाई. २ सूर्यग्रहण.

चालीस ४० प्रा॥ येकून रुपये चार हजार, त्यात गाई मिळतील तितक्या घेऊन गाईच द्याव्या. थोड्या बहुत कदाचित न मिळत तरी चालीसप्रा रुपये घ्यावे. बहुधा गाईच घ्याव्या. कलम १.

मंडलेश्वर अथवा प्रा कसरावद येथील जमीन येक चाहूरभर उतम ब्राम्हण पाहोन उपरागसमई दान देऊन रुपये १०० दक्षणा द्यावी.

पर्यंत जितकीं स्नानें होतील तितकीं करवावीं. त्याचा विधि: [१]कुशोसि कुशपुत्रोसि ब्रम्हणा निर्मित: पुरा ॥ त्वयि स्नाते स च स्नातो यस्येदं ग्रंथिबंधनं ॥ मज्जयेदष्टवारं तु स्वयमंते समाचरेत् ॥ याप्रमाणें करून दक्षणा नेमणुक रुा ५०.[+] येणेप्रा करावें.

चैत्र शुध द्वादसीस हाच मजकूर लिहोन कासिदजोडी पाठविली आहे. धुमधामेकरितां पावेल न पावे याजकरितां दुसरी जोडी रवाणा केली आहे. कलावे.

येणेप्रा कार्य करून उतर पाठवावें. जाणीजे. छ १३ रमजान, चैत्र शुध पूर्णिमा भौमवार. बहुत काये लिहिणे, हे विनती.

¶*Raghunathrao sends instructions to Vyankatramshastri about the religious charities and observances to be carried out in connection with the solar eclipse falling on 13th April 1763.*

No. 76] [*16-2-1764*

पौ॥ १६ साबान सन आर्बा.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रामाजी माहादेव मो साष्टी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १३ माहे शाबानपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जालें तेथें आज्ञा की, साष्टी कल्याण प्रां॥ कर्नाला त्रिजयेदुर्ग सुवर्णदुर्ग या तालुकियांत ब्राम्हण आश्रित आहेत त्यांस सरकारांतून वर्षासनें व गांव इनाम राज्याभिवृध्यर्थ दिल्हे असेत. त्यांहीं आपलाले घरीं अनुष्टानें शत्रुपराजयार्थ करावी. खासा स्वारी कर्नाटक प्रांते जाली आहे. तरी याप्रों वेदमूर्तीस सांगोन अनुष्टानास प्रारंभ करवणें म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रों ब्राम्हणवृंदास सांगितलें. स्वामीचें अभीष्टआभिवृध्धी-

---

[१] येथून + अशा खुणेपर्यंत मजकूर बालबोधींत आहे.

चिंतन निरंतर श्रीचे चरणारविंदीं प्रार्थनाविशीं तत्पर आहेत. त्यामध्यें प्रस्तुत हे आज्ञा सेवकानें दर्शविली. तेणेंहेकरून वेदमूर्तीस संतोष होऊन शत्रुपराजयार्थ अनुष्ठानें आरंभ केलीं आहेत. सरांश, स्वामीचें पुण्य अगाध आणि भूदेवांचे आसीर्वाद; तेणेंकरून शत्रु पादाक्रांत होईल. +सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadev writes to Peshwa Madhavrao that the latter's instructions regarding performance of certain rites in order to invoke divine aid to destroy the enemy, will be duly carried out.*

No. 77] [*22-1-1766*

पौ छ २२ रमजांन सन
सीत

श्री

विज्ञापना स्वामीनी छ १० साबानचे पत्र पाठविले ते छ २० मिा पावोन बहुत संतोष जाहाला. लिहिले वर्तमान सविस्तर कलले. बैरागी हिंदुस्थानातून विष्णु व गणपतीची मूर्ति घेऊन आले. मूर्ति फार चांगल्या याजकरितां घेतल्या. गणपतीस तुमचे नावची अक्षत लाविली. विष्णु मूर्ति फार चांगली त्यास लहानसे देऊल बाधून पुष्पवाटिका करावी असे मानस. याजकरितां जाग्याविसी राजश्री गोविंदपंत तात्यास पत्र लिा. त्याणी आपली जागा दिल्ही तर उतंम. नाही तर बालाजीपंत ठोसर याचे सेजारी जागा आहे त्यापौ जागा लिा प्राो लावी रुदीची परवानगी घेणे. गोविंदराव तात्याचें विद्यमाने पुसावे, म्हणौन पत्री आज्ञा केली. त्यावरून तात्यास पत्र दाखविले. त्याणी तेच क्षणी सांगितले जे, मी आपली जागा देत नाहीं. तेव्हा श्रीमंतास त्याजकडूच विनंती करविली. परंतु जागा द्यावयाची मर्जी नाहीं. तात्यानी सांगितले जे, तो लकडखाना नव्हे. रिकामी जागा लकडखान्यास लगती मात्र आहे. परंतु जाग्याची परवानगी जाली नाही. मग लटका आग्रह कशास करावा? स्वामीनी लिा की, उतर लवकर पाठवणे. त्यास येथे उतर याप्राो जाले. दुसरे स्थलीं जागा योजावी. येथे लिहिल्याने परिणाम नाही. आपली इछा देवस्थापना करून पुष्पवाटी करावी. त्यास तेथेच येकाधी जागा च्यार रुा पडले तर देऊन घेऊन करावे. आपली इतकी निष्ठा आहे तर भगवंत जागाहि मर्जीजोगती योजून देईल. येथून परवानगी होत नाही कलावे. राजश्री गोविंदराव तात्यानी श्रीमंताचा निरोप त्रयोदसीस घेऊन गेले. त्याचे घरी लग्न याजकरिता परभारे वाईस जातील, तेथून कोल्हापुरास जाऊन मग पुण्यास येणार. कलावे. श्रीमंत राजश्री दादा फडनीस यास पांच सात रोज लस्करांत ताप आला. येदा फारच शरीर

गलाटले. याजकरितां निरोप घेऊन टोक्यास गेले. पंधरा दिवस टोक्यात आपल्या वाड्यांत राहून मग पुण्यास येणार. कलावें. गणपतीचे मूर्तीस माझे नावे अक्षत लाविली. त्यास माझे चितांत फार दिवस गोष्ट होती. स्वामींनी सफल केली. स्वामीचे पाय द्रिष्टीस पडल्यावर मूर्तिहि पाहीन. वरकड वर्तमान यथास्थित असे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

रखमाजी जगथाप याची जागा आपण मागत होते असे येथे श्रीमंतास कोणीं सागितले. त्यावरून आपल्यास पत्र जागा न घेण्याविसी गेले म्हणौन ऐकिले. त्यास सरकारचे जाग्यासिवाय निर्वेध उदंड आहेत. तेथेच पाहून कर्तव्य ते करावे. गोविंदराव ठाकूर यांचे ओंकारेश्वराजवल ते जागा विकणार असे येथे ऐकिले. मर्जीस आल्यास ती जागा बरीच आहे. कोणती योजनेत येईल ते लिहावे. हे विज्ञापना.

¶*Haripant writes to Nana Fadnis about the idols, one of Vishnu and the other of Ganpati, purchased from the Bairagis by the addressee. The subject of securing good site, in Poona, for building a temple for the idol of Vishnu is discussed by the writer. This may be the origin of Belbag.*

No. 78] *[14-4-1766*

श्री

यादी रामचंद्र बाबाजी सेणवी यानी गैरराहा वर्तणूक केली आण प्रायेश्चित्त सरकार आज्ञेसिवाये घेतले. सबब हुजूर आणून नजर करार केली. सुाा सीत सितैन मया व अलफ. रूाो

१५०० तूर्त
१५०० वैशाख सुध १ हवाला साहुकारी द्यावा.
———
३०००

तीन हजार रुपये येणेप्राा करार करावे. छ ४ जिलकाद सन सीत चैत्र

¶*Ramchandra Babaji Shenavi pays a fine for performing penance without government sanction.*

No. 79] *[22-1-1769*

श्रीशंकर

श्रियाविराजित राजमान्य

राजश्री अपा स्वामीचे शेवेसी

पो बाजी विठल कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १३ रमजान पौष वद्य १ मुाा मोट जाणून स्वानंदलेखन करीत असिले पाा विशष,

7492

मकरसंक्रांतीच्या पर्वकालाकरिता श्रीगंगास्नानास ब्रह्मवर्त क्षेत्रात गेलो होतो. दाहा रोज क्षेत्री क्र(म)णा करून काल शनवारी येथे आलों. तीर्थस्वरूप कैलासवासी याचा घाट क्षेत्री आहे परंतु तेथे दीप कोणी लावीत नाही, मग आर्च्या होण कलतच आहे. चितास येईल तो उ(त)रतो, त्याजमुले जागा जाया होती. प्रस्तुत फिरंग्यानी तेथे सोरा वगैरे जिनस त्या जाग्यावर ठेविली होती. मुख्य स्थली सोरा ठेविला होता. पूजनास देखील जागा नवती. घाटाजवल राहिलो होतो. फिरंग्याचा प्रकार पाहून त्रास आला. उपाय नाही. तेव्हा त्याचा कारभारी बोलाऊन त्याजला युक्तीनेच सांगून कोठी तेथून काढून दुसरे घाटावर नेवविली; तेव्हा पूजनास जागा जाली. आम्ही होतो तोपावेतो आर्ची दीप चालला. मोकली जागा आसल्यास सर्व पूजन करितात. गुंतल्यावर पूजन होत नाही. आसा प्रकार जाला आहे. घासीराम ब्राह्मन तेथे पूजन करितो. याजवल श्रीमंत रावजीच्या हातचे पत्र आहे त्याची नकल पा। आहे. ते पाहून याचा दरमाहा चालता करावा. याचे घर घाटाजवल आहे. पूजन करितो याजकरितां समागमे आणून श्रीमंताकडे पा। आहे. पत्र श्रीमंत राजश्री रावजीस लि॥ आहे. आपण सांगून याचा दरमाहा चालता करावा. आमचे विचारे देशस्त योजून त्याजला दरमहा करून नेहमी तेथे पूजनास ठेवावा. श्रीगंगेचे पूजन चालल. वडिलांचे आर्चन होईल. सालिना काही तरीं तेथे खर्च व्हावा यांत उतम आहे. रावजी झासी प्रांते आहेत. आस्या प्रसंगी आंतर न व्हावे म्हणून लि॥ आसे. घासीराम ब्रा॥ याजला सनद प्रा॥ दरमा नेमून द्यावा. दुसरा विचार लि॥ तो उतम आहे. युक्तीस पडल तो करावा. आम्ही च्यार वेल तेथे गेलो. तो आसाच प्रा॥ म्हणून लि॥ आसे. सेवेसी कलावे. बहुत काय लिहिणे, कृपावृधि करावी, हे विनती.

राजश्री वेंकटराऊ आपा स्वामीचे शो॥ सा॥ नमस्कार विनंती उपर. लि॥ परिसोन कृपावृधि करावी. सनद राजश्री आबाचे हातचो त्याजवर मोहर चौकुटी आहे. त्याची नकल पा॥ आहे. घासीराम नित्य घाटावर आसतो. पूजन तऱ्ही करितो. याचा दरमाहा चालता करावा. रिकामे न पाठवणे. हे विनंती.

¶*Baji Vithal reports probably to Appa Mehendale the dilapidated condition of a bathing ghat constructed at Brahmavarta to commemorate Balavantrao Mehendale and requests that the allowance for worship granted to one Ghasiram Brahman may be continued to him.*

7493

No. 80] [2-3-1772

मसुदा

श्री

सेवेसी बाळाजी जनार्दन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २६ जिलकादपावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. छ २ जिलकादचे पत्र सादर जाहाले तेथे आज्ञा की, शके सोळासेत्र्याणव फाल्गुन मासी गुरु कुंभरासीगत होतो. शके पच्याणवामध्ये गुरूचा रासीभेद होत नाही. त्यास या वर्षाचे नाव काय? या वर्षी शुभकार्यादिक कर्तव्याकर्तव्य विचार पंडित व ज्योतिसी मेळऊन निर्णय करून वाक्यसहित सविस्तर लेहून पाठवणे म्हणून आज्ञा. त्यावरून सरकारचे वाड्यात पंडित व ज्योतिसी यांची सभा केली. त्याणी विचार करून निर्णयपत्र ठराविले तेच बजिनस स्वामीकडे रवाना केले आहे त्याजवरून निवेदन होईल. सांराष अर्थ पाहाता या वर्षाचे नाव लुप्तसंवत्सर नव्हे. अधिवत्सर आर्यसिधांत, सूर्यसिधांत, ब्रह्मसिधांत या ग्रंथांवरून येत नाही, परंतु ग्रहलाघवाचे स्फुट गतीने मात्र अधिवत्सर येतो. त्यास येविसीचा निषेध नर्मदोतर देसी दक्षिण देसी वि[वा]हादिक मांगल्य कार्ये केल्यास प्रत्यवाय नाही. श्रुत होय.

¶*Nana Fadnis reports the decision of an assemblage of Brahmans and astrologers regarding the name and the aspects of the particular Samvatsar year of Saka 1693.*

No. 81] [7-6-1775

पौ छ १० राखर सन
सीत सबैन.

श्री

राजश्री गोविंदराव मोरे हवालदार
व कारकून किले सिंहगड गो यासी

ॐ अंखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद नमस्कार. सुा सीत सबैन मया व अलफ. तुम्ही विनंती पत्र पाठविले ते पावले. श्रीअमृतेश्वर वास्तव्य किले मजकूर याचे अर्चेचे पूर्णा[हु]तीसमई तोफाची सरबती केली म्हणौन लिहिले ते कळलें. जाणिजे छ ८ राखर.

¶*The Peshwa writes to Govindrao More approving his action of firing guns at the time of the worship of Amriteshwar at Sinhagad.*

7494

No. 82] [3-8-1775

पौ छ ६ जाखर
सीत सबैन

श्री

सेवेसी जनार्दन आपाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ५ जाखरपावेतो येथास्थित असे विशेष. श्रावणमासची दक्षणा रमण्यात काल शष्टीस प्रारंभ केला तो आज तिसरे प्रहरी दिवसास यथासांग समाप्त जाहाली. ब्राह्मण आा २८९८१ येकूण सेरा सरासरी २८-॥। रुा ६११०८ येकसष्ट हजार येकसे आठ रुा लागले. याजखेरी वाडियातील दक्षणेचा अजमास दक्षणा जाहाली व व्हावयाची ते पूर्वी लिहून पाठविले आहे. त्यापैकी रमण्यांत दोनसे दोन आसामीस बेवीससे सत्रा रुा वाटले ते सदरहू बेरजेत आले आहेत. बाकी वाड्यातील दक्षणा व्हावयाची ते येका दो दिवसी पुर्ती जाहाल्यावर मागाहून लिहून पाठवितो. रमण्यातलि दक्षणेचे पत्रक तपसीलवार आलाहिदा पाठविले आहे प्रविष्ट होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Janardan Appaji informs the Peshwa that Rs. 61,108 were distributed among 28,981 Brahmans on account of the Dakshana of the month of Shravan.*

No. 83] [23-7-1775

पौ छ २९ जावल
आषाढ मास

श्री

शेवेसी जनार्दन आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा २४ जावलपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रावणमासची दक्षणादेखील खुर्दा खिचडीचा सुधा सवा लक्ष रुपयामध्ये वांटावी म्हणौन वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री यांजवल आज्ञा जाहाली आहे. त्याअन्वये दक्षणेचा बेत वाड्यांत व रमण्यात वाटावयाचा केला. येणेप्रमाणे रुो

६०००० वाडियांत सिष्ट ब्राह्मणांस

४०८८० बाा गुाा आा २१२९ दर ३८॥ प्रमाणे रुो ८१७६०
पौ निमे साल मारी दक्षणा

१९१२० जाजती सालमारी रमण्यांत थोडी दक्षणा द्यावयाची
याजकरितां चांगले ब्राह्मण पाहून ल्याहावयाचे केले
आहे आा १८७९ दर सरासरी १०

६०००० ४०००

च्यार हजार ब्राह्मणास वाडियांत दक्षणा द्यावयाची केली आहे.
त्याचा अजमास सदरहूप्रो दर सरासरी १९

११००० किता

७९०० खुर्दा खिचर्डीचा अजमासे
१९०० दुखणेकरी बा गुा २४८३ पैकी सालमारी
१९०० चिचवड व थेऊर व वाई वगैरे पैकी सालमारी
९०० गंगापूर वगैरे

११०००

९४००० रमण्यांत ब्राह्मण गुदस्ता प्रोच होतील सा अजमासे आ
३१००० यो सेरा सरासरी रुो १॥। प्रमाणे. साल गुदस्तां
दर आसामीस सेरा रुो ४॥॥ प्रो पडिला होता, त्याचा निमे
सेरा साल मारी असावा, त्यास साक्षर ब्राह्मण वाडियांत जाजती
ल्याहावयाचे केले, सा सेरा सदरहूप्रो पावणेदोन रुपयाचा पडतो.

१२९०००

येकूण सवा लक्ष रुपयात दक्षणा वाटण्याचा बेत सदरहूप्रो धरिला आहे.
परंतु रमण्यांत दक्षणा थोडी दिसेल त्याजकरिता दुसरे पर्याय

किता पर्याय रुो

४०८८० वाडियांत सिष्ट ब्राह्मण
२१२९ बा गुा
१००० जाजती साल मारी

३१२९

दक्षणा गुदस्तां सवायेकवीसशे ब्राह्मणास दिल्ही आहे.

४०८८० वाडियांत गुदस्ता प्रो
ब्राह्मण २१२९
रुो ८१७६० पौ निमे
११००० किती खुर्दा वगैरे
७३१२० रमण्यांत गुदस्ता प्रो ब्राह्मण
सा अजमास ३३०००
सरासरी सेरा रुो २॥॥।

१२९०००

7496

त्याचे निमे ऐवजातच सद-
रहू ब्राह्मणास दक्षणा वाटावी
ते.

११००० किता खुर्दा वगैरे

७३१२० रमण्यांत ब्राह्मण गुदस्ता
प्रोच होतील सा अजमासे
आा ३२००० यों सेरा
सरासरी २।.॥

१२५०००

येकूण तीन पर्याय सदरहूप्रमाणे योजिले आहेत. स्वामीस कलावे म्हणौन लिा आहे. मर्जी असेल तसे उतर पाठवावयाची आज्ञा जाली पाहिजे. आज वाडियात दक्षणा मुहूर्तेकरून वो राजश्री नाना फडके यासी अडीचशे रुपये दिल्ही. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa is requested to approve one of the three methods, proposed by Janardan Appaji, for distributing Rs. 1,25,000 as Daxina to the Brahmans in the month of Shravan.*

No. 84] *[30-7-1775*

पैा छ २ जााखर सीत
सबैन आषाढ[1] मास

श्री

शेवेसी जनार्दन आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १ जाखरपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रावणमासची दक्षणा सवा लक्ष रुपयांत व्हावी व वाड्यांतील व रमण्यातील दोन्ही ठिकाणचे ब्राम्हणाचे शेरे येथून लेहून पाठविल्याप्रमाणे पडावे. त्यास वाडियांत दक्षणा होत आहे त्याचा शेरा भारी पडतो हे काय? रमण्यांतील शेरा आधींच कमी आहे आणि वाड्यांत दक्षणा अधिक पावली म्हणजे रमण्यांतील शेरा कमी होईल. यास्तव राजश्री रामशास्त्री यास पत्र लिहिले आहे व तुम्हीं लिहिल्याअन्वये समजाऊन सांगोन बेताप्रमाणे दोन्ही ठिकाणी दक्षणा येथास्थित होऊन सर्व सवा लक्षांत आटोपे असे संभाळून करणें म्हणून स्वामीचे पत्री आज्ञा. त्यास ब्राम्हणाची दक्षणा वाड्यातील व रमण्यांतील याचे शेरे पुरंधराहून लेहून आल्याचे अन्वये पडावे. वाडियांत अधिक

---

१ श्रावण पाहिजे. हस्तदोष दिसतो.

शेरा पडतो तो पडू नये, दोन्ही जागा दक्षणा येथास्थित होऊन आज्ञेप्रमाणे सर्व सवा लक्ष रुपयात आटोपले पाहिजे. येविसीचा मार राजश्री शास्त्री यांस समजाऊन सांगितला. त्यास साक्षर ब्राम्हणास सर्वास दक्षणा वाडियांत व्हावे असे करून सवा येकतीसशे ब्राम्हण पहिली नेमणूक जाहाली आहे त्याजखेरीज आणखी हजार ब्राम्हण वाडियांत लेहून दक्षणा द्यावयाची केली आहे. मग बिद्वान ब्राम्हण रमण्यांत जावयाचा विरळा राहील. त्यास येक दरवाजा शास्त्री यांचा व आणखी येक असे दोन दरवाज्यास साक्षर ब्राम्हणानी जावे. तेथे परीक्षा घेऊन तीन च्यार रुपयेपावेतो साक्षरास द्यावे. वरकड दरवाज्यास येक रुपया दोन रुपये. याप्रमाणे शेरा बसऊन सर्वास दक्षणा द्यावी. वाडियांत दक्षणा च्यार हजार ब्राम्हणास होईल. तो ऐवज वजा करून बाकी ऐवज राहील तो रमण्यांत सदरहू शेऱ्याप्रमाणे वाटावा आणि स्वामीनी लिहिल्याप्रमाणे सर्व सवा लक्षांत आटोपावे असे शास्त्री यांचे विचारे जाहाले आहे. छ मारी खिचडीस ब्राम्हण १९९१४ येकूणीस हजार नऊसे चवदा जाले. साल गुदस्ता १९५२९ येकूणीस हजार पाचसे येकोणतीस जाले होते. तीनसे पच्यासी जाजती जाले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Janardan Appaji explains the distribution of Rs. 1,25,000 as Dakshina to the Brahmans at Poona in the month of Shravan.*

No. 85] [*1-8-1775*

पौ छ ४ जाखर
श्रावण मास.

श्री

सेवेसी बाळाजी राम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ३ जाखरपावेतो येथास्थित असे विशेष. वाड्यात दक्षणा द्यावयाची नेमणूक पहिली गेली आहे. त्याहून जाजती ब्राम्हणास दक्षणा वाड्यात देणार ती रमण्यांतच वाड्यांतील प्रतीप्रमाणे द्यावी म्हणजे चांगले दिसेल, याप्रमाणे करावे. साक्षर ब्राम्हणास तिन च्यार रुा दिल्याने ठीक दिसणार नाही. याजकरिता समजून करवणे. दक्षणा देणार व जवळ बसणार याची नावनिसी साल गुाची आहे त्याप्रो नारो आपाजी याचे जागा जनार्दन आपाजी वरकड गुदस्तांप्रो, याप्रो करावे म्हणौन आज्ञा. आज्ञेप्रो राजश्री जनार्दनपंत दादा सुधा राजश्री शास्त्रीबावासी बोलून आज वाड्यात दक्षणा वाटावयाची मना करून येक हजार ब्राह्मण

लिहिलेले राहिले. त्यास उदईक रमण्यांतच दक्षणा नेमल्याप्रो द्यावयाची केली. काही थोर थोर पंडित व काही आश्रित यांची मात्र दक्षणा व्हावयाची आहे. त्यांची हाजिरी वाड्यात घेऊन रमण्यातील ब्राम्हण सुटल्यावर मग यास दक्षणा द्यावी याप्रो केले आहे. रमण्यात याजखेरीज आणखी थोडे बहुत वैदिक येतील त्यास दशग्रंथी यास साहा व पंचग्रंथी यास च्यारपाच व दूरस्थ दोन तीन वरकडास येक कदाचित दोन याप्रो नेमणूक केली आहे. सदरहू येक हजारापौ दोन च्यारसे ब्राम्हणास कोण्हास दाहा पंधरा वीस पंचवीस चालीस याप्रो दक्षणा नेमलेली आहे, त्याप्रो रमण्यात पावेल. वरकडास पधतीप्रो पावेल. दक्षणा वाटणार व जवल बसणार याची नेमणूक आज्ञेप्रो जाहाली. राजश्री भीवराव पानसी यांस लवकर येण्याविसी आज्ञा जाली पाहिजे. आज रमण्यांत खिचर्डीस ब्राम्हण जाहाले त्यांची यादी आलाहिदा पाठविली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना..

¶*Balaji Ram reports that Dakshina will be distributed to Brahmans according to instructions from Purandhar.*

No. 86] *[2-8-1775*

पौ छ ९ जाखर गुरु-
वार प्रात:काल

श्री

शेवेसी बालाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ४ जाखर-पर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष श्रावणमासचे दक्षणेस रमण्यांत प्रारंभ आज वीस घटिका दिवसा नंतर जाहाला. त्यास अस्तमानपर्यंत आा ५५७० पंचावन्नशे सतर आसामीस दक्षणा पांच दरवाजे मिलोन जाहाली. त्याचे शेऱ्याची यादी आलाहिदा पाठविली आहे त्याजवरून निवेदन होईल. याजखेरीज वाडियांत दक्षणेचे आंख पडोन नावनिसीवार नेमणूक जाहाली. देखील वाड्यातील हरकारे व वाई थेऊर चिंचवडचे मिलोन रुा

५३९२७ वाड्यांत दक्षणा वाटिली व वाटावयाची
३५५९४ वाटिली आा २७८६
१८३३३ वाटावयाची पंडित व आश्रित वगैरे आा
५१४
अजमासे रुा

५३९२७ ३३००
7499

१०३३९ वाड्यांत दक्षणा द्यावयाची केली होती ते रमण्यात वाटणी होत
आहे आा ७२३ यो

६४२६६ ४०२३

याप्रो दक्षणा जाहाली व व्हावयाची. याजपुढे रमण्यांतील शेरा होईल तो दोन दोन प्रहराचे अंतराने आज्ञेप्रो लिहून पाठवितो. वो राजश्री शास्त्रीबावा सागतात त्याप्रो चालत आहे. मी सेरा वाढऊ नये येविसी वरचेवर. रात्रंदिवस घडी घडी सांगत राहातो. सेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञापना.

¶*The paper contains a report regarding the distribution of Dakshina.*

No. 87] [*2-8-1775*

श्री

सेवेसी बालाजी राम कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ४ जााखरपावेतो येथास्थित असे विशेष. श्रावणमासची दक्षणादेखील खिचडीचा खुर्दा दोन लाख रुपयांत वाटावी, जाजती करू नये म्हणौन सरकारचे पत्रात राजश्री नारोपंत नानास आज्ञा आहे. येविसी वो राजश्री शास्त्रीबावासहि पूर्वी सांगितले आहे त्याअन्वये येथे जाहाले पाहिजे. त्यास शास्त्रीबावानी वाड्यात दक्षणा कालपावेतो बावन हजार तीनसे येकुणीस रुो वाटले. आजहि दोन तीनसे पावेतो ब्राम्हणास आश्रित सुधा दक्षणा व्हावयाची आहे, ते चालीस लागली आहे. आज वाटणी होते यास अजमासे अठरा वीस हजारपावेतो लागतील. याजवेगल चिंचवड व थेऊर व गंगापूर व वाई व यवतेश्वर व दुखणेकरी मिळोन पंधरा हजारपावेतो पाहिजेत. त्यास रमण्याखेरीज नवद हजार रुपयाचा अजमास होईलसा वाटतो. तेव्हा येक लक्ष दाहा हजार रुा बाकी रमण्यात वाटायास राहिले. त्यास ब्राम्हण अजमासे तीस हजार होतीलसे वाटते. त्यास च्यार रुपयांचा सेरा रमण्यात पाडावा असा बेत घालून दिल्हा आहे. त्यास च्यार रुो सेऱ्याचा बेत धरला आहे. या अजमासे सवा लाख रुा पाहिजेतच. याजवर चहूचा बेत घातला आहे याहून जाजती होईलच. तीन रुपयांचा बेत धरल्यास कदाचित सवा लक्षांत आटोपेल, असे दिसते. त्यास स्वामीची आज्ञा तर दोन लक्षाची, याजकरिता मी राजश्री नारोपंत नानास व शास्त्रीबावास बहुता प्रकारे सांगितले आहे. सेरा त्याणी पहिल्याने घालून दिल्हा होता त्याचा अजमास त्यास समजाविला आणि सेरा उणा करविला. याहूनहि कमीच सेरा धरावा म्हणौन सागत असता त्याची मर्जी की, फार कमी केले, आता उणे करावयाचे

नाही. याच सेन्याने दोन, लक्षांत करू म्हणतात. परंतु पंचवीस जाज़ती लागतीलसे दिसते. सेन्याची यादी आलाहिदा पो आहे. सेवेसि श्रुत होय हे विज्ञापना. मीहि वरचेवर सेरा वाढऊ नये म्हणौन सागतच आहे. हे विज्ञाप्ति.

¶*Balaji Ram gives the estimates of money required for being distributed among the Brahmans as Dakshina in the month of Shravan.*

No. 88] [*Recd. 10-4-1777*

पौ छ १ रोवल सुा
सबा सबैन चैत्र मास.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक राणोजी बलकवडे ताा जयेदुर्ग चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना. ताा छ २७ माहे सफर पावेतो सेवकाचे व जंजिरे मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ ५ मोहरमचे सादर जाहालें ते छ २७ सफरी प्रविष्ट जाहालें. तेथे आज्ञा कीं, ताा उदेरी येथील ब्राह्मण तोतया पतित याचे संसर्गी आवसिष्ट राहिले, त्याचे प्रायेश्चिताची वेवस्था कलमें बितपसील :

साक्षात पंक्तीच्यांस

येकवल पंक्ती जाली त्यासी मुंडणपूर्वक चांद्रायेण १

बारावे पंक्तीपासोन मासपर्येत येकवीस दिवसपावेतो पंक्ती जाल्या असतील त्यास मुंडणपूर्वक दोन च्यांद्रायणे व येक प्राज्यापत्य कलम १

येका मासापुढें दोन च्यांद्रायणे व येक प्राज्यापत्य यावर आधिक प्रतिमासी येक येक प्राज्यापत्य याप्रोआठ महिने ज्यांसी पक्ती जाली असेल त्यास तीन च्यांद्रायणे मुंडणपूर्वक कलम १

बहुत वेला, दुसरे पंक्तीपासून ज्यास पंक्ती जाल्या असतील त्यास मुंडणपूर्वक च्यांद्रायेण व दर पंक्तीस येक येक प्राज्यापत्य आधिक याप्रों नवे पंक्तीस दुसरे चांद्रायेण येकूण दोन चांद्रायणे कलम १

कलमे ४

7501

श्राधाच्या ब्राम्हणास

क्षणपूर्वक पिंडश्राधी जेवले त्यास मुंडणपूर्वक तीन च्यांद्रायण पूर्वांग-उतरांगसहित. कलम १

अभिश्रवण करून इष्टपंक्तीस जेविले त्यास मुंडणपूर्वक येक च्यांद्रायेण व तीन प्राज्यापत्ये. कलम १

ब्रम्हार्पण श्राधी क्षण घेऊन जेविले त्यास मुंडणपूर्वक पूर्वांग उतरांगसहित दोन च्यांद्रायण. कलम १

अभिश्रवण मात्र केले इष्ट पंक्तीस जेविले नाहीत त्यास मुंडणपूर्वक तीन प्राज्यापत्यें. कलम १

कलमें च्यार सदहूप्रो येक वेल घडलें असेल त्यास. याप्रों दरपंक्तीस करावें
कलम १

श्रावणी ज्याणी केलीं त्यास

आच्यर्यत्व ज्याणी केलें त्यास हुजूर पाठवणें. आज्ञा करणें ते केली जाईल. कलम १

समागमे ज्याणी श्रावणी केली असेल त्यास मुंडणपूर्वक अर्धच्यांद्रायण येकूण प्राज्यापत्ये च्यार. कलम १

कलमे
२

सदरहूचे प्रायेश्चिताची वेवेस्ता प्राज्यापत्यें प्रत्यम्नाये

सुवर्ण प्रत्यम्नाये रुा
९० उतमपक्ष मासे ४०
२९ मध्यमपक्ष मासे २०
१२॥ कनिष्टपक्ष मासे १०

रजेत प्रत्यम्नाये रुा
४ उतमपक्ष मासे ४०
२ मध्यमपक्ष मासे २०
१ कनिष्टपक्ष मासे १०

तीर्थ प्रत्यम्नाये तीर्थयात्रायोजन येक येकूण मासे च्यार. कलम १

जप प्रत्यम्नाये गायत्री जप दाहा सहस्त्र. कलम १

येणेप्रों प्रत्यम्नाये च्यार प्रकारचे शक्तीनसार योजावे. आठ प्राज्यापत्ये म्हणजे येक च्याद्रायण होते. प्राज्यापत्य प्रायेश्चितास ब्राम्हणभोजन तिहींहून उणें नसावें. तरी सदरहूप्रो प्रायेच्चित देवणे म्हणौन आज्ञा. ऐसीयासी ता।

मजकूरचे ब्राम्हणास ताकीद करून जंजिरे मजकुरीचे ब्राम्हणास ताकीद करून जंजिरे मजकुरीं आणिविले आहेत. चौकसी करून प्रायश्चित द्यावयायोग्य ज्यापासून कर्म घडले असेल त्यांस आज्ञेप्रो प्रायेश्चित देवितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is an order prescribing the various forms of penance to Brahmans who contaminated themselves by dining and living with the Pretender.*

No. 89] *[0-6-1786*

यादी श्रावण मासची दक्षणा रमण्यात देणार व जवल बसणार सुा सबा समानीन मया व अलफ

दरवाजा पहिला

दक्षणा देणार	जवल बसणार
१ बालाजी जनार्दन	१ भिकजोसी पंचनदीकर
१ बापूभट सिंत्रे	१ त्रिमंगळाच्यार्य
१ भास्कर दीक्षित कर्वे उपाध्ये	१ नीलकंठ जोसी व्येव्हारे
१ कासिनाथ शास्त्री	१ माहादेव दीक्षित आबटे
	१ बापू पाठक

दरवाजा दुसरा

दक्षणा देणार	जवल बसणार
१ रामशास्त्री	१ रामचंद्र दिक्षित वोक
१ माहादेवशास्त्री	१ विद्याधर जोसी
१ सदासिव दीक्षित कर्वे उपाध्ये	१ सदासिवभट नानल
१ जगनाथभट ढेकणे	१ वासुदेव जोसी चिपलोणकर
	१ हरिदीक्षित दात्ये
	१ चतुर्भुज देव
	१ गंगाधर दीक्षित गडबोले

दरवाजा तिसरा

दक्षणा देणार	जवल बसणार
१ आमृतराव विश्वनाथ	१ कृष्ण दीक्षित रानडे
१ सदासिव दीक्षित दात्ये	१ बाबूभट लेले
१ जयवंतराव येशवंत पानसी	१ बाजी जोसी श्रीवरधनकर

१ बालंभट कर्वे उपाध्ये
१ बालजोसी मालगुंडकर

१ चिंतामण शास्त्री काणे
१ गंगाधरभट विंध्वंस
१ रामजोसी रोडे
१ बापू जोसी चापेकर

दरवाजा चौथा

दक्षणा देणार

१ दाजीबा फडके
१ लक्ष्मणराव रास्ते
१ सदासीवभट सित्रे
१ बालंभट थथे
—
४

जवल बसणार

१ त्रिंबकशास्त्री
१ रामभट निजसुरे
१ रघुनाथ जोसी सातारकर
१ विनायेक दीक्षित गुढगेकर
१ ————————
—

¶*The names of persons and parties who distributed Dakshina to Brahmans at the several entrances of the enclosure are given in this paper.*

No. 90] [*18-10-1788*

पौ छ २६ मोहरम सुा
समान

श्री

सेवेसी आपाजी राम सहस्त्रबुध्ये कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तां छ १७ मोहरमपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी राजश्री केसोपंत व गोविंदपंत याचे पत्री फर्कोबादेचे जासुदाविसाचा मजकूर व जबानीची नकल पाठविली. याचे उतर कचे वर्तमान राजश्री गोविदपंत याणी लिा आहे. पुण्यांत जबानी लिहून दिल्हे तैसे येथे काहीच जाहाले नाहीं व त्याचेबो माणसे व पत्रहि मागहून कोणाचे नवते. वरकड श्रीमंतांची स्वारी कुंभारीस व कचेश्वरी देवदर्शनास जात येत आहेत. छ १९ रोजी कोपरगावचे बागेत उभयता श्रीमंत वगैरे मंडली झाडून आवलीभोज्यनास गेले. तेथे येक संन्याशाचे सोंगाने आंगातून भोज्यनास आला. समय पाहून भोजनास घेतला तो त्याचे चिन्न काही ब्राम्हणाचे नवे. सोंगसे दिसोन आले. मग समय भोज्यनाचा याजकरिता पंगतीभेद करून पात्र ठेविले. भोज्यनास बसला तो चित्रावली घातल्या नाही. त्याजवरून पुसो लागलो तो मौन्य जाहला. काही बोलेना. मग भोज्यनोतर बाा माणूस देऊन घेऊन आलो. चौकसीकरिता

कानास चाप लाविले व जेरबंद मारिले. तो कबूल जाहला की, मी कोष्टी मौजे लासणगांव पो चांदवड येथील पोटाकारिता सोंग केले. त्याजवरून त्यास बिडी घालून ठेविला आहे. व श्रीमंतसुधां झाडून मंडली संसर्ग दोश जाहला म्हणून येक दिवस उपोशण करून छ १७ रोजी प्रात:काली पंचगव्य घेऊन भोजन केले. हाली त्याची चौकसी करावयाकरिता मौजे लासणगावी माणसे पाठविली आहेत. नंतर काय चौकसीने ठरेल ते स्वामीस लिहून पाठवीन. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram Sahasrabudhe reports how a man, weaver by caste, got entrance into Bajirao's residence and dined with him and his brother saying that he was a Brahman. He was subsequently punished for this.*

No. 91] *[13-4-1795*

श्री

आपल्य हरीचे सिर सा नमस्कार विज्ञापना. तागाईत चैत्र वा ९ सोमवार पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. आक्षेत्रितीयेच्या उदकुंभाची याद लस्करांत आहे. श्राधाचा दाखला नाही तो लिहून पा म्हणोन लिा. त्यास सन तिसैनापासून सन आर्बा तिसैनपावेतो शोध केला; परंतु आक्षेत्रितीयनिमित्य श्राधखर्च ऐसा दाखला निघाला नाही. वैशाख मासच्या कीर्दी एक दोन सालाच्या पाहिल्या व श्राधाखर्चाचा * * व धर्मोदायाचा व मोघम खासगत खर्चाचे आवर्जे पाहिले; परंतु दाखला कोणत्याहि सालात निघाला नाही. उदकुंभाचे दाखल्याची याद पेशजी पाठविली. आक्षत्रितीयेनिमित्य खर्चास नख्त व वस्त्रें मानकरी व सिलेदार व सुभे लस्कर व स्वारिया सरकारकून यास काय पावत असेल ते लेहून पा म्हणोन लिा, त्यास श्रीरंगपटण स्वाऱ्याच्या दोन यादी पेशजी पा आहेत त्याखेरीज काही राहिले नाही; व मुकामीची साले सन इसने व सलास व आर्बा तिसैंन तीन सालात पाहिले, परंतु पावल्याचा दाखला नाही.

¶*The writer says he is unable to trace the list of previous expenses incurred for the anniversary rites of the Akshatritiya day.*

No. 92] *[15-9-1795*

श्री

यादी आनंदराव गोपाल जोसी याचे वाड्यांत बाजीराव मोरेश्वर भावे कुटुंबसुध्धा राहतात. त्यास बाजीराव मोरेश्वर याची कुणबीन होती ती जातीची चांभारीण

समजली. न समजता पूर्वी चार महिने संसर्ग तिचा घडला. सा प्रायश्चित्त मारनिलेस व त्याचे घरी बिन्हाडास राहातात त्यास. सुरू सीत तिसैन छ १ रबिलोवल. प्राज्यापत्ये.

४८ ब्राह्मणास दर आा
२४ स्त्रियास दर आा
२४ लाहान मुले उपनीत सोळा वर्षापूर्वी असतील त्यास दर आा
४ शूद्रास दर आा

नरहर गोपाळ यास मध्ये भीत आहे. परंतु येक कूप; जलादि संसर्ग घडला सा त्यांस व त्याचे विभागांत राहातात यास आनंदराव गोपाळ यास सांगितले आहे तदर्थ लिहिले अन्वये करावे.

पंधरा दिवसाचे आत संसर्ग ज्यास घडला असेल त्यास संसर्गानिरूप योजून द्यावे.

¶*This paper mentions punishments assigned to the members of the family of Bajirao Moreshwar for having entertained in service a maid servant of the shoe-maker's caste.*

No. 93] [*0-7-1797*

श्री

यादी दक्षणा श्रावण मास
रमण्यात सुा समान तिसैन

सन सलास खमसैन, रमण्यात दक्षणा जाहाली नाही. शहरांत खबूतरखान्यांत व विष्णु विश्वनाथ व हरि दामोदर व बाबूराव देवस्थले याचेवाड्यात वाटली.

सन खमस खमसैन

१ दरवाजा पूर्वेकडील विा राजश्री नाना
१ विा राजश्री भाऊ

सन आर्बा खमसैन

१ दरवाजा पूर्वेकडील वोढ्याजवळील विा राजश्री नाना
१ दरवाजा पूर्वेकडील मधील विा राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ
१ दरवाजा पूर्वेकडील देवसंनिधचा विा राजश्री माधवराव
१ दरवाजा पश्चमेकडील विा राजश्री भाऊ

१ विा राजश्री विश्वासराव
१ विा राजश्री माधवराव
१ विा राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ

५

सन सीत सितैन

१ दरवाजा उतरेकडील विा राजश्री राव

१ दरवाजा पूर्वेकडील विा राजश्री दादा

२ दरवाजे दक्षणेकडील

१ विा राजश्री रामचद्र गणेश व कृष्णराव बलाल

१ विा राजश्री माधवराव विश्वनाथ व चिंतो अनंत

२

४

१ दरवाजा पश्चमेकडी(ल) विा राजश्री भाऊ

१ दरवाजा पश्चमेकडील विा विश्वासराव

५

सन सीत खमसैन

१ विा राजश्री नाना
१ विा राजश्री भाऊ
१ विा राजश्री दादा
१ विा राजश्री विश्वासराव
१ विा राजश्री माधवरात्र

¶*The paper gives the names of persons who distributed Dakshina at the several entrances, in previous years, near the Parvati hill, in the month of Shravan.*

No. 94] *[16-9-1803*

श्रीगजानन

॥ श्री जगदंबा प्रसन्न ॥ गौब्राह्मणप्रतिपाळक ॥
॥ श्रीमंत बाबासाहेब मुख्य प्रधान ॥ ॥
॥ शुभचिंतक बाळ जोसी ममदापुरकर वेदो ॥
॥ क्त आसिर्वाद विनंति विज्ञापना प्रश्नोत्तर ॥
॥ येशवंतराय होळकर याचे दिवस पूर्वाप्रमा ॥
॥ णे नाहित आवधि आश्विन वद्य १४ पासून ॥
॥ आज्ञेप्रमाणे चालतिल मार्गशीर्ष शुद्ध ७ ॥
॥ परियंत श्रीमंत जे आज्ञा करतिल त्याप्रमा ॥

7507

॥ णे चालेल श्रीमंत कृपाळू होउन आज्ञा क ॥
॥ रतिल ते मान्य करिल आमृतराव हास्त ॥
॥ गत मार्गशीष वद्य १३ परीयंत होईल पुढे ॥
॥ होळकरास मोहिम सागतिल त्याप्रमाणे जा ॥
॥ उन स्वामीचे आज्ञेप्रमाणे कार्यसिध्धि करून ॥
॥ जिकडे माहाराज रवणा करतिल तिकडे जा ॥
॥ यिल यास आवधि पौष वद्य ५ व माघ शुध्ध ७ ॥
॥ पासून भोसले होळकर व सिंदे श्रीमंताचे ॥
॥ आज्ञेप्रमाणे वर्तुन इंग्रेजाचे पाराभव मा ॥
॥ घ वद्य ९ पासून चैत्र वद्य १३ परीयंत इंग्रेजाचा ॥
॥ पराभव होऊन ते आपल्या देशास जाति ॥
॥ ल निर्वेध गौब्राह्मणप्रजापाळंन स्वाम क ॥
॥ रतिल येणेप्रमाणे मानोदय सिध्धिस श्रीज ॥
॥ गदंबा नेईल श्रीमंतानि राजदर्शन साता ॥
॥ रयास जाऊन घ्यावे मित्ति आश्विन शुध्ध १ ॥
॥ शके १७२५ हा वेदोक्त आशिर्वाद ॥

¶*This is an astrological forecast regarding the political situation given by one Bal Joshi of Mamadapur. He refers to the plans of the Peshwa, the Holkar, and the English and predicts the triumph of the former over the other two. The result, as we know now, was quite the contrary to what was predicted. Bajirao apparently relied more on the help of the stars than on his own efforts in retrieving his fallen fortune.*

No. 95] [*About 1790*?

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

मुकुंद मानभाव विनंती उपरी. आपला गुरु होता तो मृत्य पावला. त्याचे आपण दोन च्यार सिश होतो. तेव्हा चौघानी करार केला की, चौघामध्ये येकास पट देऊन गुरूचे स्थानी बैसवावे. तेव्हा चौघाचे मते गुरुस्थानी चक्रपाणी यासी बैसविले. परंतु गुरूची देवपूजा आहे ती चक्रपाणी मानभाव यास देत नाहीत. आमचे मार्गाचे लोकानी सांगितले परंतु मानीत नाही. तरी

कृपालु होऊन कृष्णोबा व गोंदोबा मान(भाव) यासी ताकीदपत्र द्यावे की, देवपूजा चक्रप्राणी मानभाव याचे स्वाधीन करणे. म्हणून पत्र द्यावे.

¶*Nana Fadnis is requested to issue orders that the idols and the necessary implements be restored to one Chakrapani Manabhav who had succeeded to his Guru's seat.*

No. 96] [*1741-61 ?*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
भाऊ स्वामी गोसावी यासी

आश्रित गोपीनाथ दीक्षित आनेक आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखणआज्ञा केली पाहिजे विशेष. आपली आज्ञा घेऊन आलो ते सुक्रवारी वाईस दाखल जाहालो, तो येथे अधान पूर्वांग प्रयाह जाहाले होतें. आपण अलियावर प्राधान सिध करून रविवारी अधान सिध करविली. पुढे आन्वारंभणीया व दर्शपूर्णमास होत तोंपर्यंत वेदमूर्ति राजश्री कृष्णंभटानी राहून घेतले. श्रोती कितीयेक ग्रंथ वाचून घ्यावयासी प्रारंभ केला आहे. याची आस्था व भक्ति पाहून राहिलो. आधान आपल्या कृपेने उतम प्रकारे जाहाले. आपणास कलावे म्हणून लिहिले आसे. पूर्वी गवडे सरकारचे रवाना केले त्याबरोबर आपणास आसीर्वादपत्र पाा होते, ते आणास पावलचे आसेल. सूज्ञे अलमतिपल्लवितेनेत्याशी :

¶*Gopinath Dikshit writes to Bhausaheb about the performance of certain rites.*

No. 97] [*1778*

राजमंडळ सुा। समान सबैन

नवस खर्च ज्ञा ताा पौ रुपये

२

ज्ञडती तसलमात पौ

ताा जनार्दन गोपाल कारकुन सिलेदार पौ मारनिले याणी हरि बलाल याचे लस्करात कापड जलदीने जाऊन पोहोचावे म्हणून देवास नवस चोटेन केला होता त्यास नख्त रुा

२

¶*This refers to the fulfilment of a vow made to some deity for the safe arrival of clothes at Haripant Phadke's Camp.*

No. 98] [Before 1729 ?

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित
प्रधान गोसावी यासीं

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री कान्होजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन केले पाहिजे. यानंतर आपण पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन सविस्तर कलों आले. वेदमूर्ति राजश्री कासी उपाध्ये व संगमेश्वरकर जोसी याचा कजिया आहे, याकरिता उपाध्यास पाठऊन दिल्हे पाहिजेत म्हणोन लिहिलें. यैशास उपाध्याचे मुखे च्यातुर्मास पुराणश्रवण होत असतें. पुराणश्रवण च्यातुर्मास जाहाल्यावरी पाठऊन देऊन. जाणिजे रा। छ २९ जिल्काद. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa ordered into his presence Kasi Upadhya to give evidence in a dispute between him and the Joshis. He is informed by Kanhoji Angria that the priest has been engaged for expounding the holy scriptures during the four monsoon months and may not leave his place till then.*

No. 99] [1740-61

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

पोष्य अंताजी नारायेण+ साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता। छ २९ रमजानपावेतो येथास्थित असे विशेष. मौजे करंदी ता। चाकण या गावी श्रीभगवतीचे देऊळ बहुता दिवसाचे आहे. ते जमिनीत गडदले आहे. ते रा। नारोजी कडू उघडणार. तरी तुम्ही दोघे प्यादे रखवालीस देणे म्हणोन आंज्ञा. आज्ञेप्रमाणे दोन प्यादे मौजे मजकुरी पाठविले होते. त्याणी देउलाचा पाया खणला, परतु तेथे काही नाही. नारोजी कडूचे पत्र आले तेच सेवेसी पाठविले आहे, त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Antaji Narayan writing to the Peshwa reports about fruitless exploration of the relics of a building which, it was alleged, contained an idol of a goddess.*

+ फडणीस; सदाशिवराव भाऊचा सासरा.

7510

No. 100] [1720-40 ?

श्री

श्रीमदतुलधिषणवैभवोपार्जित
साम्राज्यलक्षण लक्ष्मीरक्षण दंडि-
तोदंडदोर्दंड गोब्राह्मणप्रतिपालक

श्री बाजीराव बल्लाळ प्रधान पंत याप्रति आश्रित मुकुंदभट्ट तथा ज्योतीभट्ट माहवलीकर याचे अनेक त्रिकाल वेदोक्त आशीर्वाद उपरी: तुमचा निरोप आला होता की श्रीहनुमंतास अक्रा उपोषणे करा. यास नव उपोषणे झाली. यास देवापाशी प्रार्थना करून प्रसाद मागितला. त्यास कार्यसिद्धि करितो म्हणून उत्तम मस्तकीचा प्रसाद दिल्हा. या देवाजवळ अति हटनिग्रह कार्यास येत नाही. नाना प्रकारीचे भय दाखवितो आहे. यास दाहा ब्राह्मण मिळोन प्रार्थना केली. त्यास दृष्टांत जाहाला की उपोषण करून शेवा करू नका. आपली मनकामना जे असेल ती पूर्ण करितो. अशास तुमची आज्ञा जाप्रमाणे होईल त्याप्रमाणे वर्तणूक करू. त्यास दाहा, दाहा प्रकारीचा गोष्टी सांगतील ते आपण चितावर न घेणे. या देवाजवळ आपला भावार्थ असो देणे. कार्यसिद्धी जाहाली असाच निश्चय असो देणे. देवाची पूजासामग्री पाठऊन देणे. केशर, कस्तुरी, मोगरेल, अतार, बुका, कापूर, उदकाड्या, इतकी सामग्री पाठऊन देणे. यास बापोजी मोरा खासबारदार, सांगता कळो येईल. या पत्राचे प्रतिउत्तर सत्वर पाठवणे. सूज्ञाप्रति बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.

¶*Mukund Bhat of Mahuli requests Bajirao to send articles for the worship of Hanumant who had been pressed for granting Bajirao's desires and who had assured him success.*

No. 101] [1740-61 ?

श्रीरामचंद्र प्रसन्न

श्रीमंत हरिभक्त परायेण राजमान्य
राजश्री भाऊ गोसावी यांसी

प्रति खंडोबा गोसावी वो देहू. अनेक असीर्वाद उपरी. येथील क्षेम जाणोन आपलें स्वस्तिक्षेम लिहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. श्री-तुकोबादेव याचा उच्छाव फाल्गुन वद्य पंच्यमी आहे. त्यांसी वरसास गावकरी वेट बेगारीस येऊन साहित्य करीत होते. आणि यंदा आपण गाव तकूब केलें. याजकरितां कामाकाजांस कोण्हीं येत नाही. बरें; आम्हांस मोहछावाची निकड

येऊन लागली आहे. त्यांसी पूर्वापार तुमचे वडील साहित्य करीत आले . आहेत. आणि तुम्हीहि सांभाल करीतच आहा. परंतु येदांच मोहत्छावाचे साहित्य तुम्ही केले पाहिजे. मोहत्छाव जाला म्हणजें भेटीस येऊ. भेटीनंतर सर्व वर्तमान विदित होईल. सुज्ञाप्रति फार काय लिहिणे ? गावकरियांसी मोहत्छावचें साहित्याविसी ताकीदपत्रें अगत्यरूप पाठऊन दिली पाहिजेत. आणि आपणहि कांही साहित्य करणे. ज्याप्रमान श्रीमंत कैलासवासी आपा सांभाळ करीत गेले त्याचप्रमान आपनहि कराल. बहुत काये लिहिणे हा आशीर्वाद.

¶*Khandoba Gosavi asks for the Peshwa's help for the annual festivities in honour of Tukarambuwa, the writer's grandfather.*

No. 102] [*About 1755.*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामी यां

प्रति शुभचिंतक बलकर्णगीर गोसावी अर्सार्वचन विज्ञापना. येथील क्षेम ता। जेस्ट वद्य १२ मुकाम सिरोंज. आपल्या कृपावलोकने येथास्थित असे विशेष. महंत श्री ज्वालागीरबावा यांची आपले आज्ञेनरूप रा। लक्ष्मण शंकर यानी सेवा केली. त्यास त्यांचा का(ल) जाल्या * * * * * * आपल्या गुरूस समागमे घेऊन श्री स वास्तव करावयासी गेले. नवाब मनसूरअलीखा वजीर यांसी बलवडसिंग राजे कासीकर यांचे विद्यमाने देवघेव जाला. त्यास दैवयोगे वैशाख वद्ये येकादसीस श्रीमधे महंत समात जाले. आम्ही ये प्रांते सिरोजे होतो. काही शिष्यसमुदाय बावासमागमे कासीत होता. तेथील गुंता नवाब वजीर याचा पुत्र सुज्यायेतदौला यांजकडे आहे व राजे बलवंडसिह यांजकडेहि आहे. तो उगऊन घेतला पाहिजे व श्री मध्ये बावा समात जाले, त्यास त्यांचा भडारा करावा लागतो. यास्तव येथून समुदायानसी कासीस जावयाचा उदेश आहे. हे सिध्धीस पावणे ते आपल्या कृपेने पावल. महंतावर सर्व प्रकारे माहाराज पंत प्रधान स्वामीची व आपली कृपा होती म्हणून चालत होते. त्यामागे हा वेव्हार चालणे पूर्व(व)त प्रा। कृपा होईल तेव्हा चालेल. आपल्याविना आम्हास दुसरे नाही. येविषई माहाराज राजश्री पंत प्रधान स्वामीस विनंती पत्र लिहिले आहे. साहित्यपत्रे नवाब सुज्यायेतदौला व राजे बलवंडसिंग यासी पाठवावयाविषई अज्ञा करावी कीं, ज्वालागीर गोसावी याचा वेवसाये तुम्हांकडे असल तो व याची वस्तभाव कासीत असल ते यांचे

शिष्य बालकर्णगीर गोसावी कासीत आले आहेत यांच्या स्वाधीन करणे. याप्रा पत्रे सादर जालिया तेथील कार्यभाग संपादून असीर्वचन द्यावयासी दर्शनास येतो. तदनंतर मठाच्या * * * * * * स्थली होईल त्या स्थली वास्तव करून असीर्वचन देऊ. आसीरवचन वचने * *

¶*Balakarna Gir Gosavi writes to Bhausaheb requesting the addressee to restore him his Guru's belongings at Benares.*

No. 103] [*December 1746*

सुा सबा आर्बैन

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च खाो मुा

नवस खर्च

परभारे रत्नशालेपैकी

छ १९ जिल्हेज श्रीगणपति रांजणगांव विा सौ गोपिकाबाई याच्या डोल्यास पीडा जाहाली सबब द्रिष्टीचा नवस केला. रा बचाजी विश्वनाथ ताा रामाजी विश्वनाथ बरवे सोन मासे ८=

छ १८ जिल्हेज श्रीदेव जेजुरी सौ उमाबाई रा रामाजी विश्वनाथ सोन तोले

८= द्रिष्टी

१॥ पालणा व बेया (?)

१ पालणा रा रामाजी विश्वनाथ

॥ बेया रा चितो विश्वनाथ

१॥=

रु

तेरीज येकंदर परभारे पौ सोने

वजन तोले तोले

१॥।१

¶*The fulfilment of a vow for curing the eyesore of Gopikabai is narrated in this extract of the Peshwa's accounts.*

Bk Ca 22—12 7513

No. 104] [*20-12-1749*

सुा खमसेन

राजमंडळ

स्वारी राजश्री पंत प्रधान
खर्च खाा मुाा नवस खर्च

रत्नशाळापैकी

छ २० मोहरम छ ९ रोजी चिरंजीव राजश्री बिश्वासराव व राजश्री माधवराव यांसी देवी आल्या. त्यास रसानगी व ताा बाळ पलांडा घडीत गुाा खंडोजी जड्या प्रतिमा देवीच्या २ येकून सोने वजन तोले २॥

¶*Two small gold images of a deity of the epidemic are given as gifts for the cure of small-pox from which Vishvasrao and Madhavrao were suffering.*

No. 105]

मध्वनाथस्वामी

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजेश्री दादासाहेब
स्वामीराजाचे सेवेसी

विनंती आज्ञांकित बापूजी आनंत मुकाम शहर आवरंगाबाद. सिरसांा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर श्रीहरिभक्त परायेणे माहराज श्री याचा उछाव कसबे सेंदूरवादे येथे मार्गशीर्ष पौर्णमेचा होत आसतो. स्वामीचे हातचे देव स्थापित आहे. तेथेंहि तिथिप्राा उछाव होत आहे. आता स्वामीचे नातू वेदशास्त्र वेदोक्त राजश्री त्र्यबकाच्यार्ये आहेत. त्याचे हाते उछाव शतशिष राजश्री आमृतरायजी करवितात. त्यास स्वामीचे देव जासुदपुरियात श्रीमाहादेव आहेत. तेथील तपसलि रायजीनी लिहिले आहे त्याजप्रााच आहे. त्यास माहाराज श्रीशंकर उपासक आहेत हे पूर्ण जाणून रायजीनी राजश्री त्र्यंबकराव पाठविले आहेत. त्यास याचा हेत परिपूर्ण करून दाहा ब्राह्मणाचे अन्न करून दिल्हे पाहिजे. देणार धणी समर्थ आहेत. श्रीनाथजीकरिता राजश्री विठल सुंदर याणी पाणी तीन कोसावरून नळ बांधून आणून दिल्हा आहे. त्यास या स्थली माहाराजानी दाहा ब्राह्मणाचे अन्न करून दिल्हीयाणे थोर कीर्त आणि सःतपात्री

जाणून ब्राह्मणास हर्ष करनार धणी समर्थ आहेत. सर्व मजकूर राजश्री रायेजीनी लिहिले आहे त्याजवरून विदित होये. सेवेसी श्रुत्य होये हे विज्ञाप्ति.

¶*Bapuji Anant flatters the religious sense of Dadasaheb and requests him to grant an allowance sufficient to feed ten Brahmins at the Shiva's temple at Shendurvade.*

No. 106] [*11-10-1741*

राजमंडळ

सुा इसने आर्बैन

स्वारी राजश्री पंत प्रधान

खर्च खो मुशाहिरा

नवस खर्च

पोतापैकी रुपये

माहे राखर

२ छ १४ रोज श्रीमार्तंड जेजुरी विा मातुश्रीबाई पादुका २ येकूण रुपे रुपये भार २ यो रुपये भारभार

माहे रबिलोवल

२॥ छ ४ रोज राजश्री रघुनाथपंतास व जनार्दनपंतास देवी आल्या आहेत सबब नवस सेखसला मलिदा विा मातु(श्री) कासीबाई

३ छ १६ रोज सैद सादत पीर कसबे पुणे राजश्री सदासिवपंतास देवी आल्या होत्या ते समई कंदोरी नवसिली होती ती केली सबब

१ नजर पिरास

२ खुर्दा फकिरास वाटावयास

९॥

माहे सफर

१ छ २९ रोज श्री देव कुरकुंब राजश्री सदासिवपंतास देवी आल्या होत्या सबब विा भिऊबाई नेत्र २ येकून नख्त बाा खाजी रेखोजी जासूद जथे लिंगाजी नाईक

माहे साबान

३३६ छ ११ रोज देणे श्रीवेंकटेश राजश्री सदासिवपंतानिमित्य सोन्याचा पालणा करून यैसा नवस केला होता तो सोन्याचा पालणा केला. सोने वजन तोळे २४ दर १४ पालणा मातुश्रीबाईनी समागमे नेला.

तेरीज येकंदर रुपये

३३६	माहे साबान
२	राखर
१	सफर
५॥	रोवल
३४४॥	

¶*This paper gives the expenses incurred in fulfilling the vows to certain deities including Pirs for allaying the effects of small-pox of Raghunathrao, Janardanpant and Sadashivrao Bhau.*

No. 107] [*About 1786?*

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त
ब्राम्हण क्षेत्र श्रीत्र्यंबकेश्वर यांसी

प्रति रामशास्त्री नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. नरहरि रनालकर ब्राम्हण भ्रष्ट होऊन यवनमय जाला. त्यास प्रायश्चित्ताचा आधिकार नाही असे असतां शामाचार्यप्रभृति काहीं ब्राम्हण पैठणकर यानी प्रायश्चित्त देऊन पंगतीव्यवहार केला. ते गोष्ट यथास्थित न जाली. यास्तव नरहरीचा चुलतभाऊ नारो येशवंत याजकडून त्याचा घटस्फोट करऊन प्रायश्चित्तार्थ श्रीत्र्यंबकेश्वरच्या दाहा कोसाच्या एकसे येकवीस प्रदक्षणा नेमून क्षेत्रास पाठविला आहे. याने तेथे नित्य गंगास्नान करून श्रीच्या प्रदक्षणा कराव्या याप्रो करऊन प्रदक्षणा जाल्यावर पत्र देऊन पाठवावा.

¶*Penance is prescribed by Ramashastri to one Naro Yeshwant for having dined with his cousin who was reconverted to Hinduism without religious sanction. The penance prescribed for the man was to go round the temple of Tryambakeshwar a hundred and twenty-one times, each trip being a distance of 20 miles.*

No. 108]

श्री

विनंती उपरी. जंगम रुद्राचे आवर्तन करीत होता तो आपणाकडे पा. त्याचे पारपत्य केले असेल अगर करावयाचे ते होईल. वाणी, ज्याणे अभिषेकपात्र धरिले होते, तो ते समई पलाला; सापडला नाही. शोध केला तेव्हा आज तीन

रोज जाहाले तो सापडला. त्याची चौकसी मनास आणिता, जंगम कशाची पूजा सांगतो हे मला ठाऊक नाही. पूजा देवाची मला सांग इतके बोलिलो. इतकियात ब्राम्हण त्या मार्गे आले त्याणी आईकून जंगमास धरून नेला. वरकड ब्राम्हणाचे कर्म करवितो हे काही आपणास ठऊक नाही. रुद्राभिषेक हे आपणास ठाऊक नाही. त्यास वाणी अटकाऊन ठेविला तो आजारी आहे. याजकडे अन्याये विशेष दिसत नाही. वाणीयास हगवण लागली, मरतो. त्यास जावयास निरोप द्यावा की कसे? वाणी तर म्हणतो की, पूजा मात्र सांगतो म्हणून बोलिला. त्यास हा काये सांगतो हे काही मला कळले नाही असे वाणी म्हणतो. आपण शास्त्रीबावास विनंती करून उतर पाठवावे. उतर आलियानंतर वाणीं सोडून देऊ. गरिब केवल नामुराद+ आहे. हे विनंती उपरीः वाणी बाहेरील आहे. गात्रचाहि नव्हे. घरदार पुणियात नाही. खेपकरी. हगवणहि लागली आहे. येविसीचे उतर आले पाहिजे हे विनंती.

साधेल ती गुन्हेगारी घेऊन जंगम मजकुरास सोडून द्यावा. याप्रमाणे सदरहू चिठीचे उतर बावाचे नावे दिल्हे.

¶*A Jangam and a Bania were caught in the act of performing Rudra Abhisheka for which they were not eligible by their caste. Order is sought in this paper for releasing the Bania who, inquiries showed, was comparatively innocent and suffered terribly from dysentery.*

No. 109] [*1740-61 ?*

छ ४ सवाल.

जाबसुद,

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना ताा

राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. श्रीत्रिंबकेस्वर व श्रीहरिहेस्वर व श्रीमोरेस्वर व श्रीजेजुरी येथें हुजराती अनुष्टाने चालत आल्याप्रमाणे येथून पुढे आणीक वरीसभर चालवावयाची राजश्री स्वामीनी आज्ञा केली. यैशास श्रीत्रिंबक व जेजुरी व मोरेस्वर या तिन्ही स्थलीं येथून ब्राह्मण जातात, तसे जातील. परंतु श्री हरिहरेस्वरीं स्वामीकडून जातात तसे जाऊन वरीसभर येथून पुढे अनुष्टान चालवावें. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*The Peshwa is requested to send Brahmans to Harihareshwar for certain rites being performed at the shrine of that place.*

+ निरिच्छ; मुराद=इच्छा.

7517

No. 110]

॥श्री॥

शास्त्रार्थ लक्ष्मणभट्ट बावल्याने जंगमास रुद्राध्यापन केले. यास दंड, अध्यापनप्रयुक्त जें द्रव्य मिळविले असेल त्याचा त्याग करवून तितकाच राजदंड घ्यावा. त्यास विशेष प्रायश्चित्त वर्षपर्यंत यवोदन भोजनपूर्वक ब्रह्मचर्यव्रत उक्त आहे. ते तर त्यास घडनार नाही. त्याचा प्रत्याम्नाय नवति ९० गोदान कल्पावीं. आनखी हे उपपातक होय. तत्प्रयुक्त उपपातक सामान्य प्रायश्चित्त समुच्चयहि एक चांद्रायण पाहिजे. त्याचा प्रात्याम्नाय आठ गोदाने कल्पून एकून अष्टाधिक नव * * * ९८ गोदाने होतेत. तेणेकरूण शुद्धि होईल हे लिहिले. परंतु यांत कर्त्याची शक्ती पाहून न्यूनाधिक कल्पना आपण केली पाहिजे. अनखि जो जंगम रुद्राध्ययन करीत होता त्यास दंड.

द्यूतं समाहुयं चैव यः कुर्यात् कारयीत वा ।
सर्वांस्तान् घातयेद्राजा शूद्रांश्च द्विजलिंगिनः ॥

हे मनुवचन याची व्याख्या द्विजलिंग उपवीत वेदपाठादि ।

हे पाहता वधच उक्त आहे. परंतु वधतुल्य सर्वस्व हरणादिक विटंबना दंडचिह्न काही करावे ऐसे भासतें हे विनंति ॥

कर्तास द्रव्यशक्ती नसेल तरि प्रायश्चिताचे पूर्वांगेंकरुण श्रीगोदावरी यात्रेस जाऊन श्रीब्रह्मगिरीस तीस ३० प्रदक्षिणा व श्रीहर्षाचा दोन प्रदक्षिणा करूण उत्तरांगे करावी हे अष्टनवति गोदानाचा प्रत्याम्नाय लिहिला असे हे विनंती.[१]

¶*This is a decision of a case in which a Brahman was charged with giving lessons in Rudra to a person of the Jangam sect.*

No. 111]

श्री

समस्त देशपांडे पा सुपे यास पत्र की, मोरो रामचंद्र देशपांडे पा मार यानी नारो भानजी कुळकर्णी मौजे भाकरवाडी पा दाभाडी याची लेक नवरी करून लग्न केले. ते मूल बटकीचे पोटची खरी जाली. यामुळे मोरो रामचंद्र यास व त्याचे भाऊबंद दशरात्र त्रिरात्रीचे अधिकारी सुपे व बारामतीस राहतात त्यास सर्वांस प्रायेश्चित द्यावे लागते. प्रायेश्चिताचा निछये करून क्षेत्र वांई येथील

१. सर्व पत्र बालबोधींत.

पत्रे दिल्ही आहेत. तरी तुम्ही समस्त दशरात्रीचे व त्रिरात्रीचे अधिकारी वाईस जाऊन ब्राह्मण सांगतील त्याप्रमाणे प्रायेश्चित घेणे म्हणून पत्र द्यावयाची आज्ञा जाली.

¶*Order is issued enjoining penance on all Deshpandes of Supa because one of them, Moro Ramchandra, accepted a bride who happened to be an issue of a female slave*

No. 112]

श्री

देशपांडे याच्या घरी लग्नांत अगर बोभाट होयेस्तवर आठादाहा रोजात कोण कोण जेवले याचा शोध मनास आणला, स्वगोत्री भाऊबंद व अगांतुक मात्र जेवले. त्यासी भाऊबंदास प्रायेश्चित्त घेतच आहेत. अगांतुकाचा कोठे ठिकाण नाही. त्यासिवाये अन्यत्र गोत्री व सहवासी लोक परकी कोन्ही जेवले नाहीत. येणेप्रो शोध केला असे.

हा मजकूर वाईकराचे पत्री ल्याहावयाची आज्ञा जाली आहे.

¶*The paper refers to the punishment meted out to those who happened to dine with the Deshpandes of Supa referred to in the preceding letter.*

No. 113]

श्री

पूर्वी येक वेळ पत्र दिल्हे होते ते गमावले म्हणून दुसरेयाने दिल्हे.

यादी राजश्री गणपतराव रास्ते यांजकडील कारकून नारो त्रिंबक उंबराळकर यास भ्रम जाला ते समई त्याने शूद्रान्न भक्षिले. पुढे सावध जाल्यावर प्रायश्चित्त देवऊन शुध्ध केला. उपरांत मागती भ्रम होऊन बाहेर जाऊन येक मासपर्यंत शूद्रान्न भक्षिले. पुन्हा सावध होऊन आनुताप होऊन शरण आल्यावर पुर्वांग प्रायश्चित्त करऊन क्षेत्रीं ब्रह्मगिरी हर्षाच्या बारा प्रदक्षणा नेमून तुम्हाकडे पाठविला आहे. याजकडून आपले विद्यमाने नेमल्याप्रो बारा प्रदक्षणा करऊन केल्याचे उतर देऊन यास पाठवावा म्हणोन समस्त ब्राह्मण क्षेत्र त्रिंबक यांसी पत्र. १.

¶*This is a letter to the Brahmans at Trimbak asking them to do some purificatory rites in the case of a Brahman, Umbralkar, Raste's clerk, who, in a fit of insanity, took food prepared by Shudras.*

No. 114]

श्री

राजमान्येयाविराजित राजेश्री
बालाजीपंत मामा व राजेश्री अंताजी-
पंत स्वामीस

प्रति माहादाजी राल व खंडभट जोसी पावळकर आसीर्वाद उपर. तुम्ही पत्र पाठविले त्याजवरून ब्राह्मणाचा तलाश केला, परंतु ब्राम्हण उतम न मिले. त्यास हे ब्राह्मण अपस्तम उतम तेलंग पाच जण पाठविले आहेत. त्यास दर ब्राह्मणास अधेली द्यावी लागते. त्यास तुमच्या चितास आले तर हे ब्राह्मण ठेऊन कार्यसिधि करणे. याजला दक्षणा देणे. चितास न आले तर याजला आज्ञा देणे. कळले पाहिजे हा आसीर्वाद.

¶*Five Telangi Brahmins are sent for some religious function to Balajipant and Antajipant.*

No. 115]

श्री

विज्ञापना विशेष. ब्राह्मण अजमासे:

६८००	पहिले दरवाज्यास	१८००	तिसरे दरवाज्यास
२१००	दुसरे दरवाज्यास	१३००	चवथे दरवाज्यास
		१३५०	पाचवे दरवाज्यास
८९००		४४५०	

१३३५०

येकूण तेरा हजार तीनशे पनास अजमासे जाहाले. शेरा दशग्रंथी ब्राह्मणास नऊदाहा, पंचग्रंथी पाचसाहा, बाकी दोन तीन च्यार येणेप्रो शेरा आहे. ब्राह्मण पहिल्या दरवाज्यावर दाटी आहे. बाकी दरवाज्यावर ब्राह्मण नाही. वरचेवर येतात ते दक्षणा घेतात. वरकड बंदोबस्त आहे. कलावे, बहुत काय लिहिणे, हे विज्ञापना.

¶*The paper mentions the different amounts of Dakshina distributed to the Brahmans according to their attainments in learning.*

No. 116]

श्री

सेवेसी विज्ञापना. पागेत गोसावी जोगी बैरागी वगैरे कंगाल यास दक्षणा द्यावयाची आज्ञा. त्यास हे जात थोडकी; परंतु कंगाल बायेका बहुत जमा जाहाल्या आहेत, त्यांचीच दाटी फार. त्यास ब्राह्मण बायकाखेरीज करून इतर कंगाल आहे त्यास दक्षणा द्यावयाची आज्ञा होईल तरी देऊ. कंगाल भिकारी रांडाची दाटी फार. ते राहिल्यामुळे गोंगाट फार पडला आहे. यास्तव भिकाऱ्याबरोबर भिकारणी बाइकांची दक्षणा दिल्यास ब्राह्मण बाइकांची मात्र दक्षणा राहील, ते उद्या होईल. आज्ञा होईल त्याप्रा करू हे विज्ञापना.

[याचें उत्तर]

पुरुषांची बायकांची दक्षणा येक जागा देणे ठीक पडणार नाही. तुमचे मते बायकास दिल्यास चिंता नाही, सेवटास जाईल, असे असल्यास कंगाल बायकास द्यावी. उद्या ब्राह्मण बायकास द्यावी. हे विनंती.

¶*Peshwa's orders are communicated in this paper about the distribution of alms among Brahman and other poor women.*

No. 117] *[Before 1761?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत-

प्रधान स्वामीचे सेवेसी

पो श्रीपतराऊ बापूजी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २० जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून (य)थास्थित असे विशेष. स्वामी(नी) पत्र पा ते प्रविष्ट जालें. श्रीनारायण व मोरेश्वरीं अनुष्टानास ब्राह्मण घातले आहेत. त्याचे साहित्य न्यून्यपूर्ण सर्व मनास अणून उतम रीतीनें साहित्य होये ते करणे म्हणून आज्ञा. यैसियास स्वामीनी दोही स्थलींच्या अनुष्टानाचे साहित्य पूर्वी नेमून पाठविलें त्याप्रा सामग्री फाटी पान पत्रावल याप्रा करून दिल्हे. पुढेहि जोपर्यंत अनुष्टान चालेल तोंपर्यत साहित्य आज्ञेप्रा होईल. श्वैपाकास भांडी मेळऊन देणे म्हणून स्वामीनी आज्ञा केली होती. त्यास आठा चौ रोजाचे कृत्य नव्हे जे, भांडी मेळऊन द्यावयास कार्यास येतील. हे अनुष्टान नेहमी यास मेळविल्या भांड्याने चालेल अगर कोण्ही देईल यैसे नाही. याकरिता नारायेणाचे देउळच्या ब्राह्मणास हंडा, घागर घरची दिल्ही. वरकड अवघी नवीच घेऊन दिल्ही तैसीच मोरेश्वरच्या साहित्यास भांडी हंडा घागर देखील

अवघी नवीच घेऊन दिल्ही. ब्राह्मणास अस्तरणास दोही स्थली जाजमे न(वी) करून दिल्ही. मोरेश्वरी गवली संनिध (हो)ते यामुळें दुधाचे आनकूल जाले. नारायणाजवल गवली नाहीत. दुधाचे साहित्य तर पाहिजे याकरितां म्हैस विकत येऊन देऊन दुधाची बेगमी करून दिल्ही. म्हसीचे निगेस नेहमी माणूस दिल्हे आहे. अनुष्ठानास पात्रें स्वामीचे आज्ञेप्रा दिल्ही. आज्ञेखेरीज आणखी मागितली आहेत तीहि अनकूल करून देऊन अनुष्ठान समातीस पावल्यावर भांडी जाजमे, म्हैस सरकारांत जमा होईल. नारो दादाजी यास ताकीद करून शाख-भाजीची बेगमी नित्य करविली आहे. पुढे वरचेवर दोही स्थलीचा परामर्ष करीत जाऊन साहित्यांस परामर्षास अंतर होणार नाही. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विनंती.

¶[*Shripatrao Bapuji informs the Peshwa Nanasaheb of his having executed the orders about certain religious rites at the temples of Narayan and Moreshwar having been performed.*

No. 118]

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री
विठलपंत मामा स्वामींचे सेवेसी

पोष्य सखाराम सदासिव सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २९ जिलकादपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. मैत्राणी प्रकर्णी येथून पत्रे घेऊन पाठवण्याविसी आपण लिा होते. त्यास मध्ये पत्रे देण्याविसी तेथील पत्राचा हिस्का घेतला होता त्याचा मजकूर लिहिला आहे. परंतु हाली युक्तीने ग्रामस्ताचे व राजश्री आन्या गोसावी याचे पत्र घेऊन पाठविले आहे. सरकारचे नावे ग्रामसमंध्ये पत्र लिहावयाची त्याची चाल नाही याजकरिता राजश्री तात्याचे नावे त्याणी दिल्हे आहे. ग्रामास्तांचे पत्र सरकारचे नावेचे आहे. वेदशास्त्रसपन्न राजश्री बाळाशास्त्री झाबरे याचे पत्र मागाहून घेऊन पाठवितो. वो राजश्री रामभट दादा पोचोन मैत्राणी प्रकर्ण उपास्थित जाहाले असल्यास ग्रामस्तांचे पत्र सरकारचे नावे आहे ते श्रीमंतापासी पंडित शास्त्री ज्या समई बसत असतील ते वेळेस मर्जी सुप्रसन्न पाहून पत्र द्यावे. संस्कृत आहे ते वाचून पाहात अशा संधीस द्यावे. मागे रामशास्त्री याचे कारकीर्दीत मैत्राणी याचे प्रकर्ण पडोन ग्रामण्य जाहाले होते तेव्हा मैत्राणी यास मसाले सरकारातून होऊन ज्याणी भोजने व फराल केले होते त्यास प्रायेश्चि(त) दिल्ही आहेत. त्या प्रकर्णी कागदपत्र आहेत

तेथे प्रसंग पडून करण लागल्यास त्याच्याहि नकला घेऊन पाठऊ. तूर्त ते कागदपत्र येथे नाहीत. तेथे पाहिजे असा प्रसंग पडल्यास ते कागदपत्र पाठवण्याविसी लिहून पत्र पाठवावे म्हणजे ज्यापासी आहेत त्यांजकडून घेऊन पाठऊ. परंतु सारांश घारपुरे याची बाजू शेर न होई आणि मैत्राणी याजपासून दोन रुा उत्पन्न होत असे जाहाले पाहिजे. सदरहू दोन पत्रे राजश्री सखारामपंत देशपांडे याचा गडी गेला त्याजबरोबर पाठविली आहेत. पोचल्याचे उतर पाठवावे. भिलांचे बंदोबस्ताकरितां स्वारी दीडशे लोक व दाहाबारा स्वार नवे ठेऊन राजश्री लक्ष्मण गोपाल व रंगो मोरेश्वर यास पाठविले आहेत. सरसुभ्याची सनद येईसी असल्यास घेऊन पाठवावी म्हणजे भिलांचा बदोबस्त होऊन दोन रुा उत्पन्न होऊन सर्वावर दाब राहून काम होईल. युक्तीस आल्यास करावे. वरकड मजकूर मागाहून लिहून पाठवितो. बहुत काय लिहिणे, लोभ करावा हे विनंती.

¶*This paper refers to some social dispute regarding the Maitrani Brahmans.*

No. 119] [?

छ ११ जिलकाद.

श्री

यादी आत्मानंद सरस्वती स्वामी अंध कासीस रवाना केला आहे. त्यास राहावयासी स्थल, सरकारची हवेली मंगलगौरीचे घाटी आहे, तेथे येक खोली स्वामीचे सोईस पडेल व ठेवावी येविसी पत्रें :

० रामचंद्र भट को(ल)टकर

१ धोंडो खंडाजीस

सदरहू प्रो येक पत्र देणे

¶*The Peshwa makes arrangement for the lodging of a blind ascetic at Benares.*

No. 120] [*Before 1758*

श्री

यादी वेदशास्त्र रा गोपीनाथभट घुले वास्तव्य श्री वृंदावन यांचे वृंदावन क्षेत्री दररोज रुा १ पूर्वीपासून सवाई जैयसिंग याणी करून दिल्हा होता; प्रस्तुत

चालत नाही. यासी सुरजमल जाटास पत्र आसावे कीं, दर रोज रुो चालवणे[+] म्हणोन पत्र यास देणे व सरकारची सनद वर्तमान भावी कमाविसदाराचे नावे देणे.

¶*Raghunathrao orders that a letter be sent to Surajmal Jat, asking him to continue the allowance of a Rupee per day to Gopinathbhat Ghule which was originally granted to him by Sawai Jaisinh.*

No. 121] [*Before 1740*

[१] श्रीसोमेश्वर

श्रीमंत राजश्री बाबा

यांप्रति शिवरामभट्ट वेदोक्त आशिर्वाद उपरि. श्रीचा प्रसाद दाळिंब येक पाठविले आहे तें घेतलें पाहिजे विशेष. श्रीदेवाचें वर्तमान, काम कार्याविषयीं बहुत श्रमात आहे. ईश्वर तुम्हास प्रेरणा करील तेसमयीं तुम्हि देवाचें कार्य करून द्याल हें सत्य आहे. सर्व कर्ता ईश्वर आहे. देवानें तुम्हास निर्माण केलें आहें किं तुमच्या हातें बहुत देवाब्राह्मणाचीं कार्यें होवीं. येश तुमचा पदरीं सर्व प्रकारें पडेल आम्ही सर्व प्रकारें निरंतर तुमचें कल्याण श्रीदेवापासिं इछित आहो. कितेक वर्तमान माहा(दा)जि सागतां विदित होयील हे आशिर्वाद.

¶*Shivrambhat Chitrav entreats Bajirao Ballal to bestow some aid upon the temple of Someshwar.*

No. 122]

श्री [२]

तीर्थस्वरूप गंगाजान्हवि-
समान मातुश्री ताई वडिलांचे
शेवेशि

अपत्ये लक्ष्मणाने चरणावर मस्तक ठेउन साष्टांग नमस्कार विनंति. येथिल वर्तमान आश्विन वद्य पंचमीपर्यंत वडिलांचे आशीर्वादेकरून वाराणसिमध्ये समस्त सुखरूप असो विशेष. वडिलांकडून बहुत दिवस पत्र येउन वर्तमान कळत नाहि तर वर्चेवर आशिर्वादपत्र पाठऊन सांभाळ करावा. आमचे वर्तमान तर काशिस्थ ब्रह्मणाशि परस्पर कलह लागला आहे. एका पक्षाकडे आम्ही आहो, दुसऱ्या पक्षाकडे बाळकृष्ण दीक्षित आहेत. परंतु त्याचा पक्ष कम आहे. का म्हणाल, तर पूर्वेकडे अंबष्ट आहे त्याचे घरि यज्ञानिमित्त ब्राह्मण गेले होते. यास ब्राह्मणानि जातिबाहेर केले होते. त्यास बाळकृष्ण दीक्षित प्रयश्चित्तावाचुन

+ यापुढील मजकूर राघोबाच्या हातचा. १ सर्व पत्र बालबोधींत. २ सबंध पत्र बालबोधींत आहे.

घ्यावे ऐसा निश्चय केला. तेव्हा सर्व जाति मीळोन सम्मत केले तेव्हा त्याचा पक्ष उणा पडला. आता तव त्याचे वस्तु काहि करवत नाहि परंतु तो द्रव्यवान. द्वेष आम्हाकडून नाहि. परधर्मस्थापक जे ब्राह्मण त्याचे कागदावर आम्ही सम्मत घातिले म्हणउन आम्हाशि द्वेष. आम्हास पक्ष आपला आहे. आमचि चिंता आपणास आहे. हे वर्तमान साकल्य यात्रकरू दादाप्रमुख सांगतिल तेव्हा साकल्य कळेल. वडिलांहि वारंवार पत्र पाठउन सांभाळ करावा. येथील काहि वस्तवानि लागलि तर सांघोन पाठवावि ; पाठवित जाउ. आशिर्वादपत्र पाठउन लेकराचा सांभाळ करावा. बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*Lakshman writes to Kashibai mentioning a dispute among local Brahmans in Benares and the consequent differences that had arisen between the writer and Balkrishna Dikshit.*

No. 123]

पा छ १९ रबिलोवल

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी रघुनाथ मो कुसलंब पा जामखेड चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ १० रबिलवलपावेतो राजपागेचे व सेवकाचे वर्तमान क्षेमरूप आहे. पागेत रोग सिरला. त्या रोगाचे नाव कोण्हास कलत नाही. पागेचा वैद्य व घोडके जे कोणही वोशधे सांगतात तीहि देतो. परंतु उतार पडत नाही. नेमणूकपैकी घोडी व सिगरे १२ आजतागाईत मयेंत जाहाली. नवी सिगरे पांच सा मेली. त्याच्या माना उफराट्या होऊन मेली. प्रस्तुत खंडोबा झाडाच्या आंगीं येऊ सांगतो की, तुम्ही येथे राहिल्याने पागेची घोडी मारीन, थैसे पष्ट रामाजी भगवंत केसकर याच्ये गुाने म्हणतो हे वर्तमान लिहिले आहे. पागेस दुसरा जाग्याची आज्ञा थडीस होऊन येईल. येथे घोडी ठेवलियाने खराब होतील. रोगाचे वर्तमान संकरापा धर्णे सांगता कलो येईल. पुढे घोडीयासी कडबा पाहिजे. गवतावर घोडी जीव धरीत नाही. आपण सातारियासी गेलियावर सेवेसी येतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Good many horses belonging to a cavalry regiment stationed at Kusalamb fell victims to a disease which could not be diagnosed and the reason was sought in the displeasure of God Khandoba. The writer Visaji Raghunath solicits Nana's permission to have the horses removed to some other place.*

No. 124] [2-2-1768?

श्रीविद्याशंकर

श्रीमत्परमहंस परिव्राजकाच्यार्यवर्य येमनियमासनप्राणायाम-प्रेत्याहारध्यानधारणसमाध्यष्टांगयोगानुष्टाननिष्ठतपश्चक्रवर्त्यनाद्य-विछिन्नगुरुपरंपराप्राप्तषड्दर्शनस्थापनाच्यार्यऋष्यशृंगपुरवराधीश्वर श्रीमत्छंकराच्यार्यान्वयसंज्याताभिवन श्रीविद्याशंकर-भारतीस्वामीकरकंजोद्भव श्रीविद्यानरसिंहभारतीस्वामीकृत नारायणस्मरणानि

सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री मोरो हरि परमभक्तोत्तम याप्रति विशेषस्तु. तुमचे कल्याण चिंतित छात्रसभासमवेत श्रीनिकट आदीमठ संखेश्वरी राहिलों असों. अत्रत्य कुशल माघ सीत पौर्णमा भोमवारपर्यंत येथास्थित जाणून स्वकीये स्वाभ्योदय लेखनाभिप्रायें चित प्रमोदवीत असिलें पाहिजे. तदनंतर करविरीं मठसंस्थानास राजपत्नीकडील उपद्रव जाहाला तन्मुले तो मठ त्याग करून अत्रस्थानी अगमन जाहालें. 'मार्वें मठीचे द्वारी चौकी बसऊन मठी कारभारी ठेविले होते त्यास प्रतिबंध करून ठेविले. संस्थानिची खेडियासी वरांता करून रुपयाचा उपद्रव केला. यास्तव श्रीमंतास व तुम्हास सर्वत्रास आसीर्वादपत्रे प्रेषिली त्यावरून श्रीमंतानी श्रीमन्मातुश्रीस विनंतीपत्रें लिहून पाठविली जे धर्मसंस्थान आपले राज्यातील, त्यास उपद्रव होऊ न द्यावा. ऐसे कितेक सामोपचारें लिहिले वरून अंतर्यामीचा अर्थ शुध नसतां बाह्यात्कारें मात्र वरचेवरी पत्रें पाठवीत होती. परंतु मठीची चौकी अथवा कारभारी यासी प्रतिबंध केल्याची मुक्तता न करितां बोलाऊ पाठविलें तेव्हां त्याचे चिताची पक्कता नाहीं. गेले नंतर पुनरुक्त तोच प्रकार येऊन घडेल हा निश्चये जाणून करवीरचे पुण्यतिथीचा समारंभ अत्रस्थळींच करावा या अर्थें सर्व साहित्याची सिधता केली तों दुसरे दिवसी महोत्छहास प्रारंभ होणार तों पहिले दिवसीं राजश्री राणोजी सिंदे यास मातुश्रीनी पाठविलें. त्याही करवीर मठास येऊन महोत्छह संपदावा याअर्थें मातुश्रीचे विनंतीपत्र घेऊन येऊन बहुत अग्रह केला. तो ग्रहस्त पूर्वीपासून संस्थानिचे ममतेतील, परंतु त्याचे अज्ञेत बर्तणार तेव्हा तेथील भरवसा कांही नाही. अवकाश पाहता येक दिवसाचा उरला. यास्तव राजश्री बाबुराव दादाजी यासी लेहून पाठविलें. त्यानी आपणाकडील कारकून पाठविले. त्याचे व राणोजी सिंदे याचे बोलणे करारमदार होऊन करविरास जावयाचा निश्चय केला. यानंतर रातोरात करवीर मठास जाणें जाहालें. करवीर मठीची चौकी प्रतिबंध अवघा

मुक्त जाहला. च्यारी दिवस महोत्छह सांग संपादिल्यानंतर अत्रस्थळीचा महोत्छह करणें होता याअर्थें स्वारीचा सरंजाम सिध करून निघणें जाहालें. तो इतकियांत पुन्हा दिवाणची चौकी येऊन मठीची द्वारे बंद करून देव देवार्चन, कोठी, बाडेंभाडें व उंटे कोठीचे बैल सर्व अडथळून पाहिले. गमनासदेखील प्रतिबंध ऐसा विचार जाहाला. सारांश, राणोजी सिंदे मध्यस्त होते म्हणून त्यानी महत्प्रयेत्न करून सडेनिसी तेथून कडेस काढून दिले. वरकड सरंजाम सर्व प्रतिबंधात पडिला आहे. देवदेवार्चन नसता राहिलो आहों. स्वारीचा सरंजामहि नाहीसा जाहला. हे वृत आपणास कलावे जाणून लि॥ असे. परस्परेहि कललें असेल अथवा कलेल. या गोष्टीचा अभिमान आपणास पूर्ण असावा. याची पैरवी ध्यानात अणून जेणेकरून संस्थानिचे कार्य होऊन आपणास येश किर्ति सपादन होये तो अर्थ करणार सूज्ञ असा. आपण मठीचे व देवब्राह्मणाचे साभिमानी याआर्थें पूर्वोक्त संविस्तर आर्थ पत्री लेख करून पाठविला आहे. तो चितात अणून सस्थानिची ममता धरिल्याने श्रयस्कर आहे. सूज्ञाप्रति विशेष काये लिहिणें? आपणाकारणे साक्षत नारीकेल फलप्रसाद पाठविला आहे. स्वीकारणा[र] सूज्ञ आसा. आज्ञेयमुल्लसति

¶*Shankaracharya Narasinh Bhardti seeks relief against the high handed action of the Regent-queen of Kolhapur who with promises of safety beguiled him to Karvir to perform the annual celebrations; but on their conclusion made the Swami a virtual prisoner and stationed guards around his place of residence. The Swami through the mediation of influential persons like Ranoji Sindia got himself released but had to leave behind all his belongings. He makes an appeal to Moro Hari the Head Clerk of Ramshastri to set the affair right.*

No. 125]

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री अमृतराव यासी

प्रति रामशास्त्री आसीर्वाद उपरी. वो संपन्न राजश्री माहादेवशास्त्री साठे यांची योग्यता शास्त्रांत आणि तपश्चर्येंत उत्कृष्ट आहे हे जाणून किल्यास पाठविले आहे; तरी तेथे किल्यास राहून स्नानसंध्या करितील; तरी भोजनाचे पृथक साहित्य करून द्यावे. ज्या ठिकाणीं स्नानसंध्येस बसतील तेथे निपरुद्रव स्थल करून द्यावे. ब्राम्हण बहुत योग्य आहेत. बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.

¶*Ramshastri asks Amritrao to allow every facility at the fort of Purandhar to Mahadeo Shastri Sathe, a Brahman of great learning.*

7527

No. 126]

नकल
सदरहूअन्वये पत्र व सरकारची
यादी लिहून दिल्ही छ ९ जिल्हेज.

श्री

वेदशास्त्र सपन्न राजश्री समस्त
ब्राह्मण तालुके आजणवेल यांसी

प्रति रामशास्त्री नमस्कार विनंती उपरी. विसाजी रघुनाथ वैद्य माहाजन अंजणवेल तालुके मार यानी विदित केले कीं, आपले चुलतभाऊ विठल अंनत वैद्य यांचे घरी गोपाळ बहिरव सान्या होता. त्याचा व्रतबंध सान्याचें गोत्रीं त्याचे बंधूनें केल्यावर त्याचें लग्न धमार्थ विठल अनंत यानी केलें. उपरांत मृत्य पावले. त्यांची क्रिया सान्या मार याणे केली. इतक्यावरून त्यांचा पुत्र म्हणऊ लागला. परंतु दत्तविधान जाले नाहीं. याजमुलें त्याजकडील क्षयवृध्धी होत आल्या त्या आपण न धरिल्या. येविसी त्याचा व आमचा कजिया लागोन मनसुबी हुजूर पडिली आहे. त्याचा फडशा जाला नाहीं. प्रस्तुत गोपाळ बहिरव याचा पुत्र वारला, त्याची क्रिया वैद्यांचे गोत्री करून विठल अनंताचे त्रईस मेलिवणार. त्यास आम्ही आमचे गोत्री क्रिया करूं नये. म्हणौन अडथला केला. त्यावरून क्रिया राहिले असतां कसबे गुहागरचे वगैरे ब्राह्मण मिलोन वैद्यांचे गोत्रीं क्रिया करऊन सपिंडी करणार. त्यास मनसुबीचा फडशा जाला नसतां न व्हावी व गोपाल बहिरवास आणऊन मनसुबीचा फडशा करवावा. येविसीं आज्ञा जाली पाहिजे म्हणौन. त्यास विठल अनंत वैद्य यानी गोपालास दत्तपुत्र घेतला न घेतला येविसीची चौकसी हुजूर होणे असतां गोपालाचा पुत्र वारला, त्याची क्रिया वैद्याचे गोत्री करावी हे ठीक नव्हे. यास्तव गोपालास हुजूर आणविला आहे. मनसुबी होऊन शास्त्रता ठरेल त्याप्रो करावयास येईल. तोंपर्यंत गोपालानें नैवेद्य वैश्वदेवादिक व्यवहार चालऊं नये. व त्याचे घरी ब्राह्मणानी पंक्तिव्यवहार करूं नये. वैद्यांचे घरी व्यवहार चालत आल्याप्रो चालेल त्यास कोणी दिकत करूं नये.

¶*Ramshastri informs the Brahmans of Anjanvel of a temporary injunction issued by him in a certain religious dispute between the families of Vaidya and Sane.*

7528

No. 127]

श्री

आसीर्वाद उपरी. तुळजापुरी गुजराथी तपश्वी आहे. त्याची भेटी घेतली. त्यासी काही कार्यप्रकर्णी बोलणे जाहाले. त्यास हा अर्थ कार्य करितो, तदनंतर काय देवता संतुष्ट खर्च होईल तो द्यावा. सर्व प्रयोग बावाचे सिधी आहे. त्यास याचे उतर येजमान स्वामीस कळऊन बावास तेथपरियेत न्यावयाचे आगर आहेत तेथेच उद्योग, हा विचार समजोन उतर यावें म्हणजे त्यास लिहून पा हा आसीर्वाद.

¶*The paper refers to a Gujarathi ascetic possessing some mystic powers.*

No. 128]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य

राजश्री शास्त्रीबावा स्वामीचे शेवेसी

विद्यार्थी जोती गोपाळ माहाभागवत सां नमस्कार विनंती येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. श्रीपांडुरंगाच्या स्थापना ते प्रांतीहून करीत इकडे हे प्रांती आलो. मार्गी पेठ येवले परगणे पाटोदे येथे आलो. तेथीलहि गावकरी आनकूल जाले. देवाल्य बांधून दिल्हे. त्यावरून श्रीची स्थापना तेथे केली. येक वर्ष जाले. आम्ही जनस्थानी येऊन राहिलो. आमच्या मागे राजश्री बापाजी गोसावी पुन्यस्तंबकर पेठ मारी राहातात. त्यांचे तेथे संस्थान व्यंकटेशाचे आहे. त्यास त्यानी आमचे संवस्थानाकडे समारंभ विशेष पाहून तेथे आमचा ब्राह्मण होता त्यासी नाना प्रकारे कज्या करून श्रीपांडुरंगाच्या मोर्ती स्थापिल्या होत्या त्याचा उछेद करून घेऊन गेला. देवाल्य पाडीत होता तें गांवकरी यानी राहाविलें, कोणाचे यैकेनात. तदनंतर आम्ही येथून सिध्य पाठविले त्यांच्या स्वाधीन मोर्ती केल्या. पुन्हा स्थापनेचा आरंभ करतांच मारामारी करून मोर्ती नेल्या. राजश्री सिवाजी विठल विंचूरकर याजकडील कमाविसदारानी व राजश्री रामचंद्रपंत आंबीकर याजकडील कमाविसदारानी बहुता प्रकारें सांगितले परंतु यैकिले नाही. तेथे यज्जूशाकी मडळी आहेत. सर्वत्र मिळोन मारामारी करितात. आम्ही स्थापना करून त्याचा उछर्ग केला. तो देव सर्वांचा आहे. आम्हास काही आभिमान नाही. परंतु स्थापनेचा उदेग कोण्ही करीत नाही. याकरितां आपणास लिहिले आसे. तर हा मार मनास आणून स्थापना करावी. मारनिलेस तेथे नेऊन चौकसी करावयाची आसली

7529

तर करावी. नाही तर कमाविसदारास ताकीदपत्रे द्यावी. हरयेक प्रकारे देव स्वस्थानी बसतील यैसे करावे. स्वराज्यांत यैसे कोठे जाले नाहीं. आम्ही येथे पचवीस ब्राह्मण उपोशण करून श्रीरामचंद्रजीसनिध पंचवटीमध्यें स्नानसंध्या करून आहों. स्थापना जाल्यावर पारणे होईल. आपण धर्मकृत्याचे ठाई सादर आहेत. त्याहावे यैसे नाहीं. सूचनार्थ लिा आसे. आपल्यास कर्तव्य तें करावें. श्रीचा प्रसाद नारेळ व बुका पाठविला आहे, तो घ्यावा. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*A dispute between Joti Gopal and Bapaji Gosavi is referred to Ramshastri. Joti Gopal with the help of the people of the locality erected a temple to God Pandurang at Yevale. The presence of the new temple was disliked by Bapaji Gosavi, the owner of the older temple of Vyankatesh, who with the use of force removed the idols in the new temple and hence the dispute.*

No. 129] [*16-6-1753?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

पो बापूजी श्रीपत कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जेष्ट बहुल प्रतिपदा मंदवासरपर्यंत स्वामींचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामींनी पत्र पाठविले तेथे आज्ञा जे जेष्ठ मास अर्धा होवयास आला, अद्यापि पर्जेन्य पडत नाही; मुलकात पर्जेन्य पडोन पीक जाले पाहिजे याकरितां संपनास रुपये वेचून मोरगांव व आणखें स्थली ब्राह्मण अनुष्टानास घालून पर्जेन्य वृष्टि होये ते गोष्टी करणे म्हणून आज्ञा. यैसीयास स्वामींचे आज्ञेप्रमाणे मोरगावी व आणखी अनुष्टानायोग्य स्थल ब्राह्मणाच्या विचारे मनास आणून ब्राह्मण अनुष्टानास घालून प्रारंभ करवितों. पुढें फळदाता ईस्वर आहे. कसबे पुण्यामधे दोन महिने मुकाम आहे तेथे लवणशाखेची बेगमी असली पाहिजे. तर हिरवे आंबे राजश्री विसाजीपंताचे घरी नेऊन पावते करून लवणशाख घालवणे म्हणून आज्ञा. यैसियास या प्रांते कोठे अंबराई आहेत यैसे नाही. त्याहीमधे कोठे दाहापांच झाडे आहेत तेथे हिरवे आंबे अद्यापि कोठे राहिले आहेत यैसे नाही. स्वामींचे आज्ञेप्रमाणे प्रत्न करून जे मिळतील ते पुण्यास राजश्री विसाजीपंताचे घरी पावते करितो. पिराजी खानाजी जासूद यास दीड रुपया स्वामींने देविला तो आज्ञेप्राा प्रविष्ट केला. शेवेशी श्रृत जाले पाहिजे हे विनंती.

¶*Bapuji Shripat writes to the Peshwa that he would obey his instructions and engage Brahmans to perform religious ceremonies to propitiate gods that the belated rains may come down to save the crops.*

No. 130]

पौ छ ६ जोवल

श्रीत्र्यंबकेस्वर

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक नारो दामोदर साष्टांग नमस्कार विनंती. ताा छ १८ जमादिलवल पर्यंत स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री पंत (प्रधान) [येक ओळ फाटली आहे.] श्रीकुशावर्ताचा व श्री * * * रव्य ज्योतीलिंग यांचा उतम रीतीने बंदोबस्त चालवावा येसी आज्ञा मजला करून ठेविले. ब्राह्मणाविरहित अन्यत्र जात स्त्रिया आदिकरून दर्शन मात्र दरवाजियाबाहेरून घ्यावें. ब्राह्मण स्नान करून जाईल त्याणी देवास स्पर्ष करावा. वोवलेयाने ब्राह्मणानेहि सिऊं नये. श्रीची अर्च्या त्रिकाले चालवावी. तैसेंच देवाजवल तडी तापडीयासी (अपूर्ण)

¶*Naro Damodar writes to the Peshwa communicating the arrangements in connection with visits to the chief temple of Shiva at Trimbak.*

No. 131] [*14-8-1761*

मोहरम श्रावण सुाा इसने

जानो मल्हार देशपांडे पाा फलटण यांचा व बाबूराव सखदेव देशपांडे पाा मजकूर यांचा कजिया होऊन परस्परे मारे जाहाले; त्यात आपाजी चिमणाजी देशपांडे याचे हाते तरवारेची जखम लागोन शामराव सखदेव देशपांडे मृत्य पावले; व आपाजीचा भाऊ बाजी चिमणाजी यांस शामराव याच्या हाते तरवारेची जखम लागोन मृत्य पावला. सबब आपाजी मजकूर बहिशकृत जाहला होता. तो पेशजी हुजुर येऊन ब्राह्मसभेस शरण आला; तन्मुले धर्मशास्त्रमते ते तुलापुरी श्रीभीमातीरी पूर्वांग प्रायश्चित संकल्प करऊन आपाजीस श्रीकाशीयात्रादि उतर मानस व शेशुबाध+ रामश्वेरआदि दक्षणमानसयात्रा नेमिल्या, त्याप्राो दोन्ही यात्रा आपाजीने करून यात्रा जालियाचे दाखले सरकारात रूजू केले. त्यावरून उतराग प्रायश्चित तुलापुरी करऊन आपाजीस शुध केले असे. अत:पर कसबा फलटण येथील ब्राह्मणास ताकीद करून आपाजीचे घरी ब्राह्मणभोजन करऊन उपरांत याचे घरी ब्राह्मणाचे व्यवहार पूर्ववतप्राो करवीत जावे. जाणीजे छ १३ मोहरम बहुत काय लिहिणे.

¶*Penance is inflicted by way of punishment upon Apaji Chimnaji Deshpande for having murdered Shamrao Sakhdev Deshpande in a scuffle.*

\+ सेतुबंध.

No. 132] [2-8-1764

पैवस्ति छ ३ सफर
सुा खमस सितैन.

श्री

सेवेसी विज्ञापना. मोरो अनंत व चिमणाजी बलाल खोत मौजे वाटद तर्फ सेतवडें सुभा राजापूर याचा व कवठेकर याचा खोतीचा कजिया आहे. त्याची मनसुफी पेशजी वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री यांणी मनास आणिली. त्यासी शास्त्री पक्ष धरून मनसुफी कारितात. त्यास दुसरेयाकडे सांगावी म्हणोन मोरो अनंत व चिमणाजी बल्लाल यांणीं विनंति केली. त्यावरून स्वामींनीं मनसुफी राजश्री शंकराजी केशव याजकडें सोपून शास्त्री याजकडील सब्या साक्षीचे कागद वसईस पाठवावें, येविशी शास्त्रीबावास पत्र दिल्हें. त्यावरून येविशी शास्त्रीबावांनीं पत्र लिहिलें आहे ते बजिनस जासूद घेऊन स्वामीकडें गेलेच आहेत. येथून पत्र गेलें त्यावर विनंति अणीख सारखी आहे तें चौकशीस येथें पाठविलें तेंच पत्र बजिनस पाठविलें आहे. पाहून आज्ञा करणें तें करावी. हें विज्ञापना. शास्त्री-बावा पक्ष धरून मनसबी करणार नाहीत. यास्तव त्याजकडेंच करावयाची आज्ञा करावी. हें विज्ञापना.

¶Nana Fadnis pleads to the Peshwa on behalf of Ramshastri who has been charged with favouritism by plaintiffs in a case pending before him.

No. 133] [29-5-1765

पौ छ २१ जिल्हेज
सन खमस सितैन.

श्री

पुा राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. राजश्री बापू सखाजी याचे घर किले पुरंदरास आहे ते गडकरी यांनी फोडिले व सासवडास रोखे केले आहेत. कितेक आवाडाव कारितात म्हणोन कळले, त्याजवरून विसाजी केशव व गडकरी यांस पत्रें पाठविली आहेत ती ठेवणे. तुम्ही तेथून पत्रे त्यास पाठवणे, कदाचित् हुजुरच्या पत्राचा उजूर कारितील तरी येथून पाठविली आहेत ती पत्रे किल्यास पाठवणे. सारांश मार-निलेचे घर फोडून वस्तभाव नेली असेल ते झाडियानसी याचे घरीं ठेवणे. सासवडास रोखे केले असतील ते मना करवणे. कोणेविसी आवाडाव न करीत

7532

ते करणे. येविसीचा बंदोबस्त उत्तम प्रकारे करणे. जाणिजे छ ८ जिल्हेज सुा खमस सितैन मया व अलफ. सारांश ज्या गोष्टींनें ते उपद्रव न देत ते करणे. किल्यास चौक्या द्याव्या. याविसीं आबा हशमनिसास पाा आहेत. तरी तें सविस्तर सांगतील. किलोकिल्याचे लोक जमाव करून चवक्याची तर्तूद जरूर जाली पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Nana Fadnis is asked to make inquiries and return all the articles carried from the house of Bapu Sakhaji by the Kolis on the fort. Pickets also are ordered to be placed on the fort.*

No. 134] [*7-11-1765*

पौ छ २२ जावल सुरू
सीत सितैन कार्तिक मास.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री शास्त्रीबावा स्वामीचे सेवेसी विद्यार्थी सखाराम भगवंत सां नमस्कार विनंति उपरी. नेरकराकडे बाइको मारल्याचा आल आहे. त्यास बहुत दिवस ब्राम्हण पेचात आहेत. आपणास तरी श्रीमंत पुण्यात होते याजमुले फावले नाही. या उपरी कृपा करून येथान्याये मुक्तता होईल ते करावे. लग्नकार्य चौलकर्म तटले आहे. आज्ञा करावी. बहुत काये लिहिणे. लोभ आसों दीजे हे विनंती.

¶*Sakharam Bapu requests Ramshastri to look into the case of a Brahman—charged with the murder of his wife and to release him if it is consistent with justice.*

No. 135] [*30-1-1769*

पौ छ १२ सवाल
बाा येमाजी प्यादा.

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यासी

विनंती. उपरी, तुम्ही पत्र पाठविले तें पावलें. चेना हिरेतरास याचा मजकूर लिहिला तो कलला. त्यास तो अपराधी आहे. त्याचा उजवा हात तोडणे. राा छ २१ रमजान सुा तिसा सितैन मया व अलफ. ^+^बेडी घालून किल्यावर ठेवणे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa orders that the right hand of Chena Hiretaras, a criminal, should be cut by way of punishment.*

No. 136] [15-4-1769

नकल

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नारायेणराव बलाल यासी. माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. मौजें प्रवरासंगम पो (ने)वासे येथील ब्राम्हणानी व पाटील याणी हुतासेनीचे दिवसात फालगुण मासी टोकेकरासी कलह करून वो राजश्री धोंडभट खरे याचा पुत्र जीवे मारला, याजमुले आपराधी; सबब मौजे मजकूर येथील त(ल)नची कसर व सरदेशमुखीचा आमल सरकारातून ब्राम्हणाकडे चालत आहे तो व मुकासा बाबतीचा आमल पवाराचा सरंजाम आहे तो, त्याणी आपले तर्फेन ब्राम्हणाकडे इनाम दिल्हा असल्यास तो देखील व ब्राम्हणाची वतने जोसी कुलकर्णी व धर्माधिकारीण व क्षेत्रसमधे येजमानकृत्य येणेप्रमाणे ब्राम्हणाकडील वतने व मोकिदमीचे वतन सरकारात जफ्त करून सदरहू समधे आकार होईल तो सरकार-हिशेबी जमा करणे. जाणिजे छ ७ जिल्हेज सुा तिसा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*The Peshwa asks his brother Narayanrao to confiscate all rights and Vatans of the Brahmans and Patils of Pravarasangam who during the Holi festival quarrelled with the inhabitants of Toke and put to death a Brahman youth.*

No. 137] [20-12-1769

पो छ. ११ रमजान सबैन.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळाजी
जनार्दन स्वामी गो यांसी

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. वेदमूर्ति राजश्री दादोबा लोहकरे याचे सेतात डेरे जाहाले सबब सेताची तसनस जाली आहे ते तुम्ही मनास आणून त्याचा ऐवज देणे. रा छ २१ साबान सुा सबैन मया व अलफ. +बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa orders compensation being paid to one Dadoba Lohakare for the loss he suffered on account of the Peshwa having encamped in his field.*

7534

No. 138] [9-3-1772

श्री

यादी बलराम मणीराम कनोजी ब्राम्हण वास्तव्य आमदानगर याणे ब्राम्हण कर याचे स्त्रीचा अभिलाश करून फिताऊन घरास आणिली म्हणून फिर्याद हुजूर जाहाला. त्याची चौकसी पाहाता अपराध सदरहुप्रमाणे याजकडे शाबूत जाला; सबब बलरामाचे घरचा वितविशय सरकारात जफ्त करून याजला किले सिवनेरीस आटकेत ठेविला होता. त्यास ब्राम्हणाची बाइको बलरामाने आणिली ती त्याचे घरी मृत्य पावली. याजकरिता वितविशय रुपये यकोणीसशे वगैरे वस्तभाव जफ्त आहे ते ब्राम्हणाच्या लग्नाकरिता ब्राम्हणास देऊन बलरामापासून सरकारांत गुन्हेगारी रुपये

२००० रुपये

* बलरामाकडे दोन हजार रुपये गुन्हेगारीचें करार केले, याची निशा दीडा माहिन्याचे मुदतीची चांगली घेऊन व हजीर जामीन घेऊन अटकेतून मोकला करावा. येणेप्रमाणे पूर्वी वस्तभाव सरकारात आली आहे. त्यासिवाये दोन हजार रुपये सदरहू मुदती प्रो घ्यावे. येणेप्रो करार करावे

छ ४ जिल्हेज इसने फालगुन.

¶*Fine and punishment are herein imposed on one Balram, a Kanoja Brahmin, for abducting a Brahman woman.*

No. 139] [17-6-1772

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नारायणराव बलाल यांसी माधवराव बलाल प्रधान. आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. मल्हारजी पारखा चाकर सरकार याणी विदित केले की, माझे बायकोसी चांदू गुरव जात होता सबब त्यास मी जिवे मारला. हा अन्याय मजला सरकारातून माफ केला. असे असता सुभाहून कमावीसदारानी (माझे) सेत व मळा घर गुरे ढोरे वस्तभाव जफ्त केली आहे, ते मोकली करून माझी मजकडे देविले पाहिजे म्हणून. त्याजवरून हे पत्र तुम्हास लिहिले असे. तरी मल्हारी मजकुराची वस्तभाव गुरेढोर जफ्त केली आहे ती मोकली करून याची यास देणे. सेत मला याचा याजकडे चालविणे. रा छ १३ सफर सुा इसने सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे आसीर्वाद.

¶*Madhavrao Ballal orders the release of the property of Malharji Parkha which was confiscated by the Kamavisdar though he was given a pardon for the murder of a Gurav who had an illicit connection with his wife.*

7535

No. 140] [1772 ?

श्री

सेवेसी नारो यशवंत रनाळकर विज्ञापना. आमचा चुलतभाऊ नरहरि पानपताचे गर्दीत जाऊन यवनमय होऊन अकरा वरशे राहिला. तिकडून आलियावर शामाच्यार्यप्रभृति व ब्राम्हण पैठणकर याणी प्रायश्चित्त देऊन पंक्तीव्यवहार केला ते सर्व भहिषकृत जाहाले. आम्ही पाच सात वरशे भहिषकृत राहिलो. नंतर मकाशकर ब्राम्हणास व रा॥ यादवराव भागवतास विनंती केली कीं, आम्हांस मुक्त करावें. यावरून त्यानी स्वामीस विनंती लिहिली. त्यास आज्ञा जाली की, नरहरीचा घटस्फोट करऊन दायादास प्रायेश्चित योजन देऊन शुध्ध करावे, आज्ञे प्रमाण घटस्फोट करऊन प्रायेश्चितार्थ श्रीत्र्यंबकेश्वराच्या आकरा आकरी प्रदाक्षिणा नेमिल्या. त्यास मी व आमचा चुलतभाऊ आनाजी वेकाजी उभयतां क्षेत्रास जाऊन नेमिल्याप्रमाणें प्रदक्षणा करून धोडो महादेव याचे साक्षपत्र घेऊन सेवेसी आलों. नरहरीचे स्त्रीची विनंती केली की, तिचे कसे करावे; त्यावरून आज्ञा जाली कीं, कृष्णातीरी वाईस तिचाही घटस्फोट करावा. त्यास येविसी पत्रे अधिकारी यास व क्षेत्रस्तास की, येथानशक्ती घटस्फोटाचा विध उरकोन पत्र देऊन पाठवावा म्हणोन पत्रे २

¶*Naro Yashwant informs Ramshastri that he has executed his orders regarding the penance in connection with the unauthorised reconversion of his cousin Narhari who was converted to Islam at Panipat and who remained in that faith for eleven years. The writer requests the addressee to issue orders for granting divorce to the wife of Narhari.*

No. 141] [10-12-1774

पौ छ ६ सवाल
मार्गसीर्ष मास.

श्रीरामचंद्र

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री सखामपंत स्वामी
गोसावी यासी

पो सदासिव चिमणाजी सचिव नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. वेदमूर्ति राजश्री रामभट जोसी कसबे कडे याचा व कसबे मजकूरचे धर्माधिकारी याचा कजिया लग्नपत्रिकेचा आहे. येविसी उभयता पुरधरास आले आहेत. त्यास प्रतिष्ठानी

व मातबर ठिकाणी जोसी आहेत आणि धर्माधिकारीहि आहेत. तेथे लग्नपत्रिकेची चाल असेल त्याप्रो उभयेतानी वर्तावे यैसे पत्र का मजकूरच्या जमिदारास व गावास व धर्माधिकारी यास यो तीन ताकीदपत्रे दिल्ही पाहिजेत. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*This paper refers to a dispute between the Joshi and the Dharmadhikari of Kade regarding the enjoyment of a certain religious right.*

No. 142] [*19-5-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री मोरोपंत यांसी

प्रति

रामशास्त्री आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. बापूजी नाईक तांबवेकर याचा जेष्ठ सापत्न बंधु होता त्याचे लग्न जाहालियावर सातवे दिवसी मृत्य पावला. त्याची स्त्री विधवा हाली वीस बावीस वर्षाची आहे. तिचा व तिच्या सापत्न सासूचा न पडाव यामुले विभक्त निघाली. तिच्या योगक्षमाचा विचार बापूजी नाईक न करीत. यास्तव पुण्यांमध्यें स्वकीय ग्रहस्त व मुछदी याकडे बहुतांचे घरी फिरली. त्याणी सांगितले असता नाईक मारनिले कोणाचेहि न ऐकत. तेव्हा तिणे येथे येऊन सांगितले की, आपणास आश्रये नाही. आन्नवस्त्रे न मिले. आपल्या लग्नात कंपेश दीड हजार रुपयाच्या वस्ता आपणावर होत्या त्या सापत्नसासूने काढून घेतल्या आहेत; तरी मनास आणावे. यावरून बापूजी नाईकास आणून ताकीद केली असतां न ऐकत. तेव्हा निक्षूण सांगितले की, तुम्ही मातबर असोन जेष्ट बंधूची स्त्री शहरात फिरते, तिच्या आंनावस्त्राचा निर्वाह करीत नाही, याकरिता सरकारात गुन्हेगारी देऊन तिच्या योगक्षेमाचा बंदोबस्त करणे व वस्ता काये घेतल्या असतील त्या तिच्या तीस देणे. त्यास आंनावस्त्राबदल दरसाल रुपये १२५ सवासे देतो म्हणोन कागद लेहून दिल्हा. वरकड फडशा आज करितो, उद्या करितो म्हणून दिवसगतीवर घालून वेदमूर्ति रा बालभट थते याजबरोबर पुरंधरास गेले आहेत. तेथे त्याविषयीं बालभट रदबदली करून गुन्हेगारी मना करवणार व वस्ताचा निर्वाह होणे तो टालाटालीवर टाकणार तरी ते गोष्ट ऐकावयाची नाही. गुन्हेगारी घ्यावयासी योग्य आहेत व त्यांची भावजय निराश्रित; तिचाहि वस्ताचा फडशा व्हावा लागतो, यास्तव निक्षूण ताकीद व्हावी म्हणून राजेश्री बापूस व रा नानास तुम्ही सांगावे. रा छ १८ रबिलावल सुा खमस सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे +हे आशीर्वाद.

¶*Maintenance is granted in this paper to a widow and her ornaments restored to her by Ramshastri the Chief Judge of the Maratha State.*

No. 143] [7-9-1775

श्री

यादी बेरड वगैरे पारपत्याचे.

सुा सीत सबैन मया व अलफ.

थोर अन्याई दरवडेकरी

१ भवान्या बेरड सुपेकर

१ नागु बेरड जेजुरीकर दाद्याचा बाप.

१ सुलताना पवार वाा बतीस सिराळे.

१ आप्या बेरड आळंदीकर

१ हुसेनखान वाा नूरखान

१ बावाखान वाा भिकनखान

१ लक्ष्मण खोमणा वाा जेजुरी मैराळजीचा लेक.

—

७

सात असामीपैकी भवान्या व नागु यास हतीच्या पाई बांधोन मारावे. बाकी पाच आसामीची डोकी मारावी. येणेप्रमाणे.

छ ११ रजब भाद्रपदमास

सन सीत सबैन.

मध्यम येकेक वेळ दरवड्यास बराबर गेले होते.

१ म्हाकोजी सिंदा वाा पाटण

१ जान्या बिन रखमाजी जगथाप

१ येसू बेरड वावापूरकर

—

३

तीन असामीचे डावा पाय उजवा हात या प्रमाणे तोडावे. येणेप्रमाणे

कनिष्ट अन्याई

१ कृष्णा भोसला

१ माया न्हावी

१ मैराळजी खोमणा

—

३

ताा

१ न्हावी डोक्या बेरडांच्या करून बेरडाजवळ दोन तीन वरसे होता.

१ कृष्णा भोसला नवा चाकर एक महिन्याचा दरवड्यास गेला नाही.

१ भैराळजी पा याचा पुत्र दरवड्यात गेला होता तो थोरल्या अन्याया- कडे लिहिला आहे. हा गेला नाही.

३

तीन असामीचे उजवे हात तोडावे. येणे प्रमाणे.

¶*This is a list of offenders and the cruel punishments that were meted out to them ; some were to be trampled by elephants, some to be beheaded and the rest were to have parts of their bodies lopped off.*

No. 144] [*13-5-1776*

पौ छ २९ रोवल

सीत

श्री

विनंती सेवक धोंडो बाबाजी कृतानें (क) सा नमस्कार विज्ञापना. ता छ २४ रोवलपरयंत सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. पुण्यामध्यें कसब्यां- तील कसाबानें गाई मारिली आणि मास विकलें हे वर्तमान फिरस्ते प्यादें यासी कळलें. त्याणी चाहुडीस सांगितलें, त्याजवरून कसाब धरून आणून चौकसी करितां जंगली कसाब याणे आपले घरची काल्हवड दोन बर्षाची होती तीं छ १९ रोवल बुधवारी तिसरे प्रहरी जमाल कसाब पडोसी यासी बलाऊन आणून तो व आपण मिळोन दोघानी मारिली, आणि मांस वाटून घेतलें. त्यापौ काही विकलें किरकोळ मुसलमानांस; काही खादलें; व कांही घरी त्याचे होतें त्या सुधा धरून आणून मुद्यानसी शाबूत करून त्याचें हाती चिमोटे खिलऊन पाई बेड्या घालून अटकेंस ठेविले आणि हे वर्तमान राजश्री जनोबादादा यासी व राजश्री शास्त्रीबावास सविस्तर वर्तमान समजाविलें. आज्ञा होईल त्याप्रमाणे त्याचें शासन करितों. हे वर्तमान सेवकास काल कळलें तेव्हा जलदीनें धरून आणून चौकसी केलीं आणि जालें वर्तमान सेवेसी श्रुत करावे एतदविसी विनंती लिा आहे. दुसरें वर्त- मान नारायेणपेठेमध्ये बोडकी द्राविडीण ब्राह्मण म्हातारी राहात आहे. तिचे घरीं दारूचे भरलें सिसे वीसपंचवीस सांपडलें व बकरे याचें मास यैसे सापडलें. ते मुद्यासुधा चावडीस धरून आणिले. चौकसी करितां ती म्हातारी दारूचा

उदीम करित्यें. कोणाची नावे सांगत नाही; व ती रांड भिकारीण आहे. पैशास उत्पन्न नाही. दारू मात्र सांपडली, इतकेच मात्र जालें. गावांत पाप बहुत होऊ लागलें. याचे शासन यथास्थित घडल्यास श्रेयस्कर. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Babaji reports to the Peshwa two cases : one of cow slaughter in the Kasaba Peth, Poona, and another of illicit sale of liquor by a Dravid widow in Narayan Peth.*

No. 145] *[Date of receipt 20-6-1778*

पौ छ २४ जावल
सुा तिसा सबैन

श्री

त्रिंबक धारप याण करमरकर याची मूल पळून नेऊन लग्न लावीत होता, त्यांतलि जोसी व त्याचा चुलतभाऊ हे दोघे वाड्यात होते त्यास शहरात फिरऊन दंवडी पिटून असे फिरोन कोणी न करी असे लोकास कळऊन तोफखान्यात आटकेस बिडीखेरीज ठेवावे आण फुटाणे गावात भीक मागून खावे. याजप्राो वो राजश्री शास्त्रीबावाची आज्ञा जाली आहे हे विनंती.

¶*Ramshastri punishes a relative and another accomplice of a man who forcibly carried away a girl and attempted to marry her.*

No. 146] *[13-2-1781*

पौ छ २२ रावल सन
इहिदे समानीन मया व
अलफ फाल्गुन मास.

श्री

वेदशास्त्रसंपन राजामान्य राजश्री
शास्त्रीबावा स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी त्रिंबक कृष्ण मुकाम अंजणवेल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. तागा(ईत) माघ बद्य पंचमीपावेतो क्षेम असो (वि)शेष. तालुके मजकुरी ब्राह्मण ग्रहस्त * * (बं)धू आहेत. त्यास वडील बंधूस पुत्र(सं)तान आहे. धाकट्या बंधूस पुत्रसंतान (नाही). याजकरिता त्याणे लेकीचा लेक घ्या * से केले. त्याजवरून वडील बंधु याणे सागि(त)ले की, लेकीचा लेक व

परगोत्री घेऊ नये, आ(प)ली दाहा पाच घरे भाऊबंदाची आहेत त्यातू(न) पुत्र आगर श्वगोत्री यातील पुत्र मेलऊन देतो, ऐसे वडील बंधु याणे सांगितले व चौघे भाऊबंद यांही सांगितले. ते गोष्ट त्याणे अमान्य करून आपले भाऊबंद व जोसी उपाध्ये धर्मादिकरी कोणी न येत, तेव्हा इतर गावचे परतालुक्यातील पाच सात ब्राह्मण दौहित्रपुत्राचे विधान करावयासी मेलविले. * * * वडील बंधु याणे आणशपत त्यास घा(तली) की, आपले भाऊबंद श्वगोत्री यातलि पुत्र देत असता अशास्त्र वर्तणूक विधान कराल तरी तुंम्हास गाईब्रह्मणाची शपत आहे. यप्रमाणे शपत घातली असतां अमान्य करून विधान केले. त्या मुलाचे, दोहित्र आणि अंन्यत्र गोत्रीचा, त्याचे उपनयेन अगोधर दोन महिने जाहाले. समा[१]वर्तन व्हावयाचे होते. तेव्हा तो ब्रह्मच्यारी (अ)सता विधान केले. त्याचे उपनयेन जा(हाले) तेव्हा त्याचा बाप संनिध असता अन्य(त्र) गोत्री याणे उपन्ययेन केले. याप्रो च्यार * * * श कर्मे त्याजकडे असोन उपनयनी गो(त्र) उच्चार येक जाहाला असता लग्नसमई दु(सऱ्या) गोत्राचा उच्चार करून लग्न केले. या(स्त)व उभयताची मनसुबी येथे आली आहे (या)-जकरिता आपणास विनंती पत्र लिा आहे. * * शास्त्रमते याचा परिणाम काये, मुला(ची) गत काये, कोणा गोत्रास वर्तावे, याचा (निर्ण)य व ज्याणी ऐसी कर्मे केली त्यास प्राये(श्चि)त काये ते शास्त्रार्थ मनन करून ल्याहावयासी आज्ञा जाली पा. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ करावा, हे विनंती.

¶*Opinion of Ramshastri is sought by Trimbak Krishna in a case of adoption which had apparently taken place in contravention of the provisions of Hindu law.*

No. 147] [*27-10-1793*

पौ छ २१ रावल सन

आर्बा सितैन अश्विन मास

श्री

सेवेसी केशवराव जगनाथ सा नमस्कार विज्ञापना विशेष. केदारी मांग वस्ती मौजे कल्याण घेरा किले सिंहगड याचे घरी येशा व आंबऱ्या मांग वा मौजे किकवी ता खेडेबारे हे च्यार महिने येऊन राहिले होते. त्यास तिघा मांगानी छ १० रावली मोगरवाडीचे रानातून गुरातील धोंडजी करजवणा याची गाये काली धरून आणोन कल्याणचे रानात दिवसास बांधोन ठेऊन सायेंकाली तिघाजणानी सुरा व कुऱ्हाड विले व वह्याने जिवे मारिली. त्याचे चौकसीस

१ सोडमुंज.

किले मारीहून सिपाई व कल्याणकर पाटील व बेरड पाठऊन जाग्याचा थांग मोवामदऱ्यात लागला. सा कल्याणकर माहाराचे घरातील झाडे घेऊन मांगाचे घरात गेले तो केदाऱ्या मांग याचें घरात मास सापडले, मुदा लागला. सा घर जप्त करून तिघे मांग किल्यास आणून जबानी घेतली तिची नकल सेवेसी पाो आहे. मांग खोड्यात घालून आटकेत ठेवावे यैसे रा हणवंतराव सालवी हवालदर याजकडे सांगोन पाठविले. खोड्यात घालावयाची परवानगी हवालदार न देत. तेव्हा आमचे कारकुनाने सदरेपुढे खोडा आणऊन त्यात घालून बंदोबस्ताने ठेविले. त्याचा आपराध थोर आहे. त्याचे पारिपत्य चांगले जाहाले म्हणजे सर्वत्र जागा दहशत पडेल. पारिपत्याविसी आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. किल्यास हली हंशमी येतात त्यास खोडाबिडी घातली पाहिजे. सुभ्याकडून हवालदार यास सांगोन पाठऊन घालावी, ही किल्यातील चाल हवालदार सांप्रत यैकत नाही. किल्यास कारकून कामकाजास ठेऊन मी स्वामीचे चरणाजवल आहे. किल्यावर येके जागा सुभा व हवालदार, तेव्हा परवानगी दुतर्फा चालते. येक तर्फा सांगता न ये. हवालदार यैकत नाहीत. नित्य कटकटीसी संमंध. यास्तव हवालदार किल्याचे उपयोगी नाहीत. स्वामीनी परभारे सबनीस, फडनीस व च्यार सरदार हुजूर हशमी यास बोलाऊन आणून समक्ष चौकसी करावी. कामगारीचे सिपाई घालवावे, नाही तरी परवानगी बंद करीन यैसे हवालदार बोलले आणि आश्विन वा ९ सोम्यवारी दिा कासी बलाल निा हुजूर हशम याचे लोकाची परवानगी दरोबस्त बंद केली. रानात लाकूडफाटे वगैरे आणावयासी दरवाज्याखाली जाऊ देत नाहीत. याप्रो दुसरी च्यार पथकाची परवानगी बंद करणार. तेव्हा तूर्तच बखेडा पडेल. बंदोबस्ताविसी दिसगतवर न गेले पाहिजे. लोकाचा गरगशा पडला आहे. यास्तव विनंती मान्य करून सत्वर उलगडा जाहाला पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa is advised to mete out heavy and deterrent punishment to some Mangs charged with the heinous crime of deliberate cow-slaughter.*

No. 148]

नकल

श्री

चिरंजीव राजश्री परशरामपंत नाना व विठलपंत देसाई यासी दादो हरि व वामनाजी हरि आसीर्वाद उपरी. साष्टी व मुंबईकर कसाब देशांतून गाई हरदू

ठिकाणी विकावयास न्यावयाची मनाई सरकारांतून आसतां चोरून नेतात. त्याची चौकसी हुजुरून आनंत नाईक आणजुरकर यास सांगून पत्र दिल्हे आहे. त्या पत्राप्रों प्रांत वसई येथील नाकेबंदीची चौकसी नाईक मजकूर करील त्यास करू देणें व तालुके मारपौ नाकेबंदीस सिपाई पेशजी राजश्री दादा गद्रे यांचे कारकीर्दीत दिल्हे आसतील त्याचा दाखला पाहून त्याप्रों सिपाई नाकेबंदीचे चौकसीस नाईक मजकूर याचे गुजारतीने पेशजीची वहिवाट समजोन नेमून देणें. हे काम सरकारचे; नाकेबंदीवर गाई जाऊ न पावेत आसा बंदोबस्त जरूर करावा. यांची वरचेवर खबरदारी करावी. रा छ ३० सफर बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*This is a letter to officers in the Konkan to help Antaji Naik Anjurkar in the measures he would devise to prevent cows being taken away by the butchers of Bombay and Salsette.*

No. 149] [*3-6-1781*

पौ छ २९ जाखर
इसने जेष्ट मास

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राज-
मान्य राजश्री गणेश विश्वनाथ
गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा इहिदे समानीन मया व अलफ. हरिसिंग सिलेदार दिा राजश्री आनंदराव भिकाजी हे लग्न करावयाकरितां निरोप घेऊन घरास गेले. त्यास पहिली बायेको, तिचा त्याग पंधरावास वर्षापासून केला, उपरांतिक दुसरे लग्न केले. तिजला दोन मुले होऊन मृत्य पावली. सबब तिसरे लग्न करावयास गेले. तेथे पहिले बायकोचा भाऊ गोबिंद राम तुम्हापासी चाकरीस आहे त्याणे तुमचेजवल समजाविले की, पहिले बायेकोचा त्याग केला. याजकरितां तिणे अपघात करून प्राण दिल्हा. याप्रो गैरवाका समजाऊन हरिसिंग याचे लग्नास आडथला करून मारनिलेस अटकाव केला आहे म्हणून विदित जाले. त्याजवरून हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी हरिसिंग याचे लग्न होऊ देणें. पहिली बायेकोने जीव दिल्हा; त्यास, तिचा

त्याग पंधरावीस वर्ष हरिसिंगाने केला असल्यास लग्नास आडथला करावयास प्रयोजन नाही. ताकीद करून लग्न करू देणे. जाणिजे छ १० जमादिलाखर आज्ञा प्रमाण.

¶*One Harising abandoned his wife and got himself married a second time. Upon the demise of his second wife he arranged another marriage when he was arrested by Ganesh Vishvanath as it was represented to him that the first wife of the said Harising had committed suicide as a result of her abandonment. Ganesh Vishvanath, however, is ordered by the Peshwa to release Harising and allow him to marry a third wife as he cannot be held responsible for the death of his first wife whom he had deserted some twenty years back.*

No. 150]

श्री

श्रीमंत राजश्री पंत-

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक केसो भिकाजी हवालदार ताा तुगाड व कारकडा कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. ताा छ २२ जमादिलाखरपावतो सेवकाचे वर्तमान व ताा मजकुरचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र की, ताा मजकुरी मुसलमान गोवध करितात आणि तुम्ही खबरदारी केली नाही म्हणून आज्ञा. त्यास ताा मजकुरी आपल्यास आढलले नाही. पुढे स्वामीचे आज्ञप्रमाण, चौकसी करून वर्तणूक करून. हे विज्ञापना.

¶*Keso Bhikaji reports to the Peshwa that there are no cases of cow slaughter by Mahomedans at Tugad and that he will prevent such a practice if there be any in future.*

No. 151]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त

ब्राह्मण कसबे सेवगाव यांसी

प्रति रामशास्त्री नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहावें विशेष. माहादेवभट जोसी मौजे कडजलगाव पो सेवगाव याणी विनंती केली कीं, आपले बायकोन आपला दायाद ब्राह्मण विठल जोसी यांसी माल्याकरवी जिवें मारिलें, सबब मी व माझें दायाद बहिष्कृत आहेत. मजला न कलतां माझें बायेकोनें दुष्ट कर्म केलें. स्वामीनी कृपा करून अम्हां सर्वास दोषानरूप प्रायश्चित्त

द्यावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणौन ऐशास, माहादेवभट जोसी याचें बायेकोनें बुध्धीपूर्वक विठल जोसी यासी जिवें मारविले. यास्तव तिजला प्रायश्चित्त द्वादशाब्द पूर्वोत्तरांगसहित संकल्प करावा, मग कासीयात्रा रामेश्वरयात्रा करून स्वग्रामी येऊन उतरांगें करावी. इच्या प्रायेश्चित्ताचा संकल्प केल्यानंतर माहादेवभट जोसी व यांचे दायादास संसर्गानरूप प्रायश्चित देऊन शुध्ध करावें. याप्रमाणें मुंगीकर समस्त ब्राह्मणास पेशजी पत्र लिा होतें. परंतु तें पैठणकराचे ग्रामण्यातील शरीरसंबंधी यास्तव तुम्ही लिहिल्याअन्वय प्रायश्चित्त देवऊन याची शुध्धता करावी. बाइकोस श्रीकासी रामेश्वर यात्रा नेमिली होती. परंतु स्त्री जाती, याजकरितां श्रीत्र्यंबकेश्वरच्या प्रदक्षणा नेमून पत्र दिल्हे आहे. याप्रा पत्र उगऊन द्यावे.

¶*Ramshastri asks the Brahmins of Sevgaon to execute the penance enjoined upon one Mahadeo Bhat Joshi whose wife had put to death a Brahmin. A more rigorous Prayaschitta is also enjoined upon the woman for the crime of murder she committed.*

No. 152] [*After 1772*

श्री

अपत्याचे सां नमस्कार विज्ञापना. काली मंगलवारी तिसरे प्रहरी श्रीमंत राजश्री शास्त्रीबावाजवल राजश्री त्रिंबकपंत वर्तक व रा विठलपंत परभुणे यांणी नेहरा व ढमाला याचे खुनाचें कजियाबाबत कागद समजावयासी आणिले, सिवाजीपंतासहि नेले होतें. त्रिंबकपंतानी मजकूर मुखवचनें सारा सांगोन बोलिले कीं, श्रीमंत राजश्री बापूस्वामीसहि सविस्तर निवेदन केलें. तेव्हां त्याणी आज्ञा केली जे, मालजी पाटील ढमाला व नेहरे बापलेक दोघें व गारगोटा या चौघाची सेवटची पारपत्ये करावी. यावितरिक्त दुसरे करावयाचे नाहीं. तेव्हां आपण बोलिलो कीं, मालजी पाटील पुष्टिपत्र देता, परंतु कलागत जाली त्यांत नव्हता. सेवटचे पारपत्यायोग्य नव्हे, येसे बोलिलो. तेव्हां त्याजपासून गुन्हेगारी घ्यावी आणि तिघांचीं पारपत्येच करावी, याप्रों सांगितले. त्यास पारपत्ये करावयाची मखलासी सांगावी, तेव्हां सिवाजीपंतानी बावाजवल उतर केलें कीं, विठलपंत रानडे मनसुबीकडे आले होते, ते वेलाचा हा मजकूर, तेव्हां कडुसाहून कमाविस-दाराची बखर आली होती. त्यामध्यें नेहरे याचे सेवटचे पारपत्य करावें येसे दिसले नाहीं. त्यावरून बावानी ते बखर त्याजकडून काढऊन वाचून पाहाविली. सिवाजीपंत बोलिले त्याचप्रों होतें. तेव्हां त्या बखरीस त्रिंबकपंतानी दोष ठेविला.

त्यावर बावानी उतर केलें कीं, सेवटची पारपत्यें करावयाची बापूची आज्ञा. तेव्हां तुम्ही व तात्या व आम्ही उदईक तिसरे प्रहरी बसोन साऱ्या सब्या व कागदपत्र पाहून मग पारपत्याची मखलासी करावयासी सांगों; याप्रों बोली होऊन उठोन गेले. त्यास आजी तिसरे प्रहरी ठराव होऊन मखलासी होताच उदईक त्याप्रो पारपत्ये करितील; यैसा मजकूर दिसतो. त्यास मागे कजियामुलें पिसालानी दोन खून केलें व आणखीहि कोठे कोठे जाले, त्याची माहितगिरी वडिलास आहेच. परंतु कैलासवासी रावसाहेबी सेवटींची पारपत्यें त्याची केली नाहीं. गुन्हेगारी घेऊन मुक्तता केल्या. याप्रो असता याच गरिबांची पारपत्ये सेवटीची करावी, यैसी आज्ञा जाली म्हणतात. याचा शोध करून गरिबाचे प्राण वांचत येसे जाल्यास गुनेगारी जीवनमाफक देतील. हे विज्ञापना.

¶*The writer states a certain murder case in which Dhamale and Neheres were involved and says how it was being tried by Ramshastri. He moreover requests that death punishment should not be executed in the case but rather heavy fines should be exacted as was done by the late Peshwa Madhavrao in similar cases.*

No. 153].

मसुदा

श्री

वेदमूर्ति राजश्री समस्त ब्राह्मण
मौजे साखरी पो भामेर यांसी

प्रति रामशास्त्री नमस्कार विनंती उपरी. गोविंदभट साखरीकर याने पेसजी मौजे चांदोरीस दाहा वर्षांची ब्राह्मणाची कन्या तिच्या वस्ता घेऊन जिवे मारिली. त्या दोषास्तव गोविंदभट यासी येथे दोषानरूप प्रायश्चित्त योजून पूर्वांग करऊन प्रायश्चित्तार्थ कासीयात्रेस पाठविला. यात्रा करून हालीं आल्यावर उतरांग करऊन शुध्द केला असे. याजकडून सवासे ब्राह्मण भोजन करावयाचा संकल्प करविला, त्यापैकी याने चालीस ब्राह्मण भोजन येथे केले. शेष राहिले ते तेथे करऊन यास पंक्तीपावन करावे.

¶*This paper refers to penance assigned by Ramashastri to one Govind Bhat of Sakhri for having murdered a Brahmin girl.*

No. 154] [13-2-1795

पौ छ २२ रजब सुा

खमस माघ

श्री

श्रीमंत राजश्री पंत-

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक सदाशिव केशव साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १९ माहे रजबपावेतो स्वामींचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. गिरजी ब्राह्मणीण बायेको इणे सुलताना सिकलगर येवन यासी बदकर्म केले, सबब तिचा घटस्फोट करून किले सिदगड प्रांत कल्याण भिवंडी येथे अटकेस ठेवा-वयास बराबर गाडदी दिमत तोफखाना च्यार असामी देऊन रवाना केली असे. किले मजकुरी अटकेस ठेऊन पोटास सेर सिरस्तेप्रमाणे देत जाणे म्हणून छ ९ माहे मजकूरची सनद सादर जाली व गिरजी येथे पावली, त्यावरून अज्ञेप्रमाणे किले मजकुरी पाठऊन पोटास सेर देऊन अटकेस ठेविली असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*A Brahmin woman was imprisoned in a fortress for committing adultery with a Mohammedan.*

No. 155]

श्री

पुा चिरंजीव हरीपंतास आशीर्वाद उपरी. कवठेकराचे मनसुबीचा फडशा थेऊरचे मुकामी जाला. त्याप्रमाणे कवठेकरास निवाडपत्र द्यावयाचे, यादीवर येथें करंजेचे मुकामी श्रीमंताचे देणे जाले. हरखी गुन्हेगारीचे यादीवर करार तरी पहिला जालाच होता. हल्लीं निवाडपत्रें होत आहेत. परंतु भडसवळेकर खोटे असून लढाई करितात, याजकरितां अटकेत पुण्यांत आहेत, त्यास रा सिवाजीपंत मिरवणकर व कवठेकरांपैकीं कोण्ही तेथे असतील त्यांणीं श्रीमंत शास्त्रीबावापासीं फिर्याद होऊन त्याजला सख्त तगादा होऊन गुन्हेगारीचा निकाल पडे ऐसे करावे. सिधा सरकारचा खाऊन त्याजला राहावयास काय होते? याजकरितां सिवाजी-पंतास हा कागद दाखवावा. सिधा पीठ दाळीचा असावा. +बावा स्वामीची आज्ञा परभारी घेवऊन धोंडोपंत कोतवालाकडून तगादा करून लिहिलें येईल तर घ्यावें. भोईराजास पालखीस तूर्त राहावयास जागा कोठे केलीत? भवानजी

+ येथून अक्षराचें वळण निराळें.

देशमुख सेजारी याचे पुत्रानी येथें मान्य केलें. परंतु महिनाभर तेथें देतील तर पाहावें. नाहीं तर आणखी योजावी. सौ ठमा सुखरूप पावलियाचे उत्तर लेहून पालखी लवकर पाठवणे. बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.+

¶*Moro Hari writes to Haripant that the dispute between Kavathekars and Bhadsavalekars has been decided in favour of the former and that, therefore, the fine due from the latter should be recovered as early as possible.*

No. 156]

श्री

चिरंजीव राजश्री हरिपंत यासी प्रति मोरो हरि आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता। छ २३ रमजान मु॥ करजे लस्करांत जाणून स्वकिये कुशल लिहीत जाणे विशेष. राजाराम आपाजी देशपांडे प्रांत विज्यापूर याचे सरकारात काही जरूर जाबसालाचे प्रयोजन आहे, तरी लस्करांत रवाना करणे. ते पुण्यात महादसेट वीरकर याचे वाड्यात राहतात. मागे कोल्हारचे देशमुखीचे जाबसालाकारितां आम्हाकडे येत असत. त्याजला आणावयास राऊत दोघे रा। तुळजाजी निबाळकर याणी पाठविले आहेत. याचा त्याचा कजीया आहे. राजारामपंतास ठाऊक आहे. सध्या मनास आणावयाची आज्ञा जाली आहे. वांजबी असेल ते दरबारी निवडेल. लवकर येत यैसी ताकीद करावी. बहुत काय लिहिणे हा आशिर्वाद.[१]

¶*Moro Hari requests Haripant to issue summons to Rajaram Apaji Deshpande of Bijapur asking him to appear in a certain case instituted against him by Tuljaji Nimbalkar.*

No. 157]

श्री

चिरंजीव हरिपंतास आशीर्वाद उपरी. पालखी पुण्याहून आणिली, त्याच दिसीं त्या भोयास दूर कसे करावें म्हणून सातारा भोई साडेसहा रु॥ बारमाही मिळत होते ते ठेविले नाहींत आणि याचा पदाजी नाईक बोलिला कीं, एका दो रोजा बोली करूं. तूर्त चाकरी द्या. त्यावरून तुम्हासुधां आकरा रु॥ दिले. आजी याणी निघतेसमयीं आडविले. रोजमरा द्या नाही तर जातो म्हणून निरोप घेऊन चालिले. यास्तव तुम्हास पत्र लिहिलें आहे. हे फजिती कामाची काय?

\+ पत्र मोरो हरि, रामशास्त्री याच्या शिरस्तेदाराचें. १ रामशास्त्री याचा शिरस्तेदार मोरो हरि याचें पत्र.

नवजण भोई तुमच्या चित्तास येतील ते बळकट पडले काम सिरस्तेप्रमाणें करीतसे ठेऊन आकरा रुा वजा घेऊन बाकी रोजमरा तेथे देणे. नाही तर आम्हावर चिठी देणे. वाकोजीस आणून फजीत करणे आणि कोतवालाकडील अथवा वाकोजी-कडील तुमच्या विचारे होतील ते ठेवणे. नाही तर मोघम च्यार दिवस पुणेस येऊ तो ठेवणे. फजिती काय निमित? बंदोबस्त करावा हे आशीर्वाद+.

¶*Moro Hari requests Haripant to supply the palanquin-bearers and to remove the inconvenience caused by their absence.*

No. 158]

पौ छ १३ रमजान

श्री

चिरंजीव हरिपंतास प्रति मोरो हरि मुकाम जेजुरी आशीर्वाद उपरी. ता। सोमवार संध्याकाळपर्यंत मुकाम मजकुरी सुखरूप असो विशेष. तुम्हापासून पुण्याहून निघालो ते दिव्यास संध्याकाळी आलों. तेथून आज प्रात:काळीं जेजु-रीस आलों. श्रीचे दर्शन घेऊन प्रदोषामुळें येथेंच राहिलों. लष्करचे कूच होऊन पुढें दहा कोशावर गेले. उदईक मंगळवारी विसा कोशाची मजल करून कृष्णातिरी साताराजवळ जाणार ऐसे आहे. आम्ही उदईक लस्करात जाऊ ऐसें म्हणत आहो. हलालखोर अद्यापि आला नाही. यास्तव मुदाम महार पाठविला. रुपया आधीक आगळा पडिला तरी कबूल करून सिरवळचे वाटेनें सत्वर लस्क-रांत ये ऐसे करणे. खोळंबा पडेल. लौकर पाठविणे. हे आशीर्वाद.

¶*Moro Hari informs Haripant of his own movements and those of the army. He further asks him to send without delay one sweeper.*

No. 159]

छ २७ राखर

श्री

सेवेसी विज्ञापना विशेष. राघो नारायेण लवाटे व भिकाजी केशव या उभये-तांचा कजिया. भिकाजीपंताचे स्त्रीस भिकाजीपंत विमलास असतां सिवीगाळ केली. त्याजवर भिकाजी केशव आपले घरास गेले, तो त्याचे बाइकोने वर्तमान सांगितले. त्याजवर श्रीआचार्ये स्वामीसन्निध भिकाजी केशव येऊन प्रार्थना केली कीं, राघो नारायेण अधर्मी, मद्येप्राषनी, याचे पारपत्य होत नाहीं. तू धर्मस्थापक

\+ अक्षरावरून लेखक मोरो हरि रामशास्त्री यांचा शिरस्तेदार असावा.

आहेस माझें गाऱ्हाणे आइकोन पारपत्य करावें एसे बोलले. तों तेथे वेदमूर्त राजश्री माहाद जोसी थोर शिष्ट ब्राह्मण वैदिक व ज्योतिसी व पुराणवितपन्न व याज्ञिक चतुर्विद्या जाणते कुंडमंडपसिध करीत होते त्यानी श्रवण केलें. त्याजवर भिकाजी केशव यांस वृत्त पुसिले. त्यानी सांगितले. त्याजवर दुसरे दिवसीं वज्रगडी रामाजी माहादेव लवाटे रावो नारायेण यांचे चुलतबंधु विभक्त बहुत वर्षे आहेत त्यांचे बंधु माहायात्रेहून आले त्यानी मावंदे केले. तेथे ब्राह्मणसमुदाव जाहाला. रावो नारायेण यांस पंगतीतून सर्वांही मिलोन उठविलें. त्यावर तिसरें दिवसीं रावो नारायेण लवाटे सेवकाजवल येऊन वर्तमान सांगितलें व सर्व ब्राह्मणसमुदायास श्रृत जाहालें. त्याजवर रावो नारायेण सेवकाजवल बजीद बहुत जाहाले. त्यास उतर दिल्हे कीं, तुम्हास बहुत वेला सांगितले व बहुताही सांगितले कीं मद्यप्रासन करू नका. हे गोष्ट पुढें प्रणामास जाईल. परंतु त्यानी ना आइकलें. सेवट उपहास जाहाला. मग समस्त ब्राह्मणमंडली च्यार शत ब्राह्मण कल्याण भिवंडी व जुनर, राजापूर, त्रिंबक, नासिंक, वेरूल, प्रभास क्षेत्र व वसई व लोहगड अस्टागर येथील समुदाय प्रतिष्टेकरितां जाहाला होता, त्यास रावो नारायेण याजविशीं बहुतां प्रकारें सांगितले. पुढें त्याचे वर्तणुकेनरूप प्रायश्चित्त योजावें हा विचार व्हावा. रावो नारायेण आपले स्वमुखें थोर थोर ब्राह्मणाजवल जाऊन बोलले कीं मजवर अनुग्रह करावा. त्यास ब्राह्मण बोलिले कीं तुम्हापासून जे अपराध जाले असतील त्याप्रमाणें सर्वांचे मतें होईल आणि तुम्हास निश्चयपूर्वक अनुताप जाहाला असला, पुन्हा दुराचरण न करा ते गोष्ट प्रत्यैहास आलियावर प्राश्चित्त होईल, ऐसे भाशण ब्राह्मणानी केले. पुढे सिधांत व्हावा तों रावो नारायेण येथून निघोन गेले. त्याजवर सर्व ब्राह्मणानी समतपत्र केलें हे सविस्तर वर्तमान सेवेसी निवेदन असावें याजकारितां सेवेसी लिहिलें आहे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*This letter refers to an inquiry into the misconduct of a Brahman who was addicted to drinking and who was asked to give up his practice and perform penance.*

No. 160]

पौा छ १९ जिलकाद

श्री

सेवेसी. कासी बलाल सा नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता छ १८ जिल्कादपावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. विसाजी बाबाजी देवरुखे पुणेकर येथे यात्रेस आले होते. ते रुगवेदी ब्राह्मणाचे घरी उतरले.

तेथे आचयारी यानी स्वयंपाक केला आणि त्या ग्रहस्ताचे बायेकानी वाढिले. याप्रमाणे दोनसे ब्राह्मण जेवले. मग समस्त ब्राह्मण मिळोन येक समापत्र केले की पूर्वापार देवरुखे याचा व आपला आनवेव्हार नसता ब्राह्मण जेवितात तरी आथपर रुगवेदी व येजुरवेदी व कोकणस्त कराडे याणी कोणी देवरुखे यांचे घरी जेऊ नये. येसे केले असता दोन च्यार दिवस जाहले. मग समस्त मिळोन आले आणि म्हणो लागले की समापत्र केले आहे हे फाडून टाकावे. मग आम्ही बोललो की समापत्र जाहाले आहे हे उतमच आहे. फाडून टाकावयाचे प्रयोजन नाही. येसे बोलत असता समस्तानी फारच येलगार केला तेव्हा आम्ही बोललो की तुमच्या चितास येईल ते करा. आम्ही काही पत्र फाडावयास परवानगी देणार नाही. जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. फार करून पत्र फाडवत नाही. सेवेसी श्रुत होणे हे विज्ञापना.

¶Brahmans of all divisions were present at a dinner when the wife of a Devarukha Brahmin served food. A complaint was lodged about this against the Brahmans of the place who thereupon met together and signed a deed that food should not be participated with a Deorukha. After some days they changed their mind and desiring to have the deed destroyed approached the officer in whose charge the papers had been placed. The officer did not consent to the proposal.

No. 161] [*3-6-1765*

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक सटू कुटा वस्ती भोगूर प्रो नासिक हली वस्ती कां पुणे. आपण लेहून दिल्हे ऐसिजे. माझी बायको पळऊन विठू सेणवी याने नेली. बावड्या किल्यात ठेवली. तिचे ठिकाण आपण लाविले. त्यास स्वामींनी राजश्री वेंकाजीपंत पोतनीस यास पत्र दिल्हे. त्याजवरून त्यानी आपली पत्रे देऊन तिकडे मला रवाना केले. मी आपली बायको घेऊन सातारियास आलो. राजश्री वेंकाजीपंत पोतनीस माझी बायेको माझे स्वाधीन करीत नाहीत. सरकारचे पत्र घेऊन ये म्हणतात. तेव्हा तुझी बायेको तुझे स्वाधीन करीन म्हणतात. येविसी साहेबी सरकारचे पत्र दिल्हे म्हणजे मी आपली बायेको घेऊन येईन. बायेकोस हाटकले मारले तरी यास जामीन मल्हारी कापशा खिजमतगार चाकर

सरकार सदू कुटा याने आपले बायेकोस जिवे मारले तरी यास जामीन आपण आसो. तिची जाब करू. सुाा खमस सितैन मया व अलफ. छ १३ जिल्हेज जेष्ठ मास शके १६८७ पार्थेव नामसंवसरे.

¶Satu Kuta traced his kidnapped wife to Bawda and by means of a Government permit got her removed to Satara where she was taken in charge by Venkaji Potnis, a Government official, who refused to deliver her to the husband unless a letter to the effect was produced. Satu prays the Peshwa that his wife be restored to him and promises that he would do her no harm.

No. 162]

श्री+

यादी पत्रे :

१ वासुदेव दीक्षित यास पत्र की, व्यर्थ आततार्इ ब्राह्मणाने तुफान निर्मूल करून सेषाद्री शास्त्री याजवर ब्रह्महत्येचा आरोप केला हे गोष्ट अपूर्व आहे. या गोष्टीत आपले बंधूनीहि मन घालून त्यास अपांक्त म्हणून कासीत गोष्ट केली, हे गोष्ट सर्व प्रकारे अयोग्य. आपले तर्फेचा आसेल त्याने जे कर्म करावे ते पुर्ते तहकीक करून जे कर्तव्य ते करावे. त्यास आपण त्यास लिहून हे प्रामण्य वारे ते करावे. शेषाद्री शास्त्री याचे रितीस आपणहि माहीत आहेत. विस्तार काय लिहीणे. राजद्वारी जे श्रेष्ट ब्राह्मण राहातात त्यासी बाहेरील ब्राह्मण ज्यास श्री इछेने न्यून धन पावते तो कष्टी, दानाधिकारी असतात त्यावर लटकेच

१ बालकृष्ण दीक्षित यास पत्र की लटके तुफान घेऊन तुम्हाजवल कोणी सागितले की, शेषाद्रीशास्त्री यानी ब्रह्महत्या केली. त्यास श्रेष्ट ब्राह्मण योग्य असता हे गोष्ट या पासून कसी घडेल ? हे पुर्ते तहकीक न कर्ता त्यांस वालीत घातले म्हणून वर्तमान आवगत जाहाले. ऐसीयास आपण त्यास ताकीद करून याचा मिथ्या अभिशाप दूर होऊन सन्मानपूर्वक याची समजाविसी होय ते करावे. स्पष्ट दोष याजकडे तिलमात्र नसता. यासी ज्याने लटके तुफान घेतले असेल त्याचे पारपत्य करणे.

१ कासीचे राज्यास पत्रकी याजकडे दोष नसता लटका अभिशाप आणिला असेल त्याचे पारपत्य करणे.

+ सवंध यादी नानासाहेब पेशव्यांच्या हातची.

रागे भरतात. त्या गोष्टीवर
प्रमाणबुधी करून तहकीक दोष
केला नसता त्यास वालींत घालणे
योग्य नव्हे. आपण नीट समजून
त्यास ल्याहावे.

¶The Peshwa writes in his own hand to Vasudeo Dikshit and his brother and the King of Benares asking them to remove the ban of excommunication imposed on Sheshadri Shastri who was wrongly supposed to be guilty of having put to death a Brahman.

No. 163]

श्री

विष्णु केशव पळसुले देसाई ता। राजापूर याणी हुजूर विदित केले की, मौजे आसोले वडद ता। मजकूर हा गाव वतनी खोती आमची. त्यास आलीकडे पंचवीस तीस वर्षे विष्णु अनंत घाटे कोतापूरकर यास चालवणुकेस आम्ही गाव दिल्हा. त्याणी वतन आपल्यास जिरावे म्हणोन भुते घालून आमचे घर(ची) (माण)से मारिली. भुते त्याची खरी म्हणोन त्याचे आमचे समक्ष पडथली निवाडा जाहाला. त्याजवरून ब्राह्मणानी त्याजला वालीत घातले आणि गावची खोती सुभाहून अमानत केली आहे. त्यास गाव कदीम आमचा. येविसी प्राचीन पत्रे भाऊपणाचे विभागाची वगैरे आपणापासी आहेत ती व भुते त्याची खरी जाली याची सुभाची खबर आहे ती साहेबी मनास आणून गावची खोती माझी मजकडे चालवावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणौन विनती करून सदरहूप्रा। पत्रे दाखविली ती मनास आणून हे पत्र सादर केले असे. तरी प्राचीन विभाग पत्राप्रा। गावची खोती देशमुखाकडे तूर्त चालवणे. पेस्तर हरदोजणासमक्ष निर्वाह मनसुबीचा करून ज्याचा गाव होईल त्याचे हवाला केला जाईल म्हणोन गंगाधर गोविंद याचे नावे चिटनिवीसी पत्र

१

छ २४ सवाल खमस.

¶This paper refers to a dispute between two parties regarding the enjoyment of a Khoti Watan in which one party is alleged to have practised witch-craft against the other.

No. 164]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री
शास्त्रीबावा स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी त्रिंबकराव सदासिव पुरंधरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। माघ शुध शष्टीपावेतों स्वामीच्या आसीर्वादे करून येथास्तित असें विशेष. खंडोबा व मुधोबा बेलसरे जेजोरीकर व मोरोबा बेलसरे याचा भाऊपणियाचा कजिया फार दिवस आहे. त्यास आम्ही स्वामीस विनंती केली की, उभयेताचे वाजबी मनास आणून विल्हे लावावे व याचप्रमाणे सखारामपंतानीहि विनंती आपल्यास केला आहे. सरकारातूनहि वाजवी करावे, म्हणून आपणाकडे उभयेतास पाठविले. स्वामीनी दोघाचे मनास आणून दोघासहि वाळीत शास्त्रमतें घातलें. त्यास रा। कोनेरपंत येकबोटे आमचे घरी येऊन आम्हास म्हणाले की, तुम्ही सखारामपंतानी शास्त्री यासी भीड घाळून गैरवाजबी मोरोबास वाळीत वालविले. आम्ही म्हटले की, शास्त्रीबावा कोणाची भीड येकत नाहीत. त्यास वाजबी असेल तसे करणे आणि तुम्हीं आसें का म्हणता? तेव्हा कोनेरपंत बोलले की, शास्त्रीबावाच म्हणतात की, नाना पुरंधरे व सखारामपंत यानी आम्हास भिडेस घातले, म्हणून वाळीत मोरोबास घातले असे कोनेरपंतानी आम्हास म्हटले. त्यास हे वर्तमान स्वामीस कळावे म्हणून लिहिले आहे. आपण परानिष्ट सर्व प्रसिध आहे आणि कोनेरपंतानी आम्हास येऊन याप्रा। म्हटले. कळावे. याचे उतर स्वाम पाठवितील त्याप्रा। कोनेरपंतास सांगू. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे. आमची विनंती येविषी कसी होती हे स्वामी जाणत आहेत. हे विनती.

¶*Trimbak Sadashiv denies the charge of pressure having been brought to bear upon Ramshastri with respect to a decision in a case of excommunication of Belsares.*

No. 165]

श्री

सेवेसी कृष्णराव अनंत कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. ता। छ १४ जमादिलौवलपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. बाबाजी विष्णु प्रभुणा माहुलीकर याणे ब्रह्महत्या केली. सबब त्याचे घर जफ्त करून मोजदाद केली त्याची यादी व विष्णु नरहर याचे स्वाधीन वस्तभाव केली त्याची यादी कारकुनाबरोबर पाठऊन

देणे म्हणोन आज्ञा, त्यावरून रा विठल तुकदेव कारकून याजबरोबर मोजदादीच्या यादी पाठविल्या आहेत. सेवेसी येऊन पोहचतील. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnarao Anant sends the lists of the property, of Babaji Vishnu, which was confiscated as a consequence of its owner having committed the murder of a Brahman.*

No. 166] [*28-8-1752?*

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

पो श्रीपतराऊ बापूजी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २९ सौवालपर्येंत येथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. तेथे आज्ञा जे, मौजे देलवडी ता पाटस या गांवावर राजश्री स्वामीनी चोरीच्या घोड्याबाबत आठसे रुा घातले. त्याची पटी पाटस तर्फेवर करून देणे म्हणून आज्ञा. यैसियास पाटस तर्फेवर घोड्याच्या मागाच्या व चोरीच्या अदावली सा गुा व साल मजकुरी मिलोन च्यार पडल्या. पहिल्याने मागाडी आले त्यानी गांवगन्ना पैका घेतला, चोरीची आदावल केडगावावर घातली, त्याची पटी गावगना बसली. दुसरे मागाडी आले, त्यानी पैका गावगना घेतला, चोरीची अदावल वरवंडावर घातली. तिसरे मागाडी आले त्यानी गांवगंना पैका घेतला, चोरीची अदावल देलवडीवर घातली, त्याची पटी हाली करून द्यावयाविसी आज्ञा जाली आहे. हाली चौथ्याने मागाडी आले त्यानी गावगन्ना पैका घेतला आणि दौडेवर आदावल घालून गेले आहेत त्याची वाट काय होईल ते पाहावे. सारांश या प्रकारे पाटस तर्फेवर दंगा जाला आहे. पाटस तरफ दूर येकीकडे याकरितां मागाडी माग घेऊन तिकडेच जाऊन पैका मनास येईल तसा घेऊन सेवटी चोरीचीहि अदावल तेथेच घालितात. त्याच्या पट्या तेच तरफेवर घालीन म्हटल्यास निभाव जाला पाहिजे आणि अदावल येती ते येकावरील घालीन म्हटल्यास गावहि वाचला पाहिजे. याकरितां पांचा तरफांत मागाड्यानी जातां जातां वाटेस गाव लागेल तेथील पैका घेतला आहे आणि जे गांव अगदी चुकलेच आहेत त्याजवर देलवडीच्या अदावलीची पटी करून द्यावी लागते. तरी येविसी राजश्री अंताजी नारायण यांस पत्र पाठविले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Shripatrao Bapuji complains to the Peshwa about the repeated levies which had fallen on the inhabitants of tarf Patas during the current and the preceding years. These were a peculiar sort of punitive levies which were recovered from the inhabitants of a village who were collectively held responsible for a theft, the actual perpetrators of which could not be traced beyond that village.*

No. 167]

श्री

सेवेसी लक्ष्मण सिदनाथ विज्ञापना ऐसीजे. येथील वर्तमान ता। छ ६ जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकरून यैथास्तित आसे. यानंतर मालेगाव कसबे खेड येथें बापूजी कातोरा कुणबी राहातो. त्याच्या घरास काल मध्यरात्रीस आग लागोन घर जलाले. त्यास त्याचा येक लेक व येक मुली ऐसी दोघे माणसें जलोन मृत्य पावलीं व पंधरा वीस गुरें अगदीं जलोन मेली व आणिखी येक दोवें माणसें भाजलीं आहेत. बाकी राहिलीं मुलें माणसें जीव मात्र घेऊन बाहेर निघालीं. दाणादुणा वस्तभाव जलोन सत्यानास जाला. त्यास बापूजी मजकूर आजी प्रातःकाली मुरदे घेऊन गावांत आला त्यास सारे गांवकरी जमा होऊन दोनी मुरदे घेऊन स्वामीपासीं यावयास सिध जाले आहेत. आणि गावानें दहशत घेऊन गाव तजावजा[१] जाला आहे. अक्षत्रितीयेचे दिवसी पेठकर मालेगांवास येऊन आउतें धरिलीं. तें वर्तमान गांवकरी यांस कलतांच सारेच कसबे मजकूरचे सिवेस गेलें आणि पेठकरांस बोलावयास माणसें पाठविलीं. त्यास तानाजी कोली याचा लेक व चौगुला व माली ऐसे तिघेजण गांवकरी याजपासी आले. त्यास गांवकरी याणीं तिघा जणांस पुसिलें कीं, मालेगावास आउते का धरितां? आणि जुने मोडून नवें कां करितां? त्यास कोली बोलिला जे, 'करितो आणि फिरोन करावयाच्या तलासांत आहे, ऐसे बोलिला. मग गांवकरी बेदील होऊन गांवास आले आणि जाला करीना आम्हापासी सांगितला आणि सेवेसीहि त्याणी लिहून पाठविला. त्यास काल आदितवारी दुपारां फिरोन क्षा मजकूरच्या सिवारांत वाहातीच्या सेतांत (आउते) धरिली आणि रात्रीस घरास आग लागली याकरितां गावकरी यास संदेह निर्माण जाला आणि गांव तजावजा जाला. याकरितां गावकरी दोनी मुरदे घेऊन स्वामीपासी येत आहेत. जाले वर्तमान सेवेसी कलावें याकरितां लिहिलें आसे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Lakshman Sidnath reports to the Peshwa that a house of one Bapuji Katora was set on fire which resulted in the loss of two lives. He also reports the consequent dread that it spread amongst the villagers who were themselves proceeding to the addressee.*

---

१ घाबरे.

No. 168]

पौ छ २८ रोवल

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामचंद्र नारायण साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २० माहे रबिलवलपावेतो सेवकाचें व तालुके सिवनेरचे वर्तमान येथास्तित असे विशेष. काा नारायेणगाव येथे ब्राह्मण स्त्री विधवा सकेश होती. तिणे वैशाखमासी कासारासी विभिच्यारकर्म नारायेणगावी करिता कमाविसदारानी धरिली. कासारास आटकेत ठेऊन ब्राह्मण स्त्रीचे घर अनामत करोन तिजला गावाबाहेर काढोन दिल्हे, ते शहर जुनर येथे येऊन राहिली. येथे सिंप्यासी अकर्मावर धरिली. मनास आणिता आवंतर पूर्वी कितेक कर्मे जाली म्हणून कबूल आली. त्याजवरोन शहर मजकुरचे ब्राह्मण शिष्ट मिळऊन जाले वृत सर्वांनी मनन करोन तिचे पोटीं दोन पुत्र मुंजी जालेले आहेत. येक आठ वर्षाचा व येक सा वर्षाचा आहे. यास्तव सर्वा सिष्टाचे मते ते स्त्रीचा घटस्फोट करोन मुले ब्राह्मण्यात ठेवावी म्हणून सेवेसी विज्ञाप्ति लिहिली असे. येविसी आज्ञा कर्तव्य ते करणार स्वाम समर्थ आहेत. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramachandra Narayan reports to Dadasaheb a certain case of adultery of a Brahman woman and the punishment to be inflicted on her.*

No. 169]

श्री

राजश्री जावजी गौळी गोसावी

यांसी

रामराम विनंती उपरी आजी तुम्हांकडील लोक याणी मेटांत जाऊन तमाम वाडियानी ब्राह्मणाची घरे लुटिली. गुरें वस्तभाव आवघी नेली व ब्राह्मणांस क्षते देखील केली. ते ब्राह्मण सारे येऊन आमच्या व रा हरिपंतांच्या डेरियासी गवगवा आरंभिला आहे. आम्ही घाट उतरलिया तागाईत कोणा ब्राह्मणा काडी-इतका उपद्रव दिल्हा नाही. आणि आजी तुंम्ही आम्ही सारे सरदार समीप असतां लस्करांत परम आन्याय जाला आहे. ब्राह्मण रक्षावे येविसीं खावंदाची आज्ञा कोणे प्रकारची ते सर्वत्रांस विदितच आहे. उदैकहि याप्रमाणेच कर्तव्यता असेल तर तैसेच ल्याहावे. आम्ही परिछिन तिकडे येणार नाही. तरी

तुम्हाकडील पनास राऊत व येक शाहाणा माणूस कारकून यैसे पुढें रवाना करून जागा जागा राऊत उभे करून निक्षूण ताकीद करणे. आम्ही रावतानी ब्राह्मणाची गुरे ढोरे वस्तभाव आणिली असेल ते तहकिकात करून जमा करावी ज्यास त्यास द्यावी. गुरे तोडावितील तरी कार्याची नाहीं. तोडाविली असतील ते आणवावी. ब्राह्मणाचा बोभाट सहसा कार्याचा नव्हे. येविसीं विस्तारें ल्याहाविसें नाहीं. रा छ १० जावल हे विनंती.

¶*This is a complaint against some horsemen who harrassed the Brahmans of the place where they had encamped. The addressee is requested to take severe steps against them.*

No. 170]

श्रीभवानीशंकर

माहाराज राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक पांडुरंग दामोदर कृतानेक सेवेसी साष्टांग दंडवत प्रा विनंती. ता छ १९ माहे जमादिलावलपरयेंत स्वामीचे आशीर्वादेकडून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. मुसलमान चाकर वाघोजी ढमढेरे याजकडे खासदार चाकर आहे. त्याचे बायकोजवळ धुलोजी कोल्या धणनगर जानोजी ढमढेरे यांजकडे चाकर आहे हा जात होता. दोघांचे सूत्र बहुत दिवस आहे. यैसें असतां येक दिवस मुसलमान आपली बाइको घेऊन पलून जात होता. त्यास धुलोजी कोल्या याणें धरून आणून मुसलमानास काठ्यांचा मार देऊन कुस्त[1] करून बहुत कायां केला आहे व त्याचे बाइकोचे पाई आपले घरामधीं येक रात्र चौमोटे[2] खिलून ठेविली होती. दुसरे रोजी दोन प्रहरा घरामधी चाकराकरवी बाइकोचे नाक कापून गावाबाहीर लाविली. ते दिवसी बाजार होता, आंम्ही चावडीवरी बैसलो होतो. आम्हां हुजूर रांड बाहीर नेऊ लागले. आमचे द्रिस्टीस पडिली-यावरी वेसीमधीं उभी करून हकीकत पुसिली. ते आपली हकीकत मुलापासून सांगू लागली. ते तकरार पांडुरंग कुलकर्णी यास लेहूं सांगितली. तो सेवकाचे बोले लेहिना. पाटिलास बोलाऊ पाठविले त्यास तेहि कोण्ही न येत. बाइको येक रात्र गांवात होती. दुसरे रोजी प्रातःकाली गांवातून बाहीर गेली. यैसे वर्तमान गांवात जाहाले आहे. सेवेसी कलावे म्हणून लिहिले असे. गांवात

---

१ पाठ चांगली मऊ करणें. 2 a leathern shackle to confine the hand or foot.

धण्याचे भय कोण्हास नाही. बेकैदी जाहाली आहे. सेवकाचे कांही चालत नाहीं. घरोघर ब(द)लामी जाहाली आहे. बेकैदी केली त्याचे पारपत्य व कुलकर्णी याचे पारपत्य जाहाले तरी गांवात धण्याचे भय लागेल यैसे आहे. पारपत्य करणार स्वामी धणी समर्थ मायेबाप असेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

हे विज्ञापना.

¶*Pandurang Damodar reports to Bhausaheb the happenings in a certain village particularly the harrassment of a Mohammedan and his wife by Dhuloji Kolya, both servants of Dhamdhere.*

No. 171] [*1738-39*

श्री

रामभट उपाध्या कसबे तले सुा तिसा सलासीन मया अलफ. कसबे मारचे उपाध्यपणांचे कायदे उपाध्याकडे:

सभादीप पहिला उपाध्याचा. दुसरा आला तरी जोसियाचा, बहुत आले तरी उपाध्याचे असेती. कलम १

भुवनेश्वरी शांतीचे तिनी कलश उपाध्याचे असेती. १

किल्यावरील ब्राह्मण व परभु यांचे घरचे उपाध्यपण उपाध्याचे आणि अशुभाचे उपाध्याचे. कलम १

वैतरणी धेनु व उत्कात व मोक्ष उपाध्याची असे. कलम १

सोमवंती उपाध्याची असे. १

पुण्याहवाचन उपाध्याचे, देखील कलश दोनी कलम १

देवाजी पूजा व सहस्रनाम उपाध्याचे असे. कलम १

कथापुराणांचे विसी उपाध्या भांडत नाही. कलम १

चंडिकेचे नवरात्र उपाध्याचे असे. १

नव कलमे उपाध्याची असे. सुमार ९

¶*This is a decision regarding the perquisites of the priest* (उपाध्या) *of Tale.*

7559

M

N

N—*contd.*

P

R

3

4

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.